सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शुक्रवार, दि. १४ मार्च २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३४८ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

**सूट्टीची सूचना**

१४ मार्च २०२५ रोजी धुलिवंदन निमित्त 'सोलापूर तरूण भारत' कार्यालयास सुट्टी असल्यामुळे १५ मार्च २०२५ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही याची सर्व वाचक, एजंट, जाहीरातदार यांनी नोंद घ्यावी.

– व्यवस्थापक

# महाराष्ट्र ही नवी स्टार्टअप राजधानी - मुख्यमंत्री

मुंबई, १३ मार्च : महाराष्ट्र राज्य हे परकीय थेट गुंतवणुकीसाठी सर्वाधिक पसंतीचे ठिकाण बनले आहे. केवळ नऊ महिन्यांत १ लाख ३९ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. स्टार्टअप्सच्या संख्येत आणि गुंतवणुकीच्या बाबतीत महाराष्ट्र नवीन विक्रम प्रस्थापित करत असल्याने आता भारताची नवी स्टार्टअप राजधानी महाराष्ट्र असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



टीआयईकॉन मुंबई यांच्यावतीने आयोजित टीआयईकॉन् मुंबई २०२५: धंदा फर्स्ट या देशाच्या आघाडीच्या उद्योजकीय नेतृत्व शिखर संमेलन कार्यक्रमात पायाभूत सुविधांचा विकास, गुंतवणूक आणि जलसंधारण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना टीआयई मुंबई हॉल ऑफ फेम पुरस्कार इन्फोसिसचे संस्थापक नारायण मूर्ती यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मंचावर टीआयई मुंबईचे संस्थापक अध्यक्ष हरीश मेहता, हवस मीडिया इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी उदय मोहन, टीआयई मुंबईचे अध्यक्ष रानू वोहरा, डॉ. अपूर्व रंजन शर्मा आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी हरीश मेहता यांच्या 'अतुलनीय' या पुस्तकाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

महाराष्ट्रातील सर्व नागरिकांना पुरस्कार समर्पित करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, हा पुरस्कार २०१४ मध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आम्ही सुरू केलेल्या कामाची पोचपावती आहे. महाराष्ट्रात, विशेषतः मुंबई आणि 'एमएमआर' क्षेत्रात दिसणारे सर्व पायाभूत प्रकल्प, कोस्टल रोड, अटल सेतू, मेट्रो, वाढवण प्रकल्प हे सुशासनाचे प्रतिक आहेत.

वाढवण बंदर जेएनपीटी बंदराच्या तुलनेत तीनपट मोठे असेल, जे भारतातील एक मोठे बंदर आहे. या बंदराचे काम सुरू करण्यात आले असून ते फक्त बंदर नसेल, तर त्याच्याबरोबरच एक विमानतळ देखील उभारले जाईल. त्याठिकाणी बुलेट ट्रेन स्टेशन असेल. वाढवण बंदराच्या परिसरात चौथी मुंबई साकारली जाईल.

जलसंधारण क्षेत्रात काम करताना सहा वेगवेगळ्या विभागांद्वारे १४ विविध जलसंधारण योजना राबवल्या जात होत्या. त्या एकत्र करून एकच योजना तयार केली आणि जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून २५,००० गावे दुष्काळमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठरवले. लोकसहभागाच्या जोरावर या अभियानातून २०१९ पर्यंत २०,००० गावांनी जलसंधारणाचे नियोजन केले, जलसाठ्याची निर्मिती केली आणि दुष्काळमुक्त झाली. या योजनेमुळे दुष्काळग्रस्त मराठवाड्यातही भूजल पातळी वाढली असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

आदर्श नेतृत्व

महाराष्ट्र राज्याच्या पायाभूत सुविधांचा विकास, गुंतवणूक वाढ आणि जलसंधारण क्षेत्रातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उल्लेखनीय कार्याची दाखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधा क्षेत्रात मुख्यमंत्री श्री. फडणवीस हे अनेक प्रकल्प, योजना राबवत आहेत. ज्यामध्ये रस्ते, मेट्रो, रेल्वे आणि शहरी वाहतूक यांचा समावेश आहे. या उपक्रमांमुळे राज्यातील दळणवळण आणि लोकांच्या जीवनशैलीत मोठ्या प्रमाणात सुधारणा झाली आहे.

## भारताचे माजी अष्टपैलू खेळाडू सय्यद आबिद अली यांचे निधन

### सुनील गावसकरांनी व्यक्त केला शोक

मुंबई, १३ मार्च : भारताचे माजी अष्टपैलू खेळाडू सय्यद आबिद अली यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी निधन झालंय. सय्यद आबिद अली हे त्यांच्या उत्कृष्ट क्षेत्ररक्षणासाठी ओळखले जायचे. अली यांनी टीम इंडियासाटी २९ कसोटी सामने खेळले होते. भारताचे माजी क्रिकेटपटू आणि लिटल मास्टर सुनील गावसकर यांनी सय्यद अली यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. सय्यद आबिद अली यांच्या दुःखद निधनावर सुनील गावसकर यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आणि म्हणाले, ही बातमी ऐकून खूप दुःख झाले. अली टीम इंडियासाठी काहीही करण्यासाठी तयार असयचा. तो शेरदिल खेळाडू होता. तो अष्टपैलू असूनही तो मधल्या फळीत फलंदाजी करायचा, पण गरज पडेल तेव्हा सलामीला फलंदाजी करण्यासाठी जात असायचा. त्यांनी अनेक अविश्वसनीय झेलही पकडले होते.पुढे बोलताना गावस्कर म्हणाले, मला बरोबर आठवत असेल, तर सय्यद आबिद अली यांनी दोनदा कसोटी सामन्याच्या पहिल्या सामन्यावर विकेट घेण्याचा पराक्रम केला होता. मी त्यांचे नातेवाईक आणि सर्व जवळच्या लोकांप्रती शोक व्यक्त करतो.



## टीम इंडियाचा उपकर्णधार शुबमन गिलनं जिंकला आयसीसीचा प्लेयर ऑफ द मंथचा पुरस्कार

मुंबई , १३ मार्च : टीम इंडियाचा चॅम्पियन आणि उपकर्णधार शुबमन गिल फेब्रुवारी महिन्यातील सर्वोत्तम खेळाडू ठरला आहे.आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं फेब्रुवारी प्लेयर ऑफ द मंथची नुकतीच घोषणा केली. शुबमन गिलशिवाय ऑस्ट्रेलियन स्टीव्ह स्मिथ आणि न्यूझीलंडच्या ग्लेन फिलिप्स शर्यतीत होते. या दोघांना धोबीपछाड देत शुबमन गिलनं या पुरस्कारावर आपलं नाव कोरले आहे.



शुभमन गिलने महिन्याभरात पाच एकदिवसीय सामन्यांमध्ये ९४.१९ च्या स्ट्राईक रेटसह १०१.५० च्या सरासरीने ४०६ धावा केल्या आहेत. त्यासाठी त्याला प्लेयर ऑफ द मंथचा पुरस्कार मीयाला आहे. इंग्लंड विरुद्धच्या नागपूर वनडेत त्याच्या भात्यातून ८७ धावांची खेळी आली. त्यानंतर कटकमध्ये त्याने आपल्या कामगिरीतील सातत्य कायम राखत ६० धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. अहमदाबादच्या मैदानात शुबमन गिलनं शतकी खेळी करून ही मालिका खास केली. इंग्लंड विरुद्धच्या अखेरच्या वनडे सामन्यात त्याने १०२ चेंडूत ११२ धावांची खेळी केली होती. या शतकी खेळीत त्याने १४ खणखणीत चौकारासह ३ उत्तुंग षटकार मारल्याचे पाहायला मिळाले होते.

## तेजस विमानातून 'अस्त्र' क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी

### हवेतून हवेत मारा करत गाठले १०० किमीचे लक्ष्य

भुवनेश्वर, १३ मार्च : भारताच्या डीआरडीओने विकसित केलेल्या 'अस्त्र' क्षेपणास्त्राची बुधवारी १२ मार्च रोजी ओडिशातील चांदीपूर येथे यशस्वी चाचणी घेण्यात आली. हवेतून हवेत मारा करणारी ७ क्षेपणास्त्र १०० किलोमीटर अंतरावरील लक्ष्य गाठण्यास सक्षम आहे.



संरक्षण मंत्रालयाने सांगितले की, चाचणीत, अस्त्र क्षेपणास्त्राने हवेत उडणाऱ्या लक्ष्यावर थेट मारा केला. सर्व प्रणालींनी उत्कृष्ट कामगिरी केली आणि सर्व मिशन पॅरामीटर्स पूर्ण केले. यावरून हे स्पष्ट झाले की हे क्षेपणास्त्र कोणत्याही परिस्थितीत शत्रूची विमाने पाडण्यास सक्षम आहे. 'अस्त्र' क्षेपणास्त्र प्रगत मार्गदर्शन आणि नेव्हिगेशन प्रणालींनी आहे. तसेच पायलटला न दिसणारे लक्ष्य देखील नष्ट करू शकते. भारतीय हवाई दलाच्या ताफ्यात अस्त्र क्षेपणास्त्र आधीच समाविष्ट आहे. आता ते तेजस एमके-१ए प्रकारासाठी देखील पूर्णपणे तयार आहे. या यशस्वी चाचणीनंतर, तेजसची मारक क्षमता आणखी वाढेल, ज्यामुळे भारताच्या हवाई शक्तीला नवीन बळ मिळेल.

शेजारील देशांकडून निर्माण होणाऱ्या आव्हानांना लक्षात घेता, भारत आपल्या सशस्त्र दलांना सतत बळकट करत आहे. या क्रमाने, हवाई दलाची ताकद आणखी वाढवण्यासाठी, लो-लेव्हल ट्रान्सपोर्टेबल रडार, एलएलटीआर (अश्विनी) खरेदी केले जाईल. यासाठी संरक्षण मंत्रालयाने भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (बीईएल), गाझियाबाद सोबत २९०६ कोटी रुपयांचा करार केला आहे.

देशाच्या स्वदेशी संरक्षण क्षमता अधिक मजबूत करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून हा करार करण्यात आला आहे. अश्विनीची रचना आणि विकास संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेच्या (डीआरडीओ) इलेक्ट्रॉनिक्स आणि रडार डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंटने स्वदेशी पद्धतीने केली आहे. हे रडार हाय-स्पीड लढाऊ विमानांपासून ते मानवरहित हवाई वाहने आणि हेलिकॉप्टर सारख्या मंद गतीने चालणाऱ्या लक्ष्यांपर्यंतच्या लक्ष्यांचा मागोवा घेण्यास सक्षम आहे. त्याच्या अधिग्रहणामुळे हवाई दलाच्या ऑपरेशनल तयारीत लक्षणीय वाढ होईल. संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांच्या उपस्थितीत या करारावर स्वाक्षरी करण्यात आल्याचे संरक्षण मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे. एलएलटीआर हा अत्याधुनिक सॉलिड स्टेट तंत्रज्ञानावर आधारित रडार आहे. हा कार्यक्रम परदेशी मूळ शस्त्रास्त्र उत्पादकांवरील अवलंबित्व कमी करून संरक्षण उत्पादनात आत्मनिर्भरता मिळविण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे.

## म. प्रदेशः गॅस टँकरची दोन वाहनांच्या धडकेत ७ जणांचा मृत्यू, ३ जखमी

भोपळ, १३ मार्च : मध्य प्रदेशातील धार जिल्ह्यात एक भीषण अपघात घडला आहे. बदनावर-उज्जैन महामार्गावरील बामनसुता गावाजवळ एका पेट्रोल टँकरनं पिकअप आणि कारला धडक दिली. या अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ३ जण जखमी झाले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी(दि. १२)रात्री ११ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. बदनावर-उज्जैन महामार्गावरील बामनसुता गावाजवळील रस्त्यावर चुकीच्या दिशेने एक गॅस टँकर येत होता. यादरम्यान, टँकरने विरुद्ध दिशेने येणाऱ्या कार आणि जीपला धडक दिली. या अपघातानंतर ट्रकचालक घटनास्थळावरून पळून गेला, असे धारचे एसपी मनोज कुमार सिंह यांनी सांगितले. या अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाल्याचे धारच्या एसपींनी सांगितले आहे. तर, नंतर इतर ३ जणांचा रुग्णालयात मृत्यू झाला. तर ३ जखमींना तातडीने रुग्णालयात दखल करण्यात आले.त्यांच्यावर उपचार चालू आहे.

प्रत्यक्षदर्शींनी तत्काळ बडनावर पोलिसांना अपघाताची माहिती दिली. या अपघाताची माहिती मिळताच वरिष्ठ अधिकारीही बचावकार्य सुरू करण्यासाठी घटनास्थळी पोहोचून जखमींना बाहेर काढलं आणि उपचारासाठी रुग्णालयात पाठवलं. स्थानिक नागरिकांनी या बचाव कार्यात मदत केली. यावेळी, अडकलेल्या लोकांना क्रेनच्या मदतीने वाहनांमधून बाहेर काढण्यात आले.

## भारताने पकडला अमेरिकेचा मोस्ट वाँटेड आरोपी

तिरुअनंतपुरम : सीबीआयने केरळ पोलिसांसोबत संयुक्त कारवाई केली आणि तिरुअनंतपुरममधून अमेरिकेच्या मोस्ट वाँटेड आरोपीला अटक केली. सध्या भारतातील कोठडीत असलेल्या या आरोपीला लवकरच अमेरिकेच्या ताब्यात दिले जाणार आहे. लिथुआनियाचा नागरिक असलेला अलेक्सज बेसीकोव आणि रशियाचा नागरिक असलेला अलेक्झांडर मिरा सर्डा या दोघांवर अमली पदार्थांच्या तस्करांना, अमली पदार्थांच्या व्यापाऱ्यांना आणि अतिरेक्यांना वित्तपुरवठा करण्यासाठी क्रिप्टोकरन्सीचा वापर केल्याचा आरोप आहे. मागील अनेक दिवसांपासून अमेरिका बेसीकोव आणि अलेक्झांडर मिरा सर्डा या दोघांना शोधत आहे. हे आरोपी भारतात केरळमध्ये असल्याची माहिती मिळाल्यानंतर सीबीआयने केरळ पोलिसांच्या मदतीने संयुक्त कारवाई केली. लवकरच दोन्ही आरोपींना अमेरिकेच्या ताब्यात दिले जाण्याची शक्यता आहे.



लिथुआनियाचा अलेक्सज बेसीकोव आणि रशियाचा अलेक्झांडर मिरा सर्डा हे दोघे २०१९ पासून गॅरंटेक्स नावाच्या क्रिप्टोकरन्सी एक्सचेंजचा कारभार हाताळत होते. गॅरंटेक्समध्ये आतापर्यंत ९६ अब्ज डॉलरपेक्षा जास्त व्यवहार झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. अलेक्सज बेसीकोव हा गॅरंटेक्सशी संबंधित तांत्रिक बाजू हाताळत होता तर अलेक्झांडर मिरा सर्डा गॅरंटेक्सचा सहसंस्थापक आणि मुख्य वाणिज्य अधिकारी म्हणून कार्यरत होता. या प्रकरणात सखोल तपासातून आणखी माहिती हाती येईल.

आर्थिक अफरातफर करण्यासाठीही गॅरंटेक्स नावाच्या क्रिप्टोकरन्सी वापर होत असल्याचा आरोप होत आहे. आरोपी बेकायदा पद्धतीने विनापरवाना गॅरंटेक्स वापरत होते. गॅरंटेक्सद्वारे पैशांची एका देशातून दुसऱ्या देशात रवानगी होत होत होती. या व्यवहारांवर कर दिला नव्हता. बराच काळ सरकारकडे या व्यवहारांची ठोस माहिती पण उपलब्ध नव्हती. याचाच गैरफायदा बेकायदा व्यवहारांसाठी केला जात होता. आरोपींना क्रिप्टोकरन्सी प्रकरणात किमान २० वर्षांची शिक्षा होऊ शकते. काही आंतरराष्ट्रीय नियमांचे आणि करारांचे उल्लंघन केल्याचाही ठपका आरोपींवर आहे. या प्रकरणांमध्येही दोषी आढळल्यास प्रत्येक प्रकरणासाठी आरोपींना पाच - पाच वर्षांपर्यंतची शिक्षा होऊ शकते. यामुळे आरोप सिद्ध झाले तर आरोपींचा प्रदीर्घ काळासाठीचा मुक्काम तुरुंगातच असेल.

## तपासण्यासाठी आणलेले बारावीचे पेपर घरात जळून खाक

विरार : पालघर जिल्ह्यातील विरारमध्ये राहणाऱ्या एका शिक्षिकेने बारावीचे ओसी विषयाच्या उत्तरपत्रिका तपासण्यासाठी घरी आणल्या होत्या. पण घरात आग लागली. आग लागल्यामुळे बारावीच्या उत्तरपत्रिका जळून खाक झाल्या. ही घटना विरारमधील बोळींज नानभाट येथील गंगूबाई अपार्टमेंट येथे घडली. उत्तरपत्रिका या शाळा आणि महाविद्यालयात (कॉलेज) तपासणे बंधनकारक आहे. हा नियम असूनही शिक्षिकेने निवडक उत्तरपत्रिका घरी आणल्याच कशा हा प्रश्न उपस्थित होत आहे. तसेच या मुळे ज्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका जळाल्या आहेत त्यांच्या निकालावर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

## 'पीओपी' मूर्ती संदर्भात अभ्यासगट स्थापन : पंकजा मुंडे

मुंबई : गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाची मदत घेण्यात येणार आहे, अशी माहिती पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानसभेत दिली. विधानसभा सदस्य चंद्रकांत नवघरे, वरूण सरदेसाई यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती.

पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीचे जलस्रोतामध्ये करण्यात येणाऱ्या विसर्जनामुळे जलप्रदूषणाच्या अनुषंगाने उच्च न्यायालयाच्या निर्देशासनुसार केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पीओपी मूर्ती विसर्जनासंदर्भात नव्याने मार्गदर्शक सूचना जारी करून या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यासंदर्भात सर्व राज्यांना निर्देश दिले होते. त्यानुसार राज्य शासनाने पीओपी मूर्ती उत्पादन, विक्री आणि विसर्जनास बंदी घातली आहे.

पीओपी मूर्ती मधील प्रदूषणकारी घटक कमी करणे शक्य होईल का याची पडताळणी करण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक समिती गठीत करण्यात आली आहे. काही वैज्ञानिक संस्थांचे म्हणणे आहे. पीओपी मूर्तीमुळे प्रदूषण होत नाही. राज्य सरकारने यासंदर्भात वैज्ञानिक पुरावे मागवले आहेत. याचा अभ्यास करण्यासाठी आयोगाकडे विनंती करण्यात आली आहे. प्राप्त अहवाल केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे पाठवले जातील आणि शास्त्रीय दृष्टिकोनातून पर्यावरणपूरक आणि पारंपरिकतेला धक्का न लावता सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असेही पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे त्यांनी विधानसभेत सांगितले.

## अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे सन २०२५-२६ आर्थिक वर्षाचे ५२ कोटी अंदाजपत्रक सादर

नगर : अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे ५२ कोटी ५४ लाख ९० हजार ४२६ रुपयांचे मूळ अंदाजपत्रक सादर करण्यात आले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी अंदाजपत्रक जाहीर केले.

यात जिल्हा परिषद शाळेत ओपन सायन्स पार्क उभारणी, मिशन आरंभ, सुरभि सुरक्षा अभियानासह ड्रोन फवारणी यंत्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र इमारतीवर सौर ऊर्जा प्रणाली स्थापित करणे यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. यावेळी मुख्य लेखा वित्त अधिकारी शैलेश मोरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, दादाभाऊ गुंजाळ, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी राजू लाकूडझोडे, लेखाधिकारी योगेश आंबरे, महेश कावरे, डॉ बापुसाहेब नागरगोजे, मनोज ससे, भास्कर पाटील, अशोक कडुस, दशरथ दिघे, सहाय्यक लेखाधिकारी विजय बर्डे, भगवान निकम आदी उपस्थित होते.

अंदाजपत्रकात जिल्हा परिषद शाळांमध्ये ओपल सायन्स पार्क विकसित करण्यासाठी ५० लाख रुपये, मिशन स्पार्क अंतर्गत थुंबा केरळ येथे विक्रम साराभाई स्पेस सेंटर, इसरो, आयआयएस, डीआरडीओ अशा संशोधन संस्थांमध्ये गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहली आयोजित करण्यासाठी २८ लाख ५० हजार रुपये, मिशन आरंभ अंतर्गत इयत्ता ३ री, ४ थी शिष्यवृत्ती परीक्षेच्या पूर्वतयारी पुस्तिका छापणे, इयत्ता ४ थी व ७ वी सराव परीक्षा घेणे तसेच गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप करणे व ऑनलाईन तासिकांसाठी ६ लाख रुपये आदी तरतूदी अंदाजपत्रकात करण्यात आल्या आहेत.

## मालवण, पालघरच्या समुद्रात सापडले खनिज तेलसाठे

सिंधुदुर्ग : मालवण येथील खोल समुद्रात सुमारे १९ हजार १३१. ७२ चौरस किलोमीटर क्षेत्रफळावर नवीन खनिज तेलसाठे सापडले आहेत. नव्याने झालेल्या संशोधनात मालवणबरोबरच पालघर जिल्ह्याच्या सागरी कक्षेतही तेलसाठे सापडले आहे. संबंधित क्षेत्रात केंद्रीय तेल उत्पादन कंपन्या लवकरच संशोधनाद्वारे उत्खनन करणार आहे. तर या सगळ्या संशोधनाबाबत स्थानिक प्रशासन मात्र अनभिज्ञ आहे.



समुद्रातील खनिज तेलसाठ्यांबाबत भारतात दिर्घकाळ संशोधन सुरु आहे. याचाच भाग म्हणून गेली आठ वर्षे अरबी समुद्रात संशोधन सुरु होते. यात आता १८ हजार चौरस किलोमीटर क्षेत्रफळाहून अधिक क्षेत्रात खनिज तेलाचे नवे साठे समोर आले आहेत. पालघरमधील डहाणूच्या समुद्रात ५३३८ आणि सिंधुदुर्गजवळील मालवण समुद्रात १९ हजार १३१ चौरस किलोमीटर क्षेत्रफळावर हे तेलसाठे आहेत. हे साठे उथळ समुद्रात आहेत. त्यांचे किनाऱ्यापासूनचे अंतर ८६ सागरी मैल इतके आहे. त्या ठिकाणी केंद्रीय तेल उत्पादन कंपन्या लवकरच संशोधनाद्वारे उत्खनन करणार आहेत.

दरम्यान, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील समुद्रामध्ये तेलसाठे आढळल्याबाबत जिल्हा प्रशासनाने अद्याप अधिकृत दुजोरा दिलेला नाही. मालवणच्या खोल समुद्रात नवीन तेलसाठे सापडले असल्याची माहिती मिळाली आहे; मात्र, संबंधित विभागाकडून आपल्याकडे याबाबत कोणताही अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. याबाबतची अहवाल मिळताच सविस्तर माहिती प्रसार माध्यमांना दिली जाईल, असे वर्षा झालटे, तहसीलदार, मालवण यांनी सांगितले आहे.

अरबी समुद्रात तेलसाठ्यांसाठी अनेक वर्षे संशोधन सुरु आहे. मुंबईपासून ७५ सागरी मैल अंतरावर १९७४ मध्ये 'बॉम्बे हाय' या ठिकाणी खनिज तेलाचा साठा सापडला होता. त्या ठिकाणाहून सध्या तेल उत्खनन होत आहे. आताच्या या नव्या संशोधनामुळे महाराष्ट्रात तेल उत्पादन क्षेत्रात खूप मोठी भर पडेल.तसेच भारतातील तेल उत्पादन चार पटीने वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.या संशोधन व उत्खनन कार्याला गती देण्यासाठी केंद्रीय पेट्रोलियम मंत्रालयाने जोरदार प्रयत्न सुरु केले आहेत. या नवीन साठ्यामुळे अर्थव्यवस्थेला साहाय्य होण्यास मदत होणार आहे.

## लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने समन्वयाने योजनांची अंमलबजावणी करावी : राधाकृष्ण विखे-पाटील

मुंबई : शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम लोकप्रतिनिधी करत असतात. सर्व विभागांच्या योजनांची अंमलबजावणी प्रशासन उत्कृष्ट पद्धतीने करत आहे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने योग्य समन्वय साधून योजना तसेच प्रकल्पांची अंमलबजावणी करावी, असे निर्देश जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिले.



मंत्रालयातील सभागृह परिषद येथे अहिल्यानगर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांच्याकडून प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत श्री. विखे-पाटील बोलत होते. यावेळी राहुरी मतदारसंघाचे आमदार शिवाजी कर्डिले, शेवगाव मतदारसंघाच्या आमदार मोनिका राजळे, पारनेर मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते, नेवासा मतदारसंघाचे आमदार विठ्ठल लंघे, संगमनेर मतदारसंघाचे आमदार अमोल खताळ, श्रीगोंदा मतदारसंघाचे आमदार विक्रम पाचपुते, अकोल मतदारसंघाचे आमदार डॉ. किरण लहामटे, अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे तर दूरदृश्य प्रणालीद्वारे पोलीस अधीक्षक राकेश ओला तसेच जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जलसंपदा मंत्री श्री. विखे-पाटील म्हणाले की, जिल्हा परिषदेअंतर्गत तालुक्याच्या ठिकाणी काही आरोग्य उपकेंद्रांची कामे पूर्णत्वास येत आहेत. अशा उपकेंद्रांची माहिती घेऊन ती हस्तांतरित करावीत. तसेच नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या उभारणीसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करावेत. जलजीवन मिशन अंतर्गत योजनांचा आढावा घ्यावा. पिण्याच्या पाण्याच्या टँकरची मागणी वाढत आहे याबाबत जिल्हा प्रशासनाने बैठकीचे आयोजन करून टँकरचे नियोजन करावे.

जिल्ह्यातील ज्या प्रशासकीय विभागांचे प्रलंबित विषय आहेत. ते मार्गी लावण्यासाठी त्या विभागांच्या मंत्रीमहोदयांकडे बैठका घेऊन विषयांचा निपटारा करण्यात येईल. यासाठी जिल्हा प्रशासनाने तालुकानिहाय आढावा बैठका घ्याव्यात. या बैठकांच्या माध्यमातून योजना प्रकल्पांची माहिती लोकप्रतिनिधींना उपलब्ध करून द्यावी, असे श्री.विखे-पाटील यांनी सांगितले.

## सुनीता विल्यम्सना परत आणण्याची नासाची आणखी एक योजना फसली, क्रू-१० यानाचं लॉंचींग रद्द

वॉशिंगटन , १३ मार्च : गेल्या काही महिन्यांपासून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर अडकले आहेत. त्यांना पुन्हा परत पृथ्वीवर आणण्यासाठी नासाने प्रयत्न सुरू केले आहेत.या दोघांनाही पृथ्वीवर परत आणण्यासाठी क्रू-१० मोहीम सुरू केली जाणार होती, ज्याद्वारे या दोघांच्या जागी ४ अंतराळवीरांना अवकाशात पाठवले गेले असते, परंतु आता तांत्रिक बिघाडामुळे क्रू-१० मोहीम रद्द करण्यात आली आहे. याआधी नासाने १३ मार्चपर्यंत सुनीता विल्यम्स यांना परत आणणार असं जाहीर केलं होतं.



नासाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर अंतराळात दीर्घकाळ राहिल्यानंतर अखेर पृथ्वीवर परतण्याची तयारी करत आहेत. त्यांचे मिशन फक्त दहा दिवस चालणार होते, पण बोईंगच्या स्टारलाइनर अंतराळयानातील तांत्रिक अडचणींमुळे ते जवळजवळ दहा महिने लांबले. नासा-स्पेसएक्स क्रू-१० मोहिमेला घेऊन जाणारे फाल्कन ९ रॉकेट बुधवारी(दि. १२) संध्याकाळी ७:४८ वाजता फ्लोरिडा येथील केनेडी स्पेस सेंटरवरून उड्डाण करणार होते. ज्यामध्ये युनायटेड स्टेट्समधील दोन अंतराळवीर, एक जपान आणि एक रशियाचा चार जणांचा क्रू होता. क्रू-१० मिशनचा मूळ हेतू नियमित अंतराळवीर रोटेशनचा होता. छ-ड- ने सुरुवातीला २६ मार्च रोजी क्रू-१० चे प्रक्षेपण नियोजित केले होते, परंतु स्पेसएक्स कॅप्सूलची अदलाबदल करून मोहिमेला वेग आला.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

आनंदाचे डोही

अपर्णा कुळकर्णी / ९४२१२१२४४८

# अवचित आनंदाचे मोती



मानवी जीवन म्हणजे एक अनाकलनीय कोडं! कितीतरी गोष्टी आपण ठरवूनसुद्धा होत नाहीत आणि न ठरवताही काही गोष्टी अवचित घडून येतात. मनात कुठेतरी हव्याहव्याशा असणाऱ्या काही गोष्टी आकस्मिक जुळून येतात आणि अवचित आनंदाच्या मोत्यांनी आपली ओंजळ भरून जाते. प्रसन्नतेच्या रंगछटा जीवन सौंदर्य वाढवतात. त्यामुळे जीवनातील इतर नकोशा, दुःखद गोष्टींची, घटनांची तीव्रता नकळत कमी होते किंवा ते सहन करण्याची शक्ती सहजच लाभते. अरे वाह! असे सुखद क्षण आपल्याही वाट्याला येतात, या आल्हाददायी विचाराने मन प्रमुदित होते. त्यामुळेच बरेवाईट सोसण्याची ऊर्जा मनाला प्राप्त होते. आयुष्य हे भल्या बुऱ्या घटनांचे अद्भुत जाळे आहे. त्यातील सुखदायक घटनांचे धागे घट्ट पकडून जीवन प्रवास करण्यातील खरी मौज अनुभवता यायला हवी.

अगदी ताजे उदाहरण घ्यायचे तर कित्येकांच्या आयुष्यात स्वतः न ठरवताही स्नेह धाग्यांनी गुंफलेल्या कोणातरीमुळे अवचित महाकुंभ दर्शन, स्नानाचा अमृत योग घडून आला. मनीमानसी नसतानाही, स्वर्गसुख लाभल्याची भावना मनी उचंबळून आली. या गर्दीत आपण कसे जाणार? म्हणून जाण्याचा विचारसुद्धा ज्यांच्या मनाला स्पर्शला नव्हता, त्यांच्या पदरात आनंदाचे अनमोल दान पडले. हे असे योग जीवनात बहार आणतात, होय ना!

*'क्षण एक इवलाही हसरा नाचरा,*
*होतो आनंदाचा खळाळता झरा'*

असे खळाळते झरे आनंदाची सरिताच आपल्या जीवनात प्रवाहित ठेवतात. आपण पर्यटनाला निघताना आपल्या स्थळ दर्शनाच्या यादीत समाविष्ट नसलेले एखादे स्थळ स्थानिकांच्या सांगण्यावरून किंवा गूगलबाबाच्या कृपेने बघायला मिळते. कधी वेळेअभावी सोडून द्यायचे ठरवलेले ठिकाण अगदी जवळच तर आहे. चला तर जमवू या, म्हणत जमवल्या जाते तेव्हा 'जमवलं बुवा'चा आनंद खासच असतो. मग तेथील निसर्ग संपदेने, विलोभनीय दर्शनाने मन भारावून गेले तर 'सोने पे सुहागा'! यासाठीच तर केला होता ना सारा अट्टाहास, अशी स्वप्नील पूर्तता गिरकी घेऊन आनंद लता बहरते. अवचित लाभलेल्या या निसर्ग दर्शनाने, सान्निध्याने सृष्टीच्या चैतन्याशी एकरूप होण्याचा सोहळा रंगतो. त्याचा आनंद तर काही औरच असतो.

अशा अवचित लाभलेल्या आनंददायी गोष्टींनी आपलं मानसिक स्वास्थ्य सुदृढ राहतं. भावनिक संतुलन टिकायला मदत होते म्हणून, याकडे अधिक सजगतेने बघून जीवनात सकारात्मकता पेरत, जगण्याचा आनंद मिळवत राहायला हवे.

इतक्यातच आम्ही १०-१२ जण कन्याकुमारीला जात असताना आमची ट्रेन, रूट बदलल्याने चक्क १२ तास लेट झाली. आश्चर्य म्हणजे कोणीही त्रागा, उद्वेग न करता खेळगप्पांतून, एकमेकांशी सुसंवाद प्रस्थापित करत, वेळेचा सदुपयोग तर केलाच. पण, एवीतेवी उशीर झालाच आहे तर, चला मदुराईला उतरून श्री मीनाक्षी देवीचे दर्शन घेऊ, असा निर्णय घेतला. देवीच्या दर्शनाने प्रवासाचा शीण तर पळून गेलाच पण, जे आम्ही ठरवून निघालोच नव्हतो त्याचा लाभ झाल्याने मन आनंदाच्या झोपाळ्यावर झुलू लागले. किती छान योग आला ना आपल्या आयुष्यात, असे म्हणत सर्वांनी तो क्षण जगून घेत हृदयकुपीत साठवून ठेवला. आपल्या आयुष्याच्या बहुरंगी वस्त्रावर अशी जरतारी हसऱ्या नाचऱ्या मोराची नक्षी चितारत राहण्यातला, अपूर्व आनंद अनुभवणे ही एक कलाच असावी नाही का?

मला केरळमधील पूव्हर येथे बरेच दिवसांचे जायचे होते. पण, या वेळी फक्त पद्मनाभ दर्शन करून संध्याकाळी शिबिरास प्रारंभ करायचा असल्याने मनातून पूव्हर बाजूला सारले. दुसऱ्या दिवशी कन्याकुमारीहून पद्मनाभसाठी गाडी ठरवली तेव्हा ड्रायव्हर साहेब स्वतःहूनच म्हणाले,'रस्त्यात तुम्हाला एक-दोन छान स्थळांना भेट देण्यास घेऊन जाईन.' आम्ही तर सुरवातीला नकारच दिला. आम्हाला पद्मनाभ स्वामींचे दर्शन घेऊन लगेच शिबिरासाठी पोहचायचे आहे, असे त्याला सांगितले. त्याने दिलासा दिला की, आज श्री पद्मनाभ मंदिरात तुम्हाला दर्शनाला खूप वेळ लागणार नाही. हो-नाही करत दोनपैकी एकच स्थळ आम्हाला दाखव म्हणत, आम्ही त्याला थोडी सहमती दर्शवली. गाडी पूव्हर येथे थांबल्यावर कोण आनंद झाला म्हणून सांगू! मनी आनंदाची कारंजी थुई थुई नाचू लागली. तेथील खारफुटी जंगलातून बोटींगचा आनंद घेत समुद्रकिनाऱ्यावर थोडा वेळ खेळून दर्शनास निघालो. ही अवचित सामोरी आलेली आनंद पर्वणी, मनाच्या शिंपल्यात मोती बनून, कायम स्वरुपी स्थिरावली. श्री पद्मनाभ स्वामींचे दर्शनही वेळेत होऊन, आम्ही शिबिरस्थळी अती उत्साहात दाखल झालो. इतक्या तासांचा प्रवास करूनही आपण फिरतोय याचा विसर पडून, आनंदाने ऊर्जाप्राप्तीच झाली.

असे अवचित आनंददायी काही ना काही घडून येत, प्रत्येकाच्याच आयुष्यात आनंदाची फुले उमलत राहतात. त्यांच्याकडे बघण्याचे सुयोग्य भान ठेवले की, या अवचित आनंदाचा मोहोर जीवनवाट समृद्ध करतो.

*न्यूनता न देख 'ज्ञान' देख पूर्णता।*
*पूर्ण है कृपा प्रसाद मान धन्यता ॥*
*चरणों में अस्तु कोटि धन्यवाद हैं।*
*जो मिला हमें यहाँ वही प्रसाद है॥*

असे भाव असले तर निश्चितच वाटेवर अवचित आनंद मोती लाभतात. ते जमा करत, एक सुंदरशी आठवांची माळ घालून मन प्रफुल्लित ठेवता येते. रंग भावनांचे प्रसन्न आणि गहीरे भासतात. अशा फुलपाखरी रंग ठशांनी मनमोर हर्षित होतो. मनीमानसी नसताना आपल्या मनास हवे ते, अवचित अनपेक्षितपणे घडून आले की, आनंदाचे डोही आनंद तरंग अनुभवायास मिळतोच पण, त्या तरंगांनी मनाला उभारी मिळत राहते. आपल्या पाठीशी गुरूंचे, आईवडिलांचे आशीर्वाद, वैश्विक किंवा निसर्गशक्ती आहे, हा विश्वास जगण्याला बळ देतो.

# 'त्या' दोन वीरांगना

शुभांगी गान/ ८६५७४२४०७१

इतिहासाच्या पानावर असणाऱ्या काही वीरांगनांची नावे इतिहासाला ज्ञात नाहीत पण, त्यांनी दाखवलेल्या अचाट साहसाने इतिहास गौरवान्वित झालाय, हे मात्र निश्चित! रणथंबोर हा राजपुतान्यातला एक सशक्त किल्ला! तिथला सरदार सुरजन सिंग हाडा! त्याच्या मृत्यूनंतर त्याची विधवा आणि सौंदर्यवती युवा पुत्री यांनी ज्या साहसाने पुढील लढा दिला त्यांची ही शौर्य कथा!

वर्ष १५६७ मध्ये दिल्लीवर अकबर बादशहाची हुकूमत होती. राज्यविस्तार हे धोरण अवलंबून त्याची नजर आता मेवाडकडे वळली होती. चितोडचा बलाढ्य किल्ला त्याला हवा होता. या वेळेस मेवाडवर महाराणा उदयसिंह राज्य करीत होते. चित्तोड आमच्या स्वाधीन करावा अन्यथा युद्धासाठी तत्पर व्हा, असा संदेश अकबराने त्यांना दिला होता. पण, महाराणा उदयसिंह पराक्रमी होते. त्यांनी अकबराची ही मागणी वारंवार अमान्य केली होती. संतापलेल्या अकबरने प्रचंड मोठी सेना घेऊन, चितोडवर आक्रमण केलं. राजपूत सैन्याने आणि महाराणा उदयसिंगांनी पराक्रमाची शर्थ केली पण, अकबराच्या प्रचंड मोठ्या सैन्यापुढे आता आपण टिकाव धरू शकत नाही, याची त्यांना जाणीव झाली. आता महाराणांसमोर दोनच पर्याय होते. एक तर युद्ध करताना रणांगणावर मृत्यू स्वीकारायचा किंवा मग चितोड सोडून निघून जायचं. महाराणांनी पहिला मार्ग स्वीकारला मात्र, त्यांच्या सरदारांनी महाराणांनी चितोड सोडून काही काळ निघून जावं आणि परत सेनेची जमवाजमव करून, अकबराला मात द्यावी असा सल्ला दिला. अत्यंत दुःखी अंत:करणाने फत्तेसिंह, जयमल सिंह आणि सुरजन सिंह हाडा या सरदारांवर चित्तोडच्या संरक्षणाची कमान सोपवली आणि ते स्वत: अरावली पर्वतावर निघून गेले.

**मागे राहीलेल्या राजपुतांनी पराक्रमाची शर्थ केली पण, चित्तोड पडला होता. निर्ममतेने स्त्रिया-मुलांची प्रचंड प्रमाणात कत्तल झाली. अकबराने आपला एक सरदार चित्तोडवर ठेवून, त्याला आजूबाजूचे किल्ले आपल्या ताब्यात घेण्याचा आदेश दिला आणि तो महत्त्वाकांक्षी सरदार या मोहिमेवर निघाला. मार्गात येणारा सर्वात महत्त्वाचा किल्ला 'रणथंबोर'! अतिशय दुर्गम आणि डोंगरावर उभा असलेला किल्ला अभेद्य होता. या दुर्गावर सुरजनसिंह हाडा जो चित्तोड लढताना मारला गेला होता, त्याची विधवा पत्नी आणि त्याची युवा मुलगी अशा दोघींना हा किल्ला प्राणप्रणाने लढवायचा होता.**



मागे राहीलेल्या राजपुतांनी पराक्रमाची शर्थ केली पण, चित्तोड पडला होता. निर्ममतेने स्त्रिया-मुलांची प्रचंड प्रमाणात कत्तल झाली. अकबराने आपला एक सरदार चित्तोडवर ठेवून, त्याला आजूबाजूचे किल्ले आपल्या ताब्यात घेण्याचा आदेश दिला आणि तो महत्त्वाकांक्षी सरदार या मोहिमेवर निघाला. मार्गात येणारा सर्वात महत्त्वाचा किल्ला 'रणथंबोर'! अतिशय दुर्गम आणि डोंगरावर उभा असलेला किल्ला अभेद्य होता. या दुर्गावर सुरजनसिंह हाडा जो चित्तोड लढताना मारला गेला होता, त्याची विधवा पत्नी आणि त्याची युवा मुलगी अशा दोघींना हा किल्ला प्राणप्रणाने लढवायचा होता. किल्ल्यावरचं सैन्यबळ अत्यंत कमी होतं. अकबराच्या सेनेने किल्ल्याला चारी बाजूंनी वेढा दिला होता. किल्ला तर त्यांना लढवायचा होताच पण, त्याहीपेक्षा महत्त्वाची होती एक तलवार ! पिढ्यानपिढ्या त्यांच्या वंशजांनी जपलेली, महाराणा कुंभाने त्यांच्या वंशजांना भेट दिलेली रत्नजडित तलवार त्यांना प्राणप्रणाने जपायची होती. प्रत्येक पिढी ही तलवार प्राणप्रणाने जपत होती पण, आता दोघेही चिंतातुर झाल्या होत्या. एक तर रणथंबोर लढवायचा आणि त्या समशेरीचं प्राणपणाने संरक्षण करायचं. दुर्गावरची रसद संपत आली होती .काहीतरी निर्णय घेणं अत्यावश्यक होतं. त्या रात्री मुलीने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आणि तिने तो आईला सांगितला. ती आई अत्यंत व्यथित झाली पण, काहीही इलाज नव्हता. त्या रात्री चौघांनी तिला अत्यंत दुःखी अंतकरणाने निरोप दिला. दोराच्या सहाय्याने ती किल्ल्यावरून खाली उतरली आणि उतरताना आईला म्हणाली 'भेटू लवकरच स्वर्गात'!

प्रात:काळी एक अत्यंत मळकट कपड्यातला मुलगा, डोक्यावर खूप मोठा गवताचा भारा घेऊन, मोगल शिबिराच्या प्रवेशद्वारावर उभा होता. शिपायाने त्याला अडवलं तेव्हा त्यांनी उत्तर दिलं. 'सरदार इब्राहिम खानने त्याच्या घोड्यासाठी चारा मागवलाय.' अर्थात, शिपायाने त्याला जाऊ दिलं. पुढे परत एकदा दुसऱ्या प्रवेशद्वारावर दुसऱ्या पहारेकऱ्यांनी त्याला अडवलं आणि त्या मुलाचा सुंदर चेहरा बघून तो म्हणाला,'माझ्याकडे नोकरी करशील?' मुलगा होकारार्थी उत्तर देत म्हणाला, 'मी जरूर येईन पण, माझी आई तीन दिवसांपासून उपाशी आहे तिला प्रथम भोजन मिळायला हवं. ते देऊन येतो पण मला कोणी अडवलं तर...' त्या शिपायाने त्याला एक चिठ्ठी दिली आणि म्हणाला,'ही चिठ्ठी दाखवली की, कोणी तुला अडवणार नाही.' आणि, खरंच पुढे त्याला कोणी अडवलं नव्हतं. मोगल शिबिर पार करून तो बाहेर पडला. समोर अरावली पर्वताचं भव्य टोक होतं. तो प्रचंड थकला होता. त्याने काही लाकडं आणि पालापाचोळा टाकून आग पेटवली. आगीच्या त्या ज्वाला बघून सुरजनसिंह हाडाची पत्नी समजली की, आपली मुलगी मोगल शिबिराबाहेर सुखरूप पोहोचली. एक ध्येय साध्य झालं होतं. पण, रणथंबोरचं पतन मनाला दुःखी करत होतं. ठाकरा नावाच्या सदरादाराकडून तिला कळलं की, गडावर फक्त ३६ सैनिक उरले होते. रसद आणि शस्त्रं सर्व संपुष्टात आले. आता स्त्रियांनी जोहार आणि उरलेल्यांनी शाका म्हणजे शेवटचा वार करायचा. त्यांनी लढण्याचा अंतिम निर्णय घेतला आणि सरदार पत्नीने आत्मबलिदानाचा! दुर्दम्य पण दुर्दैवी रणथंबोरने आणखी एक जोहार बघितला होता.

याच क्षणी तिची कन्या डोंगर चढत होती. आपल्या जवळची ही अमानत तिला अशा ठिकाणी ठेवायची होती जिथून ती कोणालाही मिळू शकणार नाही. थकल्या शरीराने आणि पावलांनी चढताना अचानक समोरून सरसरत बाण आला. काही क्षणातच महाराणा उदयसिंह तिच्यासमोर उभे होते. ती प्रचंड थकली होती पण, समोर महाराणांना बघून तिचे नेत्र हसले. कपड्यात गुंडाळून ठेवलेली समशेर तिने त्यांच्या स्वाधीन केली. ती ठेव आपण सुखरूप पोहचवली या आनंदातच तिने या जगाचा निरोप घेतला. मातेला दिलेलं वचन तिने पूर्ण केलं होतं. संकटांचा सामना करीत ही दुर्दम्य साहसी वीरांगना, तिच्या ध्येयाप्रत पोहचण्यात यशस्वी झाली होती.

अभिजात अमृत

प्रा. सुनंदा पाटील/ ८४२२०८९६६६

# सुश्लोक वामनाचा...

**चैतन्यं सुमनं मनं मनमनं मानं मनं वामनं**
**विश्वासार सरं सरसरं सारं सरं वासरं**
**मायाजाल धवं धवं धवधवं धावं धवं माधवं**
**वैकुंठाधिपते भवं भवभवं भावं भवं शांभवं ॥**

आज जी पिढी साठ वर्षांच्या वरची आहे, त्यांना वरील श्लोक आठवत असेल. माझे आजोबा म्हणजे आईचे बाबा, स्व. विठ्ठलराव देऊळवार हे पहाटे उठल्यानंतर अनेक श्लोक म्हणत अंगणात फेऱ्या मारायचे. दिवाळीच्या किंवा उन्हाळ्याच्या सुट्टीत आजीकडे गेले की, पहाटे अर्धजागृतावस्थेत असे अनेक श्लोक कानांवर पडत. हे सगळं लक्षात ठेवायला मला वेगळं काही करावंच लागलं नाही. श्रवणसुख अनुभवताना आपोआपच हे सारं पाठ होत गेलं. प्रस्तुत श्लोक अतिशय पूर्णमधुर आहे. श्रावण महिन्यात हा श्लोक दररोज म्हणावा, असं म्हणतात घरी पूजा करताना आणि संध्याकाळी देवाजवळ म्हणतो ते श्लोक, आख्यानांमधील श्लोक, मनाचे श्लोक या शिवाय अन्योक्तीमधील विविध वृत्तांमधील श्लोक अशी ही श्लोकांची खूप मोठी व्याप्ती आहे.

आज बघू या पंडिती काव्य ! वामन पंडित! वामन पंडितांचं नाव वामन नरहरी शेष! सतराव्या शतकात होऊन गेलेले हे मोठे कवी होत. त्यांचा कालखंड हा इ.स. १६०८ ते १६९५ असा सांगितला जातो. वामनपंडित हे अतिशय प्रतिभावंत कवी होते. भगवद्गीतेवरील टीका म्हणजे ऐश्वर्यवती ज्ञानेश्वरी आणि टिळकांचे गीतारहस्य ! पण, मधल्या काळात 'यथार्थ दीपिका' हा ग्रंथ वामन पंडितांनी लिहिला आहे.



**संस्कृतचा प्रगाढ व्यासंग असल्याने विविध अलंकार आणि वृत्त वापरून पंडितांनी अनेक श्लोकांची रचना केली. त्यांच्या असंख्य श्लोकांमुळेच 'सुश्लोक वामनाचा' असं म्हटलं जातं. श्लोक म्हटला की, वामन पंडितच आठवतात. यमक अलंकार त्यांच्या अतिशय आवडीचा! ते हा अलंकार अतिशय समर्थपणे हाताळीत. या अलंकारात त्यांचे अनेक श्लोक आहेत. म्हणूनच त्यांना 'यमक्या वामन' असंही म्हटलं जायचं.**

संस्कृतचा प्रगाढ व्यासंग असल्याने विविध अलंकार आणि वृत्त वापरून पंडितांनी अनेक श्लोकांची रचना केली. त्यांच्या असंख्य श्लोकांमुळेच 'सुश्लोक वामनाचा' असं म्हटलं जातं. श्लोक म्हटला की, वामन पंडितच आठवतात. यमक अलंकार त्यांच्या अतिशय आवडीचा! ते हा अलंकार अतिशय समर्थपणे हाताळीत. या अलंकारात त्यांचे अनेक श्लोक आहेत. म्हणूनच त्यांना 'यमक्या वामन' असंही म्हटलं जायचं. त्यांचा आणखी एक श्लोक बघू या!

**वंशी नादनटी तिला कटीतटी , घेवोनी पोटीपटी ।**
**कक्षे वामपुटी स्वशृंग निकटी , वेताटिही गोमटी ।**
**जेवी नीरतटी तरू तळवटी , श्री श्याम देही उटी ।**
**दाटी व्योमघटी सुरा सुख लुटी , घेती जरी धूर्जटी॥**

प्रस्तुत श्लोक हा शार्दुलविक्रिडीत वृत्तात आहे. हाही श्लोक मी मराठी पाचवीत असताना ऐकूनच पाठ झालाय. त्यातली शब्दरचना आणि साधलेला अनुप्रास श्लोक लक्षात ठेवायला मदत करते.

आता श्लोक म्हणजे काय? जरा व्याख्या बघू या! 'श्लोक म्हणजे चार ओळीत लिहिलेले एक पद किंवा ओळींचा एक संच! 'श्लोक हे छंदाच्या रूपात असतात. म्हणजेच त्यात गती, यती आणि लय ही असतेच. छंदाच्या रुपात असल्याने श्लोक सहज लक्षात राहतात. आपण मराठी श्लोकांसंबंधी विचार करतोय. संतकाव्य लोकांच्या मनात एक पक्के स्थान घेऊन बसले. त्याच दरम्यान पंडिती काव्याचा उगम झाल्याचे दिसते.

यात, वामन पंडित आणि रघुनाथ पंडित यांचे नाव अग्रस्थानी आहे. रघुनाथ पंडित हे वामन पंडित/ मोरोपंत यांचेच समकालीन मराठी कवी ! विद्वान अशा मराठी कुळात त्यांचा जन्म झाला. त्यावेळी मराठी कविता अशा एका टप्प्यातून जात होती की, त्यात धार्मिक कथाबिजे अधिक होती. कवितेवर संस्कृत भाषेचा अधिक प्रभाव असल्यामुळे समकालीन लोकांमध्ये हे साहित्य सर्वांनाच समजेल असं नव्हतं.

मात्र, श्लोक हा गाण्याच्या स्वरूपाचा एक भाग आहे, जो कथा पुढे नेतो. श्रोत्यांना गाण्याबद्दल अधिक सखोल माहिती देतो, समज देतो. आपण अनेक ग्रंथांमध्येही हे श्लोक बघतो. उदाहरणच द्यायचं झालं तर 'श्री गजानन विजय' या संत गजानन महाराजांच्या पोथीत जागोजागी श्लोक आहेत. एखादी ओवी संपली की पुढे श्लोक आणि त्याचे वृत्त असे लिहिले असते. चार चरणांचा श्लोक लिहिलेला असतो.

रघुनाथ पंडित यांचं 'नल दमयंती स्वयंवराख्यान','गजेंद्रमोक्ष' ही अतिशय प्रसिद्ध अशी दीर्घकाव्ये आहेत. इथे वृत्त आणि अलंकारांची रेलचेल दिसते. मला एक गोष्ट इथे नमूद करावीशी वाटते की, शाळेत अलंकार आणि वृत्त शिकवताना अनेकदा फक्त आणि फक्त रघुनाथ पंडित यांच्याच 'नलदमयंती स्वयंवराख्यान' यातील श्लोकांचा वापर केला जाई. त्यामुळे, आमचं जेवढं मराठी व्याकरण पक्कं झालं, तेवढेच हे श्लोक पाठांतर न करताच पाठ झाले. अजूनही त्या श्लोकांनी आमची पाठ सोडली नाही.

वयाच्या पन्नाशी आणि त्यापुढल्या मराठी जाणणाऱ्या पिढीने रघुनाथ पंडितांचे श्लोक वाचलेलेच आहेत, अभ्यासले आहेत.

पुण्यश्लोक नृपावळीत पहिला होवोनी जो राहिला
जो राजा असता समस्त महिला विश्रांती शेषाहिला
व्यासोक्ते अवगाहिला बुधजनी नाना गुणी गायिला
जो नामे नळ तत्कथौध अवधे तो पाहिजे पाहिला
(शार्दुलविक्रिडीत)

या सुरुवातीनंतर ही स्वयंवराची कथा पुढे सरकते. नळराजाची हंसाशी झालेली भेट आणि त्याचे वर्णन अतिशय सुरेख आहे. मालिनी, शिखरिणी, वसंततिलका, शार्दुलविक्रिडीत, मंदारमाला, पृथ्वी, इंद्रवज्रा, उपेंद्रवज्रा आणि अशा कितीतरी वृत्तांमध्ये हे श्लोक आहेत. स्वभावोक्तीपासून अनेक अलंकार यात आहेत. एक उदाहरण देते.

**तया वनी एक तटाक तोये**
**तुडंबले तामरसा न पाये**
**निरंतरा मंद मरंद वाहे**
**तपातही यास्तव रिक्त नोहे**
**(उपेंद्रवज्रा)**

**वरील श्लोकात वनातील सरोवराचे सुंदर वर्णन आहे .**

**टाकी उपानह पदे अतिमंद ठेवी**
**केली विजार वरी डौरही मौन सेवी**
**हस्ती करी वलय उंच अशा उपायी**
**भूपे हळूच धरिला कलहंस पायी**
**किंवा**
**तदितर खग भेणे, वेगळाले पळाले**
**उपवन जल केली जे कराया मिळाले**
**स्वजन गवसला जो त्याजपाशी नसे तो**
**कठिण समय येता कोण कामास येतो ?**

यातील शेवटच्या ओळीची कमाल म्हणजे ही एक म्हण झाली अन् शाळेत निबंधाचा एक विषय झाली.

याशिवायही अनेक श्लोकांची उदाहरणे देता येतील. 'अभिजात मराठी' मधील हा अमूल्य ठेवा पालकांनी जरूर आपल्या मुलांना द्यावा. आज इथेच थांबू या. श्लोक साहित्याचा पुढला भाग घेऊन पुन्हा भेटायला येते पुढील शनिवारी !

# 'दोन' डोळे म्हणी 'तीस'!

निकिता गावंडे / ९९७०६६३८१३

**आजही तू इतकी सुंदर दिसतेस की, डोळे दिपतात माझे. साठीतलं तुझं हे सौंदर्य डोळे भरून बघताना माझाच माझ्या डोळ्यांवर विश्वास बसत नाही बघ!**

'डोळे हे जुलमी गडे रोखून मज पाहू नका...' त्रिलोचनराव खिडकीबाहेर बघून गात होते. इतक्यात त्यांच्या बेसूर आणि जाड्या आवाजाने दचकून जागे होत नयनाताई म्हणाला,'काय हो तुमचं हे! जरा कुठे डोळा लागला होता तर लगेच तुमच्या डोळ्यात आलं बघा. आता हे असं मे महिन्यात भर दुपारी कुठे नजर गडवून बसला आहात? हे काही वय आहे का! तेही माझा डोळा चुकवून!' 'काय हे नयना!' त्रिलोचनराव तिच्या डोळ्यात डोळे घालून बघत म्हणाले. 'हे बघा माझ्या डोळ्यात धूळ फेकण्याचा प्रयत्न करू नका. तुमची प्रत्येक हालचाल मी झोपेतदेखील, डोळ्यात तेल घालून टिपत असते बघा.' नयना डोळे वटारून म्हणाली. तिचा हा पवित्रा डोळे विस्फारून बघत त्रिलोचन राव म्हणाले,'अगं माझी राणी, वीस वर्षे लग्नाची आणि त्या आधीची पाच असे तब्बल पंचवीस वर्ष तुझ्यावरच डोळे खिळवून बसलोय. आजही तू इतकी सुंदर दिसतेस की, डोळे दिपतात माझे. साठीतलं तुझं हे सौंदर्य डोळे भरून बघताना माझाच माझ्या डोळ्यांवर विश्वास बसत नाही बघ!' 'बस करा ही लाडीगोडी! कित्येकदा तुमच्या वागण्याकडे मी डोळेझाक करते. पण, अगदीच काही मी डोळ्यांवर कातडं ओढून बसलेली नाहीये. त्या समोरच्या बिल्डिंगीत ती गॉगलवाली राहायला आलीय ना! ती आल्यापासून तुम्ही असे खिडकीबाहेर डोळे फाडून बघत असता. सकाळ-संध्याकाळ बघावं तर तिच्या वाटेकडे डोळे लावून बसलेले असता. ती शेजारची नेत्रा सांगत होती मला! आता या वयात माझं कसं होणार या धाकानं रात्रभर डोळ्याला डोळ्याला लागत नाही माझा! फिटले हो माझ्या डोळ्याचे पारणे, या वयात तुमचे हे गुण बघून!' असे म्हणत नयनाताईने डोळ्याला पदर लावला.'अगं ए बाई! कॉलेजात असताना एकदा तुला डोळा मारला तेही तुझ्या मैत्रिणीच्या डोळ्यात खुपलं. भावाकडे चुगली केली तिने तुझ्या! साळेसाहेबांनी मला असा काही चोपला की, आजही त्याची आठवण जरी आली की, माझा उजवा डोळा लवतो. अगं, आता डोळ्यात मोतीबिंदू येण्याच्या वयात तू खिडकीचं काय घेऊन बसलीस? साधं खिडकीकडे लक्ष जरी केलं तरी तू काय म्हणशील याचा विचार करून, भीतीने डोळे पांढरे होतात माझे! कान आणि डोळे यांच्यात चार बोटांचं अंतर असतं. तेव्हा काही बाही ऐकीव गोष्टींचा विचार करू नकोस. लोकांचं काय, त्यांना दुसऱ्यांच्या डोळ्यातलं कुसळ दिसतं पण, स्वतःच्या डोळ्यातलं मुसळ दिसत नाही. ते बोलतच असतात. बघ, डोळ्यात वाच माझ्या तू गीत भावनांचे...!' 'गाणं पुरे हो. बरं झालं तुम्ही माझ्या डोळ्यात चांगलं झणझणीत अंजन घातलंत. डोळे उघडले माझे! अरे बापरे! डोळ्यात काहीतरी गेलंय वाटतं. जरा फुंकर घाला पाहू...!'



# सावकारी व्यवहारातील दस्त अवैध

## जिल्हा उपनिबंधक गणेश पुरी यांचे आदेश

नगर : सावकारी व्यवहारात लिहून दिलेले दस्त महाराष्ट्र सावकारी ( नियमन ) अधिनियम २०१४ चे कलम १८ (२) नुसार अवैध असल्याचे घोषित करण्यात आले आहे. याबाबतचे आदेश जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अ.नगर गणेश पुरी यांनी पारित केले आहेत.

याबाबत सविस्तर असे की, अभय रामलाल ललवाणी यांनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे सावकारी व्यवहारात लिहून दिलेले दस्त रद्द होणेबाबत दि. ०९ फेबुवारी २०२१ रोजी तक्रार अर्ज दिला होता. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ तील तरतुदीनुसार व्यवहाराची सखोल चौकशी करण्यात आली.

अर्जदार यांचे वडील रामलाल देवीचंद ललवाणी व शिवशंकर शांतीलाल भंडारी यांच्यातील २००५ साली झालेला व्यवहार हा अवैध सावकारीतून झाला असल्याचे सखोल चौकशीअंती निष्पन्न झाले. कायद्यातील तरतुदीनुसार विनापरवाना सावकारी केल्यामुळे शिवशंकर शांतीलाल भंडारी याचेवर सावकारी कायद्यातील कलम ३९ नुसार यापूर्वीच गुन्हा दाखल झालेला आहे. प्रकरणाची पुढील सुनावणी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अहिल्यानगर यांचे समोर नुकतीच पूर्ण झाली. अर्जदार अभय रामलाल ललवाणी यांच्या तक्रार अर्जातील मुद्द्यांमध्ये तथ्य आढळून आले व त्यानुसार सदर व्यवहार बेकायदेशीर सावकारीतून झाल्याचे सिद्ध झाले. त्यामुळे रामलाल देवीचंद ललवाणी यांनी प्लॉट नं. ११, संजीवनी कॉलनी, मल्हार चौक, स्टेशन रोड, मौजे नालेगाव, स. नं. ४८ अ १ / ४८ ब, ता. जि. अहिल्यानगर या मालमत्तेचे शिवशंकर शांतीलाल भंडारी यांना लिहून दिलेले दस्त क्र. ३३५५ / २००५ दि. : ३०/११/२००५ व दस्त क्र. ३४४९ / २००५ दि. : ०८/१२/२००५ हे अवैध असल्याचे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर गणेश पुरी यांनी घोषित केले व दस्तातील नमुद मिळकत ही अर्जदार यांच्याकडे परत करण्याचे आदेश पारित केले आहेत.

# उष्मा लाटेपासून बचावासाठी दक्षता घ्या : जिल्हा प्रशासनाचे आवाहन

नगर : गेल्या चार-पाच दिवसांपासून जिल्ह्याचे तापमान वाढत आहे. उष्मा लाटेमुळे उद्भवणाऱ्या उष्माघाताचे मानव तसेच पशु प्राण्यांवर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी सर्वांनी दक्षता घ्यावी असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील यांनी केले आहे. नागरिकांनी दर अर्ध्या तासाने पुरेसे पाणी प्यावे. कडक सूर्यप्रकाशापासून वाचण्यासाठी सर्व प्रयत्न करावेत. डोके झाकावे, शासनाने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे अनुपालन करावे, हलके - पातळ व सुती कपडे वापरावेत, प्रवासादरम्यान सोबत पाणी ठेवावे, अशक्तपणा-डोकेदुखी - सतत येणारा घाम आधी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ वैद्यकीय सल्ला घ्यावा, जनावरे - पाळीव प्राणी यांना सावलीत ठेवावे व त्यांना पिण्यासाठी पुरेसे पाणी द्यावे. उन्हात अतिश्रमाची कामे टाळावीत. आपात्कालीन परिस्थितीमध्ये १०७७, १०२, १०४, १०८ व ११२ या टोल फ्री क्रमांकांवर संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# पाणीसाठ्यांच्या बचावासाठी भागीदारी

छत्रपती संभाजीनगर - कार्ल्सबर्ग इंडिया आणि वॉटरएड इंडिया ने कार्ल्सबर्गच्या कोलकाता, औरंगाबाद आणि हैद्राबाद येथील त्यांच्या ब्र्युवरीज जवळील समाजाला जलयुक्त करण्यासाठी त्यांची भागीदारी अधिक वाढवत असल्याची घोषणा करण्यात आली. मैसुरु येथील नंजनागुड ब्लॉक मधील पाण्याच्या पुर्नभरण कार्यक्रमाला मिळाला उत्तम प्रतिसाद बघून आता या भागीदारीचा स्तर वाढवून आता पश्चिम बंगाल, तेलंगाणा आणि महाराष्ट्रातील ३० ग्रामपंचायतींना होणार असून ५१ हजारांहून अधिक व्यक्तींना सुध्दा याचा लाभ होणार आहे.या उपक्रमाचा एक भाग म्हणून सामाजिक सहकार्याचा वापर करुन जमिनीतील पाण्याचे पुर्नभरण, पाण्याची सुधारीत कार्यक्षमता आणि शाश्वत जलव्यवस्थापन करणे शक्य होणार आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून वर्षभरात अंदाजे ३ लाख२० हजार घनमीटर हून अधिक पाण्याचे पुर्नभरण होणार आहे.

# कलाकारांनी सांगितले त्यांच्या मूळगावामधील होळी सणाच्या साजरीकरणाबाबत!

होळी रंगांचा सण असण्यासोबत आनंद, परपंरा आणि एकतेला साजरा करणारा उत्सव आहे. अनेकांसाठी या सणाचे खरे सार मूळगावामध्ये साजरा केल्या जाणाऱ्या सणाच्या पद्धतीमध्ये सामावलेले आहे, जेथे रस्ते रंगांनी फुलून गेलेले असतात, प्राचीन परंपरांनुसार सण साजरा केला जातो आणि प्रियजन एकमेकांवर रंगांची उधळण करतात. एण्ड टीव्ही कलाकार योगेश त्रिपाठी (दरोगा हप्पू सिंग, 'हप्पू की उलटन पलटन') आणि शुभांगी अत्रे (अंगूरी भाबी, 'भाबीजी घर पर है') त्यांच्या मूळगावामधील होळी साजरीकरणाच्या गोड आठवणींना उजाळा देत आहेत, तसेच यंदा तेथे सण साजरा करण्याची किती आठवण येत आहे याबाबत सांगत आहेत. पण, सणाचा उत्साह कायम ठेवण्यासाठी त्यांनी त्यांच्या विशेष पद्धतीने सण साजरा करण्याचे नियोजन केले आहे,

## बालपणीच्या आठवणींना उजाळा आणि सणाच्या योजना

रंगांचा सण होळी हा भारतातील सर्वात उत्साही आणि आनंदी उत्सवांपैकी एक आहे, जो लोकांना रंग, संगीत आणि उत्साहाच्या जल्लोषात एकत्र आणतो. गुजिया आणि मालपुआसारख्या स्वादिष्ट पदार्थांचा आनंद घेतात आणि उत्साही तालावर नाचतात. देशभरातील लाखो कलाकारांप्रमाणेच 'भाग्य लक्ष्मी'मधील ऐश्वर्या खरे, 'जाने अनजाने हम मिले'मधील आयुषी खुराणा, 'जमाई नं. १' मधील अभिषेक मलिक, 'वसुधा'मधील प्रिया ठाकूर, 'कैसे मुझे तुम मिल गये'मधील आकांक्षा चमोला, 'जागृति-एक नई सुबह'मधील विजयेंद्र कुमेरिया, 'कुमकुम भाग्य'मधील प्रणाली राठोड यासारख्या झी टीव्ही कलाकारांनाही हा खास प्रसंग साजरा करण्यास उत्सुकता आहे. आपल्या बालपणीच्या होळीच्या आठवणींना उजाळा देत, त्यांनी यावर्षीच्या सणाचा पुरेपूर फायदा कसा घ्यायचा याची योजना देखील सांगितली.

# 'वीर हनुमान' मालिका पाहण्याची ४ कारणे

सोनी सब आता 'वीर हनुमान' ही मालिका भक्तीमय महाकाव्याच्या माध्यमातून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करण्यासाठी सज्ज आहे. या कथेच्या माध्यमातून प्रभू हनुमानाची आख्यायिका अभूतपूर्व पद्धतीने जीवंत केली आहे. या शौर्यगाथेद्वारे लहानग्या हनुमानाचे आदरणीय प्रभू हनुमानात झालेले असामान्य रुपांतर उलगडून दाखवले आहे, जेव्हा ते आत्मशोधाच्या आणि दैवी ध्येयाच्या शोधात निघतात. सोनी सबवर सोमवार ते शनिवारी संध्याकाळी ७.३० वाजता प्रसारीत होणारी ही मालिका ११ मार्चपासून सुरु होत आहे. ही मालिका तुम्ही चुकवू नका असा आग्रह आम्ही करतोयत, कारण-

# भूल भुलैया ३: अब टूटेगा डर का ताला वर्ल्ड टीव्ही प्रीमियर, फक्त सोनी मॅक्सवर

नाशिक - थरारक रहस्ये, भयंकर चकमकी आणि हास्यस्फोटांनी भरलेल्या थरारक रजनीच्या अनुभवासाठी सज्ज व्हा, कारण सोनी मॅक्सवर 'भूल भुलैया ३' या ब्लॉकबस्टर चित्रपटाचा प्रीमियर सादर होणार आहे! या चित्रपटात रहस्य, कॉमेडी आणि अमानवी थरार यांची कुशलतेने गुंफण केली आहे. यातील पात्रांना पुन्हा जाग्या झालेल्या दुष्ट आत्म्यांचा अनुभव येतो. मोंजोलिकाच्या पुनरागमनाचे रहस्य या कथानकाच्या केंद्रस्थानी आहे आणि त्यामागचे सत्य शोधून त्या अतृप्त आत्म्यांना शांत करण्याचा प्रयत्न असे या कथानकाचे स्वरूप आहे.'भूल भुलैया ३' मध्ये थरार आणि हास्य यांचे अद्भुत मिश्रण आहे त्यामुळे संपूर्ण कुटुंबाला एकत्र बसून बघता येईल असा हा चित्रपट आहे. या चित्रपटात कार्तिक आर्यन, विद्या बालन, माधुरी दीक्षित आणि तृप्ती डिमरी यांसारखे मोठमोठे कलाकार आहेत. १६ मार्च २०२५ रोजी रात्री ८:०० वाजता सोनी मॅक्स लावा आणि एक अविस्मरणीय रजनी अनुभवा!

# गरिबांचे अतिक्रमण पाडणारी न.प ग्राहक सेवा केंद्राचे अतिक्रमण का पाडत नाही?

तभा वृत्तसेवा

पैठण दि १३ :- नाथशष्टी यात्रेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने पैठण शहरातील अतिक्रमण काढण्यात येत असून. एसबीआय भाजी मार्केट शाखेतील ग्राहक सेवा केंद्राच्या नावावर सुते नामक व्यक्तीने थाटलेले अतिक्रमण तक्रार करून सुध्दा का जमीनदोस्त करत नाही असा सवाल उपस्थित होत आहे.. शहरातील गरिबांचे काढलेले अतिक्रमणाला एक न्याय आणि एसबीआय भाजी मार्केट शाखेत झालेल्या अतिक्रमणला दुसरा न्याय हे कशासाठी.? नगर परिषदेने भाजी मार्केट एसबीआय जवळील अतिक्रमण पाडून ठोस



कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

लॉकडाऊन काळात प्रशासन जनसेवेच्या कामात व्यस्त असतांना एसबीआय भाजी मार्केट शाखेत एका महाभागाने नगर परिषदेच्या जागेवर लावण्यात आलेली सरकारी झाडे अशोक वृक्षे तोडून थेट बँकेच्या शेजारीच कोट्यावधी रुपये किमतीच्या भूखंडावर अतिक्रमण करून ग्राहकसेवा केंद्र थाटले.पैठण शहरातील अनेक सामाजिक पदाधिकाऱ्यांनी या वृक्षतोड व अतिक्रमनाची रीतसर तक्रार मुख्याधिकारी नगर परिषद,जिल्हाधिकारी कार्यालयात, तथा विभागीय आयुक्त कार्यालय यांच्याकडे केले आहे. परंतु राजकीय वरदहस्त वापरून सदरील अतिक्रमण धारक नगर परिषदेवर दबाव आणून आपले अतिक्रमण वाचवत आहे.संपूर्ण राज्यात अतिक्रमण काढण्याची मोहीम सुरू असतांना.नाथशष्टी यात्रेसाठी बस स्थानक परिसर, नाथ मंदिर परिसर, उद्यान रोड, मेन रोड ,कोर्ट रोड,, गोल नाका रोड, सह शहरातील गरिबांचे अतिक्रमण नगर परिषदेच्या पथकाकडून रेड मार्क करून काढण्यात आले.. नगर परिषदेने नेमकी अशीच कारवाई करून एसबीआय भाजी मंडई शाखेत झालेले ग्राहक सेवा केंद्राचे बांधकाम पाडावे अशी मागणी होत आहे.

# शासन, प्रशासन आणि भारतीय जैन संघटनेच्या सहकार्याने योजनेची अमलबजावणी करू: जिल्हाधिकारी

छत्रपती संभाजीनगर: महाराष्ट्र शासनाच्या मृदा व जलसंधारण विभागातर्फे सुरू केलेल्या 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' आणि 'नाला खोलीकरण व रुंदीकरण' योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी साठी शासन, प्रशासन आणि भारतीय जैन संघटनेच्या सहकार्याने पुढाकार घेऊ, असे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले. ते जिल्हाधिकारी कार्यालयात भारतीय जैन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी आयोजित बैठकीत मंगळवारी (ता. ११) बोलत होते.

या बैठकीत भारतीय जैन संघटनेचे माजी राज्य अध्यक्ष ड. गौतम संचेती, राज्य महासचिव प्रवीण पारख, जिल्हा प्रकल्प प्रमुख किशोर ललवाणी, पारस बागरेचा, जिल्हाध्यक्ष राजेंद्र पगारिया आणि अभिजीत हिरप यांची प्रमुख उपस्थिती होती.



महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने यावर्षी जोरदार तयारी केली आहे. राज्यातील प्रत्येक गावातील तलावातील गाळ काढून पुनरुज्जीवन आणि खोलीकरण-रुंदीकरण करण्यासाठी 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार नाला खोलीकरण व रुंदीकरण' योजना राबवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या योजनेच्या माध्यमातून गावागावात जनजागृती करून शेतकऱ्यांना गाळ घेऊन जाण्यासाठी प्रोत्साहित करणे, जनआंदोलन उभे करणे, मागणी अर्ज तयार करणे आणि 'शिवार' हे तंत्रज्ञान पोर्टल तयार करणे यांसारख्या कामांमध्ये महाराष्ट्र शासन आणि बीजेएस एकत्र काम करणार आहेत.

बीजेएसने प्रत्येक जिल्ह्यात प्रशिक्षित जिल्हा समन्वयक नेमले असून, महाराष्ट्रातील हजारो कार्यकर्ते शेतकऱ्यांना, ग्रामपंचायतींना आणि तालुका-जिल्हा प्रशासनाला सहकार्य करण्यासाठी सज्ज आहेत. योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सरपंचांनी आपल्या गावाचा मागणी अर्ज ऑनलाइन भरावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या योजनेच्या जनजागृतीसाठी 'सुहाना स्पाइसेस' यांनी मदत केली आहे.

तलावातील गाळ काढण्याचा संपूर्ण खर्च शासन करणार असून, यासाठी राज्यात एक निश्चित दर लागू करण्यात आला आहे. स्वयंसेवी संस्था किंवा ग्रामपंचायती जिल्हा प्रशासनाने दिलेल्या पद्धतीनुसार अर्ज करून काम करू शकतात. तलावातून काढलेला गाळ शेतात टाकण्यासाठी अल्प व अत्यल्पभूधारक शेतकरी, विधवा, अपंग शेतकरी आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासनाकडून अनुदान दिले जाणार आहे.

जास्तीत जास्त गावांनी गाळ काढण्यासाठी आणि नाला खोलीकरण-रुंदीकरणासाठी त्वरित अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन बीजेएसतर्फे करण्यात आले आहे.

# आयसीआयसीआय प्रुडेन्शिअल इक्विटी अँड डेट फंड: आक्रमक हायब्रिड गुंतवणूकदारांची सर्वाधिक पसंती

नाशिक-जर तुम्ही नव्याने गुंतवणूक सुरू केलेले गुंतवणूकदार असाल, जोखीम पत्करण्यास तयार असाल आणि इक्विटी व डेट या दोन्ही ॲसेटवर्गांमध्ये गुंतवणूक करण्यास इच्छुक असाल, तर आक्रमकरित्या हायब्रिड फंडाचा विचार केला जाऊ शकतो. टप्प्याटप्प्याने गुंतवणुकीच्या पद्धतीने आपण मासिक एसआयपी सुरू करू शकतो आणि एसआयपी टॉप-अपच्या माध्यमातून एसआयपीची रक्कम दरवर्षी ८-१० टक्क्यांनी वाढवू शकतो. अशा पद्धतीने पुढील १५-२० वर्षांत गुंतवणुकीची फळे मिळण्यास मदत होऊ शकते.

ICICI PRUDENTIAL MUTUAL FUND

आक्रमक हायब्रिड फंड ६५ ते ८० टक्के निधी इक्विटीत गुंतवतो आणि बाकीचा निधी डेटमध्ये गुंतवतो. ही रचना बघता, इक्विटी फंडाच्या तुलनेत मोबदला किंचित कमी असू शकतो पण या फंडाद्वारे गुंतवणुकीतील जोखीमही तुलनेने कमी आहे हे लक्षात घ्यावे लागेल. चढउतारांच्या काळात ही सुविधा सहजगत्या महत्त्वपूर्ण होऊन जाते, कारण, पोर्टफोलिओच्या मूल्यातील घसरण तुलनेने कमी असते आणि गुंतवणुकीचा एकंदर अनुभव अधिक चांगला राहतो.

बाजार जेव्हा तेजीत असतो तेव्हा फंडातील इक्विटीचा भाग सामान्याहून खूप जास्त मोबदला देतो, तर बाजार पूर्वपदावर येतो तेव्हा डेटमधील भाग संरक्षकाचे काम करून पोर्टफोलिओच्या घसरणीला आळा घालतो याचा अनुभव गेल्या सहा महिन्यात आला आहे. अर्थव्यवस्थेमध्ये व्याजदरात कपात केली जाते, तेव्हा पोर्टफोलिओचा डेटमधील भागही असामान्य मोबदला मिळवून देतो.

पोर्टफोलिओमध्ये एका आक्रमक फंडाची भर घातली गेल्यामुळे हा फंड इक्विटी आणि डेट या दोन्ही ॲसेट वर्गांतील घसरणीवर नियंत्रण ठेवून दोन्ही वर्गांचे फायदे गुंतवणूकदाराला देऊ करतो. त्यामुळे गुंतवणूकदारांनी त्यांच्या पोर्टफोलिओत किमान एका आक्रमक हायब्रिड फंडाचा समावेश करावा असा सल्ला नेहमीच दिला जातो. आणि या प्रवर्गातील सर्वोत्तम उत्पादनांपैकी एक म्हणजे नोव्हेंबर १९९९ मध्ये सुरू करण्यात आलेला आयसीआयसीआय प्रुडेन्शिअल इक्विटी अँड डेट फंड. या फंडाकडे २५ वर्षांचा प्रदीर्घ वारसा आहे आणि फंडाकडे ३९,८८६ कोटी रुपयांचे ॲसेट्स आहेत.

व्यवस्थापनाखालील मालमत्तांपैकी (एयूएम) ७४.६ टक्के इक्विटीमध्ये आहेत असे पोर्टफोलिओची फोड केली असता दिसून येते. उर्वरित भाग डेटमध्ये आहे. २१.३३ टक्के भाग निश्चित उत्पन्न देणाऱ्या उत्पादनांमध्ये आहे, २.५ टक्के रिअल इस्टेट डेटमध्ये आहे आणि १.५ टक्के रोखीत आहे. मोबदल्याबाबत सांगायचे तर स्थापनेपासून या फंडाने १५ टक्के सीएजीआर दराने मोबदला दिला आहे.

आयसीआयसीआय प्रुडेन्शिअल इक्विटी अँड डेट फंडातील इक्विटीचा भागामध्ये ९३ समभागांचा समावेश आहे. आघाडीच्या १० होल्डिंग्जना पोर्टफोलिओत ४३ टक्के प्रतिनिधित्व आहे, यातील बहुतेक निफ्टी फिफ्टी निर्देशांक समभाग आहेत. परिणामी, या कंपन्यांचे समभाग एकंदर बाजारातील मोठ्या नावांच्या तुलनेत कमी तरल आहेत व त्यांत चढउतार कमी आहेत. डेटच्या भागात प्रामुख्याने स्वायत्त बॉण्ड्स आहेत. यामध्ये भारत सरकारने जारी केलेल्या सिक्युरिटीज येतात. त्यामुळे यात जोखीम फार कमी आहे. पोर्टफोलिओत आरईआयटींचाही समावेश आहे. आरईआयटी ही सुरक्षिततेची अतिरिक्त तरतूद आहे आणि यातून मोबदलाही चांगला मिळतो.

तेव्हा गुंतवणुकीच्या क्षेत्रात तुम्ही नवोदित असाल आणि इक्विटी बाजारात गुंतवणूक सुरू करण्याच्या प्रयत्नात असाल, तर या फंडाचा विचार तुम्ही पहिली पायरी म्हणून करू शकता. व्हॅल्यू रिसर्चकडून फाइव्ह-स्टार रेटिंग मिळवलेल्या आयसीआयसीआय प्रुडेन्शिअल इक्विटी अँड डेट फंडाकडे दुर्लक्ष केल्यास तुम्ही मोठी संधी गमावून बसाल.

# सत्तेपेक्षा साधना महान : ह भ प संजय महाराज पाचपोर


## बिडकीन येथील गाथा पारायण सप्ताह व राम कथेस भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

तभा वृत्तसेवा बिडकीन दि १३ मार्च सत्तेपेक्षा साधना महान असल्याचे उदगार ह भ प संजय महाराज पाचपोर यांनी बिडकीन येथे आयोजित राज्यस्तरीय गाथा पारायण सप्ताह मध्ये तिसऱ्या दिवशी कीर्तन करताना सांगितले संजय महाराज म्हणाले की भारताला स्वातंत्र्य मिळून शंभर वर्षे झाले नाही मात्र भारताचे पहिले अर्थमंत्री कोण होते ते सांगा उपस्थित आतून कोणीही उत्तर न दिल्याने त्यांनी महाराष्ट्राचे पहिले कृषिमंत्री कोण होते ते सांगा त्याचे उत्तरं आल्याने त्यांनी सांगितले आपल्या शतकातल्या गोष्टी आठवत नाही मात्र जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या वैकुंठ गमनास ३७५ वर्षे झाले वात्र तरीही आम्हाला त्यांची आठवण येते यावरून सत्तेपेक्षा साधना मान आहे त्यांनी केलेल्या साधनेमुळेच तुकाराम महाराज सर्वश्रुत आहेत



संत तुकाराम महाराज यांच्या वैकुंठ गमनास ३७५ वर्ष होत असून यानिमित्त बिडकीन येथे राज्यस्तरीय गाथा पारायण तसेच प्रसिद्ध रामायणाचार्य रामरावजी ढोक यांचे संगीत राम कथा व सप्ताहाचे आयोजन ह भ प एकनाथ महाराज यांनी बिडकीन ग्रामस्थांच्या सहकार्याने केले यासाठी ८०÷२५० असा भव्य मंडप उभारण्यात आला या पारायणाचा शुभारंभ खासदार संदिपान भुमरे यांनी गाथा पूजनाने केला सकाळी गाथा पारायण ,दुपारी राम कथा ,सायंकाळी हरिपाठ नंतर रात्री कीर्तनाचे आयोजन आहे हा भव्य मंडप पाहता मंडप भरेल की नाही अशी शंका अनेकांनी व्यक्त केली होती त्यातच ढोक महाराजांचे राम कथा बिडकीन येथ तिसऱ्यांदा होत आहे तेव्हा भाविक वस्त्रोते कितपत प्रतिसाद देतील अशी शंका होती. मात्र हा सर्व भक्तिमय सोहळा पाहता व रामनाम ऐकण्यासाठी व हा सोहळा अनुभवण्यासाठी सकाळपासूनच भाविकांचे सरस्वती भवन विद्यालयाच्या प्रांगणा मध्ये उभारलेल्या मंडपाकडे पावले वळतात विशेष म्हणजे येणाऱ्या भाविकांसाठी नाष्टा व महाप्रसादाचे आयोजनही भाविकांनी आयोजकांनी केलेले आहे व बिडकीनच्या इतिहासामध्ये हा पहिला मोठा कार्यक्रम होत असल्याचे उपस्थित सांगतात बिडकीन येथील भव्य सप्ताह मान्यवरांच्या शब्दात विशेष म्हणजे सप्ताह सोहळ्या मध्ये पहिले कीर्तन तुकाराम महाराजांचे वंशज ह भ प पुंडलिक महाराज यांचे होते त्यांनी याप्रसंगी सांगितले की सद्य परिस्थितीमध्ये भाविक देहू कडे येतात मात्र सध्या देहू मध्ये जे वातावरण आहे ते वातावरण मला बिडकीन येथे अनुभवास येत आहे तसेच ह भ प एकनाथ महाराज व बिडकीन येथील संजय दौंडे टेलर बिडकीन सरपंच अशोक धर्मे , मनोज पेरे, काकासाहेब टेके व ग्रामस्थांनि या भव्य सोहळ्याच्या केलेल्या आयोजनाचे त्यांनी कौतुक केले व आपल्या कीर्तनामध्ये तुकाराम महाराजांविषयी सविस्तर माहिती भाविकांना दिली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सरपंच अशोक धर्मे,किरण गुजर ,सागर फरताळे, रवींद्र गोरे ,राहुल ठाणगे, विजय ठाणगे, मधुकर सोकटकर, अंकुश काळे, मोहनराव हिवाळे, नंदू बोराडे, अंकुश धर्मे, केदार गुंजाळ, कांता डोळस, आदी मान्यवर व भाविक कार्यकर्ते परिश्रम घेत आहे

## संघ हीच जीवनगाथा



अलक:- (६५) बालस्वयंसेवक

संघाने प्रारंभापासूनच दहा वर्षाखालील मुलांचा शिशुवर्ग व ११ ते १४ वर्षातील मुलांचा बालवर्ग ठरवला होता. विशेष करून संघ शाखेत या वयातील मुलांवर होणाऱ्या संस्कारक्षम गोष्टींचा आवर्जून समावेश होत असे. मनाला देशभक्ती कळली, रुचली तरच हे बाल स्वयंसेवक भारत मातेची सेवा करण्यासाठी त्यांच्या पुढील आयुष्यात तत्पर असतील, ते देशद्रोही कृत्य करणार नाहीत असा डॉक्टरांना विश्वास होता. ते शाखेच्या

वर्गशिक्षकांना नेहमी म्हणायचे या शिशु- बाल वर्गाला खेळवणे सोपे काम नसते. त्यांना खेळवताना कधी कधी निरसपणा वाटतो, कंटाळा येतो. पण ही कंटाळवाणी कामे राष्ट्राकरता करायलाच हवीत. या वयातच त्यांना जीवन जगण्याचे शास्त्र कळले पाहिजे. कारण हे शास्त्र तेजस्वी हिंदू राष्ट्र घडवण्यासाठी समर्थ ठरणार आहे व ही ज्येष्ठांची जबाबदारी व कर्तव्य आहे अशा रीतीने संघाचा मार्ग अचूक; उत्साह अपूर्व; काळ अनुकूल, व नेतृत्व असामान्य होते. अशा असामान्य सरसंघचालकांना मी शतशत नमन करते।

क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

# महिला दिनानिमित्त डोणगाव जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १३ : जागतिक महिला दिनानिमित्त जिल्हा परिषद शाळा तांबे डोणगाव ता.पैठण येथे वरद हॉस्पिटल अँड आय.सी.यु बिडकीन यांच्या तर्फे महिलां करीता व शालेय विद्यार्थ्यांन करीता सर्व रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात १०० पेक्षा जास्त महिलांची आरोग्य तपासणी मोफत करण्यात आली.यावेळी वरद हॉस्पिटलच्या संचालिका डॉ.सौ.जागृती सुरेश जंगले यांनी विद्यार्थ्यांना व महिलांना मार्गदर्शन केले यावेळी उपस्थित शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक इतर कर्मचारी व वरद हॉस्पिटल आय.सी.यु बिडकीन सर्व डॉक्टर व कर्मचारी वर्ग उपस्थित होते तसेच छत्रपती संभाजीनगर येथे समतानगर शनिमंदिर देवस्थान या ठिकाणी गरीब गरजू गरिबांना डॉ सुरेश जंगले,व डॉ जागृती सुरेश जंगले यांनी अन्नदान वाटप करण्यात आले.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र.२०७/२०२५

अर्जदार : १) हिराबाई शिवाजी खंडागळे, वय ५० वर्षे धंदा शेती रा. वाहेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) प्रसाद शिवाजी खंडागळे, वय २९ वर्षे धंदा शेती रा. वाहेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. जी.वी. चव्हाण यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ चे वडील नामे शिवाजी किसन खंडागळे हे मौजे बाहेगाव ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक ११/१०/२०२३ रोजी मौजे वाहेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झाले आहे. मयताचे आईवडील हे पुर्वीच मयत झालेले आहे त्यामुळे मयत शिवाजी किसन खंडागळे यांना अर्जदार क्र.१ व २ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदार यांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन मयताचे पश्चात कार्यालयीन शासकीय व इतर कामासाठी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. सदर प्रकरणात पुढील तारीख दिनांक १६/०४/२०२५ रोजीची ठेवण्यात आलेली आहे. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १३/०३/२०२५ रोजी दिले.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय गंगापुर

## तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी कन्नड तहसिल कार्यालय कन्नड जि. औरंगाबाद

जा.क्र.२०२५/जमा-२./कुळ /कावी- ७४ दिनांक १०.०२.२०२५

## जाहीर प्रगटन

सर्व ग्रामस्थ मौजे रेल नावडी ता. कन्नड जि. औरंगाबाद यांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, दिपक एकनाथ गोरे व इतर रा. कन्नड ता. कन्नड.जि. छत्रपती संभाजीनगर यांनी मौजे मौजे रेल नावडी शिवारातील गट नं १३९ च्या सातबारा उतारयामध्ये भोगवटादार वर्ग-२ ची नोंद कमी करुन भोगवटादार वर्ग-१ अशी दुरुस्तीची नोंद होणे बाबत या कार्यालयास अर्ज देवून विनंती केलेली आहे.

करिता ज्या कोणास या बाबत आक्षेप असल्यास त्यांनी लेखी पुराव्यासह हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत या कार्यालयास आक्षेप दाखल करावे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

तहसिलदार कन्नड

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी मिना भाउसाहेब प्रधान रा. वरवंडी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर यांचेकडुन खालिल परिशिष्ठामधील नमुद शेत जमीन विकत घेण्याचा लेखी करारनामा केला असुन त्यांनी नमुद मिळकत ही त्यांच्या एकमेव मालकीची असुन त्यावर कसल्याही प्रकारचे सरकारी अथवा खाजगी कर्ज अथवा बोजा नाही अशी हमी माझ्या पक्षकारास दिली आहे. तरी नमुद मिळकती बाबत इतर कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन पंधरा दिवसांच्या आत तसा लेखी आक्षेप माझ्या कार्यालयात नोंदवावा अन्यथा माझे पक्षकार विक्री करारनाम्यानुसार पुढील व्यवहार पुर्ण करतील.

मिळकतीचे परिशिष्ठः शेत जमीन गट नं. ८४ मौजे राजुरा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर पैकी १ हेक्टर ७८ आर ज्याची चतुसिमा पुर्वेसः सुनिता दत्ता पादर व भागवत दत्ता पादर यांची शेत जमीन, पश्चिमेसः संजय पादर व शुभम पादर यांची शेत जमीन, उत्तरेस कैलास बालचंद वैद्य व नवनाथ बालचंद वैद्य यांची शेत जमीन, दक्षिणेस कांतीलाल रामराव म्हस्के व संगिता म्हस्के यांची शेत जमीन, करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहिर प्रगटन प्रसिध्द करणार**
**ॲड. एस. के. नरोडे (पाटील)**
**राधेषाम निवास, हॉटेल धनराजच्या पाठीमागे,**
**लक्ष्मी कॉलणी, गंगापुर.**
**मो. नं. ९०११९५५५९०**

## अग्रलेख...

# क्लिष्ट कायद्याचे सुलभीकरण स्वागतार्ह

अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी १ फेब्रुवारी २०२५ रोजी संसदेत अर्थसंकल्प सादर करताना नवीन प्राप्तिकर विधेयकाची घोषणा केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने हे नवीन प्राप्तिकर विधेयक मंजूर केले. ते अलिकडेच लोकसभेत सादर झाले. ते वित्तविषयक स्थायी समितीकडे पाठवले जात आहे. या विधेयकाची वैशिष्ट्ये जाणून घेतली पाहिजेत. प्राप्तिकर कायदा-१९६१ मध्ये सुधारणा करून विधेयक आणण्यासाठी अर्थ मंत्रालयाने बराच काळ काम केले आहे. या कायद्याच्या विविध पैलूंचा आढावा घेण्यासाठी २२ विशेष उपसमित्या स्थापन करण्यात आल्या. सर्वसामान्य जनता आणि करदात्यांना या कायद्याबाबत आपल्या सूचना देण्यासाठी ऑनलाईन पोर्टलही उघडण्यात आले होते. पोर्टल उघडल्यानंतर ऑक्टोबरमध्ये अर्थ मंत्रालयाला ६५०० हून अधिक सूचना प्राप्त झाल्या. यासोबतच उद्योगांकडून सूचनाही मागवण्यात आल्या होत्या. आता या सूचनांच्या आधारे प्राप्तिकर कायद्यात सुधारणा करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. प्राप्तिकर कायद्यातील दुरुस्तीचा मसुदा तयार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. अंतिम फेरीत उद्योगांकडून सूचनाही मागवण्यात आल्या आहेत; जेणेकरून त्यांचाही समावेश करता येईल.

नवीन आयकर विधेयक, २०२५ हा एक प्रस्तावित कायदा आहे. त्याचा उद्देश भारताची आयकर प्रणाली सुलभ आणि आधुनिक करणे आहे. प्राप्तिकराचा कायदा १९६१ मध्ये तयार झाला, त्यावेळी त्यात २१९ कलमे होती. मात्र वर्षानुवर्षे यात नवी कलमे समाविष्ट करण्यात आल्याने वाढून ती ८१९ झाली. नवीन आयकर विधेयक आता ५६१ कलमांचे आहे. या विधेयकाची अंमलबजावणी १ एप्रिल २०२६ पासून लागू होईल, अशी शक्यता आहे. त्या पद्धतीची शिफारस करण्यात आली आहे. स्थायी समिती तसेच, संबंधित अन्य व्यक्तींच्या सूचना येण्यास वेळ लागू शकतो, हे लक्षात घेऊनच ही तारीख निश्चित करण्यात आली असावी. नवीन प्राप्तिकर विधेयक, २०२५ भारताच्या करप्रणालीचे आधुनिकीकरण करण्यावर लक्ष केंद्रित करते. ते जुना प्राप्तिकर कायदा, १९६१ ची जागा घेईल. सोपी कायदेशीर भाषा, कमी कर स्लॅब आणि विश्वासावर आधारित स्व-मूल्यांकन यासारख्या महत्त्वाच्या सुधारणा त्यात आहेत. व्यवसाय आणि वैयक्तिक करदात्यांना फायदा होत असताना अनुपालन वाढवणे, खटले कमी करणे आणि आर्थिक वाढीस चालना देणे हे त्याचे उद्दिष्ट आहे, हे महत्त्वाचे. शिवाय, कर कायद्यांमध्ये अधिक स्पष्टता प्रदान करण्यासाठी प्रस्तावित केलेल्या अनेक प्रमुख सुधारणांवर हे विधेयक लक्ष केंद्रित करते. ही नवीन आयकर विधेयक २०२५ ची उद्दिष्टे आणि प्रमुख वैशिष्ट्ये सांगता येतील. कर कायदे समजून घेणे सोपे करण्यासाठी साधी आणि स्पष्ट भाषा वापरणे हे विधेयकाचे मुख्य उद्दिष्ट सांगता येईल. याद्वारे कायदेशीर भाषेचे सर्वसामान्यांना समजेल, असे सरलीकरण केले जाईल. यामुळे विशेष कायदेशीर ज्ञानाची गरज कमी होईल. परिणामी, करदात्यांना अधिक आत्मविश्वासाने प्रणाली वापरता येईल. नवीन कायद्याची लांबी सध्याच्या कर कायद्याच्या लांबीच्या अंदाजे अर्धी असणे अपेक्षित आहे. हे लहान स्वरूप अनावश्यक विभाग काढून टाकण्यास मदत करेल. यामुळे कर अधिकारी आणि करदात्यांना माहितीवर प्रक्रिया करणे अधिक जलद आणि अधिक कार्यक्षम होईल. या विधेयकाद्वारे कोणतेही नवीन कर लादले जाणार नाहीत, परंतु विद्यमान कर कायदे सुलभ करण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल, याची खात्री वाटते. व्यक्ती आणि व्यवसायांसाठी कर प्रणाली स्थिर, अंदाज लावता येण्याजोगी आणि कमी ओझे असणारी असेल याची खात्री करणे हा त्याचा उद्देश आहे. हे विधेयक राष्ट्रीय अर्थसंकल्पात जाहीर केलेले महत्त्वपूर्ण करबदल एकत्रित करेल. त्यात आयकर दर आणि (स्रोतावर कर वजा) तरतुदींचा समावेश आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी केलेल्या तरतुदींमध्ये आयकर विधेयक, २०२५ च्या कलम १५३, आयकर कायदा १९६१ अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना कलम ८० अंतर्गत बँक आणि पोस्ट ऑफिसमधील ठेवींमधून मिळणाऱ्या व्याजावर पन्नास हजार रुपयांपर्यंत वजावट मिळण्याचा अधिकार आहे. त्याचप्रमाणे, सामान्य नागरिक कलम ८० अंतर्गत बचत खात्यातील ठेवींमधून मिळालेल्या व्याजावर दहा हजार रुपयांपर्यंतच्या कपातीचा दावा करू शकतात. तसेच, ज्येष्ठ नागरिक बचत खाती आणि बँक, पोस्ट ऑफिस आणि सहकारी बँकांमधील मुदत ठेवींमधून कमावलेल्या व्याज उत्पन्नावर पन्नास हजार रुपयांच्या करकपातीचा दावा करण्यास पात्र आहेत, ही आनंदाची बाब म्हटली पाहिजे.

आयकर विधेयकाने सध्याच्या आयकर कायद्यातील ३०० हून अधिक तरतुदी, जसे की कलम ८० सीसीए (राष्ट्रीय बचत योजनेतील गुंतवणुकीसाठी वजावट), कलम ८० सीसीएफ (दीर्घकालीन पायाभूत सुविधा बॉण्डमधील गुंतवणुकीसाठी वजावट) काढून टाकल्या आहेत. त्या कालांतराने अनावश्यक झाल्या होत्या किंवा हटवण्यात आल्या होत्या. नवीन विधेयक पगार, व्यावसायिक शुल्क, व्याज उत्पन्न आणि भाडे यासारख्या विविध उत्पन्न स्रोतांवर टीडीएस नियमन लादण्याचे सुचवते. याव्यतिरिक्त, मद्य, तेंदुपत्ता, खनिजे, भंगार साहित्य, दहा लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीची मोटार वाहने आणि सात लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कम कर परदेशी पाठवणे यासह विशिष्ट व्यवहारांवर लागू केला जाईल, हेही महत्त्वाचे आहे. नवीन आयकर विधेयक हे प्राप्तिकर कायदा, १९६१ सुलभ करण्यासाठी आवश्यक आहे. यातील २९८ पेक्षा जास्त विभाग आणि २३ अध्याय नेव्हिगेट करणे कठीण जाते. आयकर कायद्यातील अस्पष्ट तरतुदींमुळे अनेकदा करदाते आणि अधिकारी यांच्यात वाद निर्माण होतात. मर्यादित कर आधारामुळे अनौपचारिक क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात वापर होत नाही. त्यामुळे महसूल कार्यक्षमता कमी होते. २०१२-१३ पूर्वी सादर केलेल्या अनेक विभागांनी आजच्या आर्थिक परिस्थितीमध्ये कालबाह्य तरतुदींमुळे प्रासंगिकता गमावली आहे. सध्याच्या इन्कम टॅक्स कायद्यातील इंग्रजी शब्द, नियमांमध्ये वापरली जाणारी भाषा खूपच गुंतागुंतीची असून हे नियम आणि तरतुदी सामान्य माणसाला समजत नाहीत, हे वास्तव आहे.

विधेयकामध्ये सर्वसामान्यांना समजेल अशा सोप्या भाषेत नियम समजवण्याची तरतूद असेल. व्यवसाय आणि महामंडळांना चांगल्या आर्थिक नियोजनासाठी नवीन विधेयकातील तरतुदी कामी येतील. करकायद्यांची सुस्पष्टता, संरचित करकायद्यांचे ओझे कमी होईल. वैयक्तिक करदात्यांपासून कॉर्पोरेट क्षेत्रापर्यंत सगळ्यांना अनावश्यक तरतुदींपासून मुक्ती मिळण्याची शाश्वती या विधेयकामुळे वाटत आहे, ही बाब लक्षात घेतली पाहिजे. नव्या कायद्यानुसार छोट्या प्रकरणांमध्ये करदात्यांना नोटिसा बजावल्या जाणार नाहीत. आजघडीला प्राप्तिकर कायद्यात अशा अनेक तरतुदी आहेत. करदात्याला विवरणपत्र भरताना बरीच प्रक्रिया ऑनलाईन करावी लागते. आता अशी कागदपत्रे जोडण्याची आवश्यकता भासणार नाही. नवीन विधेयकाचे हे सकारात्मक परिणाम करदात्यांना दिसून येतील आणि त्यांचे स्वागत केले जाईल, अशी जी अपेक्षा सरकारला आहे, ती खरी ठरेल. ती स्वागतार्ह आहे. कालौघात अनेक क्लिष्ट कायद्यांच्या बाबतीत अशा प्रकारचे बदल घडत आहेत. न्याय संहितेतही आपण असे बदल अनुभवले. तसेही प्राप्तिकर खात्याच्या नोटिसा आणि काही कडक नियम अनेक जणांच्या नाराजीचे मोठे कारण असते. निर्धारित केलेला कर नीट भरूनही अशा नोटिसा निघत असल्याने अनेक सामान्यजन त्रस्त असतात. यामागे सरकारी कार्यालयांचे खेटे घालण्याबाबत विशेष नाराजी असते. सरकारी मागणी चुकीची असते, असे नाही; मात्र अनेकदा ती गैरसमजातून आणि नियमांच्या तांत्रिक स्वरूपामुळे असते. यामुळे सामान्यजनांचा वेळ जातोच, शिवाय, कामे करून घेण्यासाठी, वेळ वाचवण्यासाठी अनेकदा मनस्ताप सहन करावा लागतो. या पृष्ठभूमीवर क्लिष्ट कायद्याचे सुलभीकरण स्वागतार्ह आहे.

## इतस्तत:

**डॉ. विवेक राजे**

# इस्लामोफोबिया डे नव्हे, हा तर...!

संयुक्त राष्ट्र संघाने २०२२ मध्ये दरवर्षी १५ मार्च हा दिवस जगभर 'इस्लामोफोबिया कॉम्बॅट डे' म्हणून साजरा करण्यात यावा, असा एक ठराव पारित केला. हा दिवस, मुस्लिम घृणा संघर्ष दिवस म्हणून साजरा करण्यास कारण जगभरात इस्लाम धर्मीयांबद्दल इतर धर्मीय लोक प्रकट करीत असलेल्या घृणा आणि तिरस्कार या भावना कारणीभूत आहेत, असे संयुक्त राष्ट्र संघाचे म्हणणे आहे. ६० सदस्य संख्या असलेल्या 'मुस्लिम सहकार्य गटाने' मांडलेल्या प्रस्तावाला मान्यता देत 'मुस्लिम घृणा संघर्ष दिन' साजरा करण्याचे जगातील सर्व देशांना जणू संयुक्त राष्ट्र संघाने अनिवार्य केले आहे. अर्थात आता जगभरात, १५ मार्च मुस्लिम घृणा संघर्ष दिवस म्हणून साजरा करण्यात येईल. तसेच आतंकवाद अथवा हिंसक उग्रवाद हा कोणत्याही धर्म, राष्ट्रीयता अथवा संस्कृतीशी जोडला जाऊ नये म्हणून सर्व सदस्य राष्ट्रांनी आपापल्या देशात कायदे करावेत, अशी राष्ट्र संघाची अपेक्षा आहे. प्रश्न भारतासारख्या बहुधर्मीय पण स्वतःला धर्मनिरपेक्ष मानणाऱ्या आणि चुकीच्या पद्धतीने तथाकथित धर्मनिरपेक्षता राखण्यासाठी कायदे करणाऱ्या पण इस्लामिक आतंकवादाने होरपळलेल्या देशांचा आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या बैठकीत फ्रान्स, बेल्जियम, यूके, भारत यांनी फक्त 'इस्लामोफोबिया' किंवा 'इस्लाम आणि पवित्र पुस्तक' या शब्दाऐवजी 'रिलिजिओफोबिया' हा शब्द वापरावा म्हणून आग्रह धरला होता, परंतु ही शब्द सुधारणा फेटाळण्यात आली. ही शब्द सुधारणा करावी असे वरील देशांना वाटत होते. कारण बहुधर्मीय देशांमधील सामाजिक, आर्थिक वा राष्ट्रीय सुरक्षेसंबंधित वातावरण हे इतर देशांतील वातावरणापेक्षा संपूर्णपणे वेगळे आहे. आज संयुक्त राष्ट्र संघ आणि अगदी इस्लामिक व ख्रिश्चन राष्ट्रांनी 'धर्म तटस्थता' पाळली पाहिजे. पण असे घडताना दिसत नाही. मागील दोन वर्षांत फ्रान्स, बेल्जियम, यूके आणि भारत या देशांमध्ये इस्लामिक जनसमुदायाने घडवून आणलेल्या दंगली अनेक गोष्टींचा पुन्हा विचार करण्यास उद्युक्त करतात. त्यामुळे संयुक्त राष्ट्र संघाच्या सभासद असलेल्या भारतासारख्या बहुधर्मीय देशांतील नागरिकांनी प्रथम मुस्लिम घृणा अर्थात इस्लामोफोबिया या शब्दाचा अर्थ समजून घेणे गरजेचे आहे.

इस्लामोफोबिया म्हणजे इस्लाम धर्म किंवा सरसकटपणे मुस्लिम धर्म व धर्मीयांबद्दल भीती, द्वेष किंवा पूर्वग्रह. विशेषतः जेव्हा मुस्लिम धर्म आणि जनसमुदायाकडे भू-राजकीय शक्ती किंवा दहशतवादाचा स्रोत म्हणून पाहिले जाते, तेव्हा निर्माण होणाऱ्या तिरस्कार, घृणा व भीतीचा अर्थ इस्लामोफोबिया असा घेतला जातो. काही विद्वानांच्या मते इस्लामोफोबिया हा द्वेषपूर्ण भाषणे, भेदभाव आणि मुस्लिमविरोधी हिंसाचाराच्या रूपात दिसून येतो. अशा प्रकारचा हिंसाचार, भेदभाव आणि मुस्लिमविरोधी वर्तन हे मुस्लिमांच्या मानवी हक्कांचे गंभीर उल्लंघन असून त्यामुळे मुस्लिम देशांमध्ये अस्वस्थता निर्माण होत आहे. तर, काही विद्वानांच्या मते, हा दिवस अकारण एका विशिष्ट धर्माच्या बाजूने आपला आवाज उठवतो आहे तसेच इतर धर्मीयांवरील अत्याचार मात्र यामुळे दुर्लक्षित होण्याची मोठीच शक्यता आहे. हा दिवस जागतिक पातळीवर साजरा करण्यामुळे इतर सर्व धर्मविरोधात होणारा द्वेष आणि हिंसाचार यांचे गांभीर्य दुर्लक्षित होण्याची शक्यता आहे. नुकत्याच बांगलादेशातील हिंदुविरोधी हिंसाचाराच्या घटना याचे ज्वलंत उदाहरण होय. मुस्लिम देशांची राष्ट्र संघात असलेली संख्या मुस्लिम घृणा संघर्ष दिवस, आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरा होण्यास कारणीभूत आहे. हा दिवस भारतासारख्या बहुधर्मीय देशांमध्ये राष्ट्र संघाच्या दबावाखाली साजरा होणार आहे. विविध देशांतील मुसलमान, आश्रयासाठी इस्लामेतर देशांमध्येच स्थलांतर का करतात, हा एक प्रश्नच आहे. हमास या अतिरेकी संघटनेने इस्रायली नागरिकांच्या केलेल्या अपहरणामुळे संतापलेल्या इस्रायलने गाझापट्टीवर हल्ला केल्यानंतर, पॅलेस्टाईन मुस्लिम लोकांना गाझापट्टीच्या भोवताली असणारे इस्लामिक देश आसरा देण्यास का तयार नव्हते, यावर आंतरराष्ट्रीय स्तरावर वा संयुक्त राष्ट्र संघाच्या अधिसभेत चर्चा व्हायला हवी होती. मात्र या विषयावर चर्चा का झाली नाही. संयुक्त राष्ट्र संघ एकप्रकारे या दिवसाच्या माध्यमातून मुस्लिम समाजाला आणि धारणांना संरक्षण देताना दिसतो. पण जागतिक समुदायामध्ये इस्लामविषयी घृणा निर्माण होण्याची जी कारणे आहेत ती नाहीशी झाल्याशिवाय इस्लामोफोबिया दूर करता येणार नाही.



अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील मुस्लिम अतिरेकी हल्ल्यानंतर अमेरिकन माणसांच्या मनात इस्लाम धर्मीयांविषयी घृणेत मोठी वाढ झाली, असे दिसून आले. आज विविध ठिकाणी कार्यरत असलेल्या अतिरेकी संघटनांपैकी ९० टक्के अतिरेकी संघटना या इस्लामिक आहेत. या सर्व संघटना इस्लामेतर प्रदेशांत इस्लाम धर्म, इस्लामिक संस्कृती आणि शरिया कायदे स्थापित करू इच्छितात. कारण इस्लाम, जगाची विभागणी इस्लामवर श्रद्धा असलेले ते मोमीन आणि इस्लामवर श्रद्धा नसलेले ते काफीर अशी करतो. इस्लाम जगाची विभागणी 'दार-उल-इस्लाम' म्हणजे इस्लाम शासित प्रदेश आणि 'दार-उल-हरब' म्हणजे जेथे इस्लामिक शासन नाही असा प्रदेश, अशी करतो. आणि सगळे जग 'दार-उल-इस्लाम'मध्ये परिवर्तित करण्याचे ध्येय ठेवतो. राष्ट्र संघ मात्र इस्लामविषयी घृणा करू नये याकरिता कार्यक्रम राबविण्याचे हास्यास्पद आवाहन करताना दिसते. हे आवाहन करताना आपल्या सदस्य राष्ट्रांनी सांस्कृतिक विविधता जोपासण्यासाठी कायदे करावेत असेही सुचवते. त्याच वेळी इस्लामिक संघटना वा मुस्लिम अतिरेक्यांनी जागतिक स्तरावर प्रचंड प्रमाणात केलेला हिंसाचार दृष्टिआड करताना दिसते. भारतात तर इस्लामने धार्मिक आधारावर हिंसाचार, घृणा, मंदिरांचा विध्वंस, बलात्कार, दंगली, हिंदी भाषेला विरोध व फारसी/उर्दूचा पुरस्कार अशा सर्व प्रकारच्या अत्याचारांची परिसीमा गाठली हा इतिहास आहे. स्वतंत्र भारतातदेखील धर्म परिवर्तन, लव्ह जिहाद, लॅण्ड जिहाद असे अनेक प्रकार बॉम्बस्फोट आणि दंगलीच्या बरोबरीने चालूच आहेत. वक्फच्या द्वारे जमिनी हडपण्यात आघाडीवर असलेला मुस्लिम समुदाय वक्फ कायदा, सीएए, एनआरसी, समान नागरी कायदा अशा कायद्यांमध्ये सुधारणा करण्याचा विरोध हिंसक मार्गाने करण्याचे जाहीर करतो. फ्रान्स, स्विडन, इंग्लंड या देशांत आश्रय घेतलेला मुस्लिम समाज कोणत्या तरी फुटकळ कारणासाठी दंगली घडवून आणताना दिसतो आहे, जाळपोळ-दगडफेक करताना दिसून येतो. त्याच वेळी बांगलादेशात अल्पसंख्यक असलेल्या हिंदू समाजाला हिंसेचे लक्ष्य करताना दिसतो. जगातील प्रत्येक शहरात मुस्लिम समाजाची वस्ती वेगळी असते. मग त्या वस्तीत त्या देशाचे कायदे चालत नाहीत, तर फक्त मतलबाच्या शरिया तरतुदी लागू होतात. अशा मुस्लिम वस्त्यांमध्ये तपासासाठीदेखील त्या देशातील पोलिस यंत्रणा जाऊ शकत नाहीत. वीज चोरीपासून इतर सर्व नागरी सुविधांचा मात्र तथाकथित मानवाधिकारांच्या नावाखाली फुकट वापर करण्यात येतो. ज्या लोकशाही देशात जातील तेथे हरप्रयत्ने आपली संख्या वाढवायची आणि इस्लामिक कायदे, उपासना पद्धती यासाठी दंगली घडवून आणायच्या ही इस्लामची प्रमाणित कार्यपद्धती झालेली आहे. अब्राहमिक धर्मीय आणि विशेषतः इस्लाम धर्म मागील दोन हजार वर्षांपासून जगात जो उत्पात माजवीत आहे तो इस्लामोफोबियामागील कारण आहे. यासाठी इतर धर्मीयांनी नव्हे, तर मुस्लिम समाजाने स्वतःत मोठा बदल करणे आवश्यक आहे.

९८८१२४२२२४

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# 'स्टील हब' विकासाचे नवे पर्व

माओवाद्यांच्या रक्तरंजित कारवायांनी गाजलेला गडचिरोली जिल्हा... कुपोषण आणि आरोग्याच्या समस्यांमुळे राज्याच्या पटलावर मागास म्हणून उमटलेला गडचिरोली जिल्हा... बेरोजगारी व उद्योगविरहित आणि विकासाच्या बाबतीत संपूर्ण राज्यात मागासलेपणाच्या यादीत अव्वल स्थानावर पोहोचलेला गडचिरोली जिल्हा, अशी ओळख असणाऱ्या गडचिरोली जिल्ह्याचे भाग्य उजळण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. मुख्यमंत्री हेच गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री झाल्याचे इतिहासात पहिल्यांदाच घडले असून त्याचा फायदा निश्चितच गडचिरोली जिल्ह्याला होऊ लागला आहे. गडचिरोली जिल्ह्याच्या विकासासाठी धोरणात्मक निर्णयाची आणि भरीव तरतुदींची गरज आहे. ही उणीव केवळ मुख्यमंत्री असणारा पालकमंत्रीच भरून काढू शकतो आणि त्यामुळेच देवेंद्र फडणवीस या जिल्ह्याचे पालकमंत्री झाल्याने गडचिरोलीची घोषणा 'स्टील हब' म्हणून झाली आहे. जिल्ह्याला 'स्टील हब'च्या दिशेने विकसित करण्यासाठी ५०० कोटी रुपयांच्या खनिकर्म महामार्ग प्रकल्पाची घोषणा नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

गडचिरोलीत लॉयड मेटल्स अ‍ॅण्ड एनर्जी लि. कंपनीच्या वाढीव प्रकल्पाचे वर्षाच्या पहिल्याच दिवशी देवेंद्र फडणवीस यांनी भूमिपूजन करून गडचिरोली जिल्ह्याच्या विकासाची मुहूर्तमेढ रोवली आहे. मुख्यमंत्र्यांच्या ड्रीम प्रोजेक्टपैकी गडचिरोली जिल्ह्याचा विकास हे अग्रस्थानी आहे. त्या दिशेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोलीच्या विकासाचे नवे पर्व सुरू केले आहे. गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी येथे रेशीम कोष खरेदी-विक्री बाजारपेठ स्थापन करून स्थानिक बेराजगारांना संधी दिली जाणार आहे. याशिवाय दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत गडचिरोलीसाठी २१ हजार ८३० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले असून, त्यातून ७ हजार ५०० नवीन रोजगाराच्या निर्मितीची अपेक्षा केली जात आहे.



लॉयड मेटल्समुळे गडचिरोलीतील शेकडो बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. याशिवाय जिल्हा स्थानावर व्यापारातही वाढ होऊ लागली आहे. तसेच येथील एमआयडीसी परिसरातील लघु उद्योजकांनाही लॉयड मेटल्सने काम देण्याच्या दिशेने हालचाली सुरू केल्या आहेत. लॉयड मेटल्सचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन् यांनी जिल्ह्यात विविध उपक्रमांच्या माध्यमातून गडचिरोलीच्या विकासाचा मुद्दा शासनापर्यंत पोहोचविला असून, गडचिरोलीच्या विकासात स्टील उद्योगाचे मोठे योगदान राहील, अशा सूचना देखील शासनाला केल्या आहेत. त्यामुळे शासनाने सुद्धा गडचिरोलीत नवीन विमानतळाच्या सर्वेक्षण आणि अन्वेषणाची कामे सुरू केली आहे. गडचिरोलीच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या या घोषणांमुळे जिल्ह्यात उद्योग, वाहतूक आणि रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणावर निर्माण होतील अशी अपेक्षा केली जाऊ लागली आहे. शासनाच्या एकूणच ५०० कोटींच्या खनन कॉरिडोर प्रकल्प आणि गडचिरोलीला स्टील हब म्हणून विकसित करण्याच्या दृष्टिकोनाचे लॉयड मेटल्सचे निवासी संचालक विक्रम मेहता यांनी स्वागतही केले आहे. शासनाच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमामुळे गडचिरोली जिल्ह्यात औद्योगिक वाढ, रोजगार निर्मिती आणि सामाजिक व आर्थिक विकासाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळणार आहे. याशिवाय अर्थसंकल्पात गडचिरोलीसाठी भरीव तरतूद करून या भागातील दारिद्र्य दूर करण्याचा सरकारचा संकल्प आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री हे गडचिरोलीतील प्रकल्प जलद गतीने कार्यान्वित होण्यासाठी विशेष लक्ष देत आहेत. गडचिरोली जिल्ह्याच्या विकासासाठी अधिकाधिक लक्ष देऊ असे आश्वासन सहपालकमंत्री अ‍ॅड. आशिष जयस्वाल यांनी दिले आहे. एकट्या गडचिरोली जिल्ह्याला मुख्यमंत्रीच पालकमंत्री म्हणून लाभले आहेत. आणि त्यांना सहकार्य करण्यासाठी सहपालकमंत्री म्हणून अ‍ॅड. आशिष जयस्वाल यांनी गडचिरोलीच्या विकासाचे शिवधनुष्य हाती घेतले आहे. गडचिरोलीच्या दीर्घकालीन समृद्धीसाठी लॉयड मेटल्स शासनाला सहकार्य करेल आणि गडचिरोलीच्या विकासासाठी लॉयड मेटल्स सुद्धा प्रयत्न करेल, अशी ग्वाही कंपनीचे निवासी संचालक मेहता यांनी दिली आहे. जो गडचिरोली जिल्हा आजवर नक्षल्यांच्या घातपाताने, अविकासाने, मागासलेपणाने देशाच्या पटलावर अव्वलस्थानी पोहोचला होता, तोच गडचिरोली जिल्हा आता 'स्टील हब' म्हणून अख्ख्या देशाचे लक्ष वेधून घेत आहे. गुंतवणूकदारांचा लोंढा आता गडचिरोलीच्या दिशेने वाढू लागला आहे आणि हेच खऱ्या अर्थाने गडचिरोलीच्या विकासाची नांदी ठरेल, यात तिळमात्र शंका नाही.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# प. बंगालमध्येही २०२६ मध्ये कमळ फुलणार?

देशातील १४ राज्यांत सध्या भाजपाचे मुख्यमंत्री आहेत. रालोआतील मित्रपक्षांच्या मिळून मुख्यमंत्र्यांची संख्या दीड डझनापेक्षा जास्त होते. याचाच अर्थ सध्या देशातील अध्यपिक्षा जास्त राज्यांत भाजपा आणि मित्रपक्षांचे मुख्यमंत्री आहेत. दिल्लीत भाजपाच्या मुख्यमंत्र्याने शपथ घेतल्यानंतर आता बिहार विधानसभा निवडणुकीकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. बिहारमध्ये मुख्यमंत्री जदयूचा असला किंवा भाजपाचा असला तरी तो रालोआचाच राहणार, याबाबत शंका नाही.

देशातील उत्तरेकडील बहुतांश राज्यात भाजपाचे मुख्यमंत्री असले तरी दक्षिणेकडील पाचपैकी सध्या एकाही राज्यात भाजपाचा मुख्यमंत्री नाही. विधानसभा निवडणुकीपूर्वी कर्नाटकमध्ये भाजपाचा मुख्यमंत्री होता. कर्नाटकवगळता दक्षिणेतील अन्य कोणत्याही राज्यात भाजपाला आतापर्यंत सत्ता मिळवता आली नाही. कर्नाटकात मात्र भाजपाने दोन-तीनवेळा सत्ता मिळवली, येदियुरप्पा हे राज्यातील भाजपाचे पहिले मुख्यमंत्री होते, तर एस. आर. बोम्मई हे दुसरे.

दक्षिण भारतात कर्नाटक वगळून केरळ, तेलंगणा, आंध्रप्रदेश आणि तामिळताडू या चार राज्यांत भाजपाला आतापर्यंत एकदाही सत्ता मिळवता आली नाही. त्यामुळे कर्नाटकला भाजपाचे दक्षिण भारतातील प्रवेशद्वार म्हटले जाते. आंध्रप्रदेशात भाजपाचा मित्रपक्ष असलेल्या तेलगू देसमचे एन. चंद्राबाबू नायडू हे मुख्यमंत्री आहेत. म्हणजे दक्षिण भारतातील पाचपैकी एकाच राज्यात सध्या रालोआचा मुख्यमंत्री आहे. उर्वरित चार राज्यांत भाजपा वा रालोआ सत्तेपासून दूर आहे. दक्षिण भारतातील केरळ, तेलंगणा, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडू वगळता देशात आणखी काही राज्ये अशी आहेत, ज्याठिकाणी भाजपाचा मुख्यमंत्री कधी झाला नाही. यापैकी काही ठिकाणी भाजपाच्या मित्रपक्षांचा मुख्यमंत्री नक्की झाला, पण भाजपाचा मुख्यमंत्री आतापर्यंत शपथ घेऊ शकला नाही. यात बिहारचा प्रामुख्याने समावेश करावा लागेल. बिहारमध्ये भाजपाचा मित्रपक्ष असलेल्या जदयूचे नितीशकुमार मुख्यमंत्री आहेत. यावर्षीच्या अखेरीस बिहार विधानसभेची निवडणूक होत आहे, ही निवडणूक जदयू आणि भाजपा एकत्रितपणे लढवत आहे. निवडणुकीनंतर जदयू आणि भाजपा युतीला बहुमत मिळाल्यानंतर पुन्हा एकदा नितीशकुमार मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली, असे मानले जाते. प्रत्येकवेळी भाजपाला उपमुख्यमंत्रिपदावर समाधान मानावे लागले. आधी सुशीलकुमार मोदी उपमुख्यमंत्री राहात होते, आता भाजपाचे विजयकुमार सिन्हा आणि सम्राट चौधरी उपमुख्यमंत्री आहेत. दोन्ही सरकारमध्ये मुख्यमंत्री मात्र नितीशकुमार होते आणि आहे. फरक एवढाच की भाजपाच्या उपमुख्यमंत्र्यांची संख्या एकवरून दोनवर गेली. विशेष म्हणजे सध्याही बिहार विधानसभेत भाजपा आमदारांची संख्या जदयू आमदारांपेक्षा जवळपास दुप्पट आहे. असे असतानाही भाजपाने जदयूला मुख्यमंत्रिपद दिले, हा भाजपाचा मनाचा मोठेपणा मानायचा की राजकीय तडजोड, हे सांगता येणार नाही.

पंजाबमध्ये सध्या आम आदमी पक्षाची सत्ता आहे, कधीकाळी पंजाबमध्ये भाजपा आणि अकाली दल बादल गट यांची सत्ता होती. अकाली दल बादल गटाचे प्रकाशसिंग बादल यांनी अकाली दल आणि भाजपा युतीचे नेते म्हणून दीर्घकाळ पंजाबचे मुख्यमंत्रिपद भूषवले. अकाली दलाचा मित्रपक्ष म्हणून भाजपा राज्यात दीर्घकाळ सत्तेवर होता, पण राज्यात भाजपाचा मुख्यमंत्री आतापर्यंत कधीही झाला नाही. नंतर काळाच्या ओघात राज्यातील अकाली दल आणि भाजपा यांची युतीही तुटली. अकाली दल हा भाजपाचा सर्वांत जुना मित्रपक्ष म्हणून ओळखला जात होता. त्यामुळे केंद्रातील वाजपेयी सरकारमध्ये आणि त्यानंतर नरेंद्र मोदी सरकारमध्येही अकाली दलाचे नेते सहभागी झाले होते.

जम्मू-काश्मीरमध्येही आतापर्यंत एकदाही भाजपाची सत्ता आली नाही, वा भाजपाचा नेता मुख्यमंत्री झाला नाही. नाही म्हणायला भाजपाने मेहबुबा मुफ्ती यांना पाठिंबा देत राज्यात सरकार स्थापन केले होते. त्यावेळी भाजपाचे डॉ. निर्मलसिंह उपमुख्यमंत्री होते. पण हे सरकार फारकाळ टिकले नाही, लवकरच कोसळले. जम्मू-काश्मीरची सत्ता सुरुवातीला काही वर्षे काँग्रेसकडे होती, नंतर आलटून पालटून ती नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपीकडे राहिली. नॅशनल कॉन्फरन्सचे आधी शेख अब्दुल्ला, नंतर फारुक अब्दुल्ला मुख्यमंत्री होते आणि आता उमर अब्दुल्ला मुख्यमंत्री आहेत. पीडीपीत मुफ्ती मोहम्मद सैद यांनी मुख्यमंत्रिपद भूषवले, नंतर त्यांच्या कन्या मेहबुबा मुफ्तीही मुख्यमंत्री झाल्या होत्या. पश्चिम बंगाल हे देशातील एकमेव असे राज्य असावे, ज्या राज्यात आतापर्यंत भाजपाला एकदाही सत्ता मिळवता आली नाही. सुरुवातीला हे राज्य डाव्या पक्षाचा म्हणजे माकपचा बालेकिल्ला होता, नंतर गेल्या १५ वर्षांपासून राज्यात तृणमूल काँग्रेसची सत्ता असून ममता बॅनर्जी मुख्यमंत्री आहेत. माकपच्या कार्यकाळात आधी ज्योती बसू यांनी दीर्घकाळ पश्चिम बंगालचे मुख्यमंत्रिपद भूषवले, त्यांच्यानंतर बुद्धदेव भट्टाचार्य मुख्यमंत्री झाले. तृणमूल काँग्रेसतर्फे ममता बॅनर्जी १४ वर्षांपेक्षा जास्त काळापासून मुख्यमंत्री आहे. पण आता त्यांच्या आणि तृणमूल काँग्रेसच्या राज्यातील बालेकिल्ल्याला खिंडार पडत आहे. २०११ मध्ये पहिल्यांदा सत्ता मिळवताना ममता बॅनर्जी यांची लोकप्रियता जशी होती, तशी आता राहिली नाही. २०११ नंतर, २०१६ तसेच २०२१ अशा सलग तीन विधानसभा निवडणुकीत ममता बॅनर्जी यांनी विजय मिळवला असला तरी २०२६ ची निवडणूक जिंकणे ममता बॅनर्जी यांना सोपे राहिले नाही. त्यांची स्थिती दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आपचे नेते अरविंद केजरीवाल यांच्यासारखी व्हायची शक्यता आहे. केजरीवाल यांनीही २०१३ आणि नंतर २०१५ ते २०२० अशी सलग तीन वेळा राज्याचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली होती, पण २०२५ च्या चौथ्या निवडणुकीत आपचाच पराभव झाला नाही तर केजरीवाल यांनाही दिल्लीच्या जनतेने धूळ चारली. ममता बॅनर्जी यांची स्थिती तशीच झाली तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

राज्यात भाजपाचा प्रभाव आधी खूप कमी होता, पण २०१९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर भाजपाचा राज्यातील प्रभाव वाढत गेला. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर यात भर पडली. त्यामुळे २०२६ मध्ये होत असलेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपाने दिल्लीसारखाच नेत्रदीपक विजय मिळवला तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. पश्चिम बंगाल हे देशातील एकमेव असे राज्य म्हणायला पाहिजे, ज्याठिकाणी भाजपाचे कमळ आतापर्यंत फुलले नाही. पण यावेळी राज्यात कमळ फुलवण्याची पूर्ण तयारी भाजपाने केली आहे.

९८८१७१७८१७

## थोर देशभक्तांचा अपमान थांबवा!

सध्या देशात थोर देशभक्त, क्रांतितिकारी, हुतात्मा आणि धर्मवीरांच्या चारित्र्यावर टीका करण्याची स्पर्धाच सुरू आहे. नुकतेच अबू आझमी यांनी औरंगजेबाला प्रतिभावान असे संबोधले. म्हणजेच धर्मवीर संभाजी राजे यांच्या अतुलनीय शौर्याचा आणि धर्मनिष्ठेचा अपमान केला. तसेच, काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी लोकसभेत स्वातंत्र्यवीर सावरकरांवर टीका करत 'हमारी तरफ शहिदों की लाईन लगी थी । तुम्हारे सावरकर अंग्रेजों की माफी मांग रहे थे' असे उन्मत्त वक्तव्य केले. यातून त्यांचे इतिहासाचे अज्ञान दिसून येते.

अशी विधाने म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे चारित्र्यहनन करणेच आहे. स्वातंत्र्यलढ्यातील स्वा. सावरकरांचे योगदान अमूल्य आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे काँग्रेसच्या नेत्यांनीच पूर्वी सावरकरांचा गौरव केलेला आहे. २६ फेब्रुवारी १९६६ या दिवशी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे निर्वाण झाले. त्यावेळी लोकसभेत श्रद्धांजली वाहताना काँग्रेसच्या इंदिरा गांधी म्हणाल्या होत्या, देशभक्ती, शौर्य आणि स्वार्थत्याग, साहस या गुणांचे दुसरे नाव म्हणजे सावरकर!

महात्मा गांधींनीही १९२१ साली स्वा. सावरकरांच्या सुटकेसाठी व्हाइसरॉयकडे विनंती करण्याचे आश्वासन दिले होते. त्यामुळे स्वा. सावरकरांचा सुटकेसाठी केलेला अर्ज माफीनामा होता असे म्हणणे हा इतिहासाचा विपर्यास आहे. त्यांच्या अर्जाला 'माफीनामा' संबोधून त्यांची कुचेष्टा करणाऱ्यांना हे देखील बहुधा माहिती नसावे की, स्वा. सावरकर यांच्या सुटकेनंतर त्यांचा सत्कार सगळ्याच पक्षांनी केला, अगदी काँग्रेसच्या नेत्यांनी देखील!

स्वा. सावरकर हे इंग्रजांचे गुप्तहेर होते असा अपप्रचार केला जातो. परंतु जेव्हा सरकारने स्वा. सावरकरांच्या उपजीविकेच्या साधनांची जप्ती केली, त्यानंतर त्यांची उपजीविका चालवण्याची जबाबदारी ही सरकारची होती, त्यानुसार जीवनावश्यक गोष्टी पुरविण्यास सरकार कायदेशीर बांधील होते. त्यामुळे या ठिकाणी कुठेही हेरगिरी करण्याच्या मोबदल्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. कुठल्याही देशभक्ताच्या चारित्र्यावर खोटे आरोप करणे हे पूर्वग्रहदूषितपणाचे लक्षण आहे आणि बुद्धीची दिवाळखोरी दर्शवते.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

## वाचक पत्रे

### राष्ट्रविघातक विचारांच्या उच्चाटनासाठी राष्ट्रधर्म जागृतीची गरज

अबू आझमी यांनी विधानसभेतील आवारात औरंगजेब किती चांगला शासक होता वगैरे वगैरे अशी हिंदुद्रोही मुक्ताफळे उधळली. ते अशा प्रकारच्या वल्गना नेहमीच करत असतात. कारण आपण त्यांना कायमस्वरूपी आणि एकजुटीने विरोध करत नाही म्हणून त्यांची हिंमत वाढते. विचार केला तर लक्षात येते की, काही जण इतिहासाची एकतर्फी मांडणी करून सत्य लपवण्याचा प्रयत्न करतात. इतर धर्मीय आपल्या धर्माच्या रक्षणासाठी सतत जागरूक असतात, तसेच हिंदूंनाही आपला धर्म आणि अस्तित्व सुरक्षित ठेवायचे असेल, तर हिंदुराष्ट्राच्या स्थापनेशिवाय पर्याय नाही.

हिंदुराष्ट्र स्थापनेसाठी कार्य करणाऱ्या संघटनांना प्रसारमाध्यमांमध्ये अधिक प्रसिद्धी मिळणे गरजेचे आहे. धर्माच्या रक्षणासाठी योगदान दिल्यास हिंदुराष्ट्राच्या स्थापनेसाठी वेळ लागणार नाही. पुरोगामित्वाच्या नावाखाली राष्ट्रवाद चिरडणारे, अंधश्रद्धा निर्मूलनाच्या नावाखाली तरुणांचे खच्चीकरण करणारे आणि ईश्वर, राष्ट्रपुरुष तसेच संतांविषयी वाद निर्माण करणारे हेच देशाचे खरे शत्रू आहेत. अशा व्यक्तीचा खरा चेहरा लोकांसमोर आणणे आवश्यक आहे.

खरंच हिंदुराष्ट्र निर्माण करायचे असेल, तर भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला गीतेच्या उपदेशाने शस्त्रसज्ज केल्याप्रमाणे गीता पठन करणाऱ्या प्रत्येक हिंदूंनी शस्त्रसज्ज व्हायला हवे! आपल्या लेखणीच्या शस्त्राने अबू आझमीसारख्या विचारांचे खंडन करणे. हे सुद्धा शस्त्रसज्ज होणेच आहे.

**रमा देशमुख**/नागपूर

●● ●●

### वारे... गतिमान, पारदर्शक जिल्हा प्रशासन

राज्यातील सर्वसामान्यांची कामे सुकर व्हावी यासाठी दिल्या गेलेल्या लोकाभिमुख, गतिमान, पारदर्शक प्रशासन पुरस्कारासाठी नागपूर जिल्ह्याची 'राज्यातून प्रथम' क्रमांकासाठी निवड झाली. नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला. या सत्काराची बातमी प्रकाशित झाली आणि दुसऱ्याच दिवशी म्हणजे १ मार्चला 'पाणीटंचाई आराखडा तयारच नाही' अशा शीर्षकाची बातमी वाचली. आणि शासनाचे हे पुरस्कार ठरवून तर दिले जात नसावे अशी शंकाही मनात आली. ग्रामीण भागातील संभाव्य पाणीटंचाईची समस्या ओळखून खरे तर जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागातर्फे दरवर्षी जानेवारी महिन्यातच आराखडा तयार करून तो मंजुरीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवायचा असतो. परंतु तो आराखडा संबंधित विभागाने तयारच केला नाही. यावरून ग्रामीण जिल्हा प्रशासनाचा कारभार किती गतिमान आहे हे दिसून येते.

**गजेंद्र डोळके**/८०१०६०३७८९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अ‍ॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स अ‍ॅप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# बारडच्या उप सरपंचाचा पुन्हा राजीनामा!

## राजकीय नाट्य'राज' रंगले ; नाईट वॉचमन पदी वर्णी कुणाची

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.१३ मार्च**

नांदेड जिल्ह्यात मोठी समजली जाणाऱ्या बारड ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदाचे राजकीय नाट्य'राज' संपुष्टात आले असून अखेर राजीनामा मंजूर झाल्याने शेवटच्या काही महिन्यापूरत्या कार्यकाळासाठी नाईट वॉचमन म्हणून उपसरपंचपदी कुणाची वर्णी लागणार याची चर्चा सुरू असून यासाठी अनेकजण इच्छुक असल्याने नाराजी नाट्यही पहावयास मिळू शकते.

स्थानिक स्वराज्य व ग्रामपंचायत निवडणूका डोळ्यासमोर ठेवून उपसरपंच बाळासाहेब देशमुख यांनी उपसरपंचपदाचा लगोलग दुसऱ्यांदा राजीनामा दिल्याने राजकीय नाट्यश'राज' रंगले असून नागरिक अचंबित आहेत. सदरील राजीनामा जरी मंजूर झाला असला तरी या


इंदूबाई भिमेवार


विलास देशमुख


माणिक लोमटे


नंदा देशमुख

पूर्वीच्या राजीनाम्यावर पडदा का पडला हे अजूनही गुलदस्त्यात आहे. या पदासाठी आता जुन्या फळीतील अनेक वेळा सदस्य असलेले ग्रामपंचायत सदस्य विलासराव देशमुख, माणिकराव लोमटे, तसेच महिला वर्गातून इंदूबाई भिमेवार आणि नंदा किशन देशमुख यांच्या नावाची चर्चा आहे. परंतू गावचे रिमोट कंट्रोल हातात राहावे या उद्देशाने जेष्ठांना डावळले जाण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

बारड ग्रामपंचायत अंतर्गत जवळपास साडेतीन हजार ओबीसी मतदार असून राजकीय गणिते आखण्यासाठी ओबीसी चेहरा असलेल्या व गावच्या राजकारणातील प्रमुख समजल्या जाणाऱ्या 'भिमेवार' कुटुंबातील इंदूबाई प्रभाकर भिमेवार यांची उपसरपंचपदी वर्णी लागणार असल्याची अपेक्षा ओबीसी समाजाला आहे. महिला वर्गातील नंदा किशन देशमुख यांना पुढे करून कुटुंबातच उपसरपंच पद ठेवण्याचा पर्याय खुला आहे. तर प्रदीर्घ अनुभव असलेले माजी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य विलासराव देशमुख हेही भक्कम पर्याय आहेत. विरोधी गटात असताना ज्यांचा मोठा वकुब होता असे माणिकराव लोमटे हेही एक उपसरपंच पदाचे प्रमुख दावेदार समजले जातात. तेव्हा लोमटे, भिमेवार की अनुभवी देशमुख यांच्यापैकी कुणाची उपसरपंचपदी वर्णी लागणार ? की नवीन चेहऱ्यास समोर आणून अनुभवी जेष्ठांना दूर केले जाणार हेच आता पाहावे लागेल.

**राजकीय नाट्याचा परिणाम काय होणार ?**

बारडच्या उपसरपंचपदा करिता इंदूबाई भिमेवार, विलासराव देशमुख आणि माणिकराव लोमटे हे तीन प्रमुख दावेदार आहेत. यांपैकी कुणाचीही वर्णी न लागल्यास भविष्यात मोठे राजकीय पडसाद पडू शकतात अशी शक्यता नाकारता येत नाही! यामुळे 'करायला जावे गणपती आणि होऊ नये मारुती' अशीच चर्चा गावात रंगली आहे.

# अंजनी-केरुर वन परिक्षेत्रातील वन्य प्राण्यासाठी कृत्रिम पाणवठ्यामध्ये अखेर आले पाणी

**तभा वृतसेवा**
**नायगांव, दि.१३ मार्च**

नरसी पासून काहीअंतरावर असलेल्या अंजनी,केरुर या वनपरिक्षेत्रासह वनपरिक्षेत्रातील वन्य प्राण्यांचे उन्हाळ्याच्यादिवसात व्यवस्थितरित्या संगोपन झाले पाहिजे या अनुषंगाने देगलूर वनपरिक्षेत्राच्या हद्दीमधील वन परीक्षेत्रातील कृत्रिम पाणवठ्यात उपवनसंरक्षक केशव वाबळे, सहाय्यक वनसंरक्षक भीमसिंग ठाकूर, यांच्या आदेशान्वये देगलूर येथील वनपरिक्षेत्राचे निखिल हिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली टँकरने पाणीपुरवठा करण्यात आला.

नरसी पासून अवघ्या काही अंतरावर अंजनी केरूर येथील काही भूक्षेत्र हे वनपरिक्षेत्राने व्यापले असून व त्यात राज्य शासनाने वनातील हारिण यांसारख्या वन्य प्राण्यांच्या शिकारीवर बंदी घातल्यामुळे या वनपरिक्षेत्रात राहणाऱ्या वन्य प्राण्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. गेल्या काही दिवसापासून उन्हाळ्याची दाहकता खूप मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे येथील वन परिक्षेत्रातील कृत्रिम पाणवठे




कोरडेच आसल्यामुळे वनातील वन्य प्राण्यांना मानवी वस्तीकडे पाण्याच्या

तरुण भारत इफेक्ट

शोधात भटकंती करावी लागत आहे. अशातच मागील काही दिवसापूर्वी अंजनी या वनपरिक्षेत्रातून मादी हारिण पाण्याच्या शोधात देगलूर ते नरसी हे राज्य महामार्गाचा रस्ता ओलांडून बिजूर येथील मानवी वस्तीकडे येत असताना अज्ञात वाहनाच्या धडकेत गतप्राण झाले. ही बातमी दि. २४ फेब्रुवारी रोजी प्रकाशित करण्यात आली होती. नांदेड येथील उपवनसंरक्षक केशव वाबळे, सहाय्यक वन संरक्षक भीमसिंग ठाकूर यांच्या आदेशान्वये देगलूर येथील वन परिक्षेत्र अधिकारी निखिल हिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल शंकर गेडाम, वनरक्षक केरूर सहदेव, दोसलवारसह देगलूर येथील वन परीक्षेतील सर्व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत दि.१२ मार्च रोजी अंजनी, केरुर कक्ष क्रमांक ५८१ येथील वनातील वन्य प्राण्यांसाठी कृत्रिम पाणवठ्यात अखेर टँकरने पाणी पुरवठा करण्यात आला.

## संक्षिप्त वृत्त



### देशमुख-मराठा समाज वधु-वर परिचय मेळावा

**अर्धापूर**-तालुक्यातील पिंपळगाव महादेव परिसरातील विठ्ठलराव देशमुख मंगल कार्यालय येथे देशमुख मराठा समाज वधु-वर ग्रुप नांदेड यांच्या वतीने वधु-वर परिचय मेळाव्याचे आयोजन व वधू-वर परिचय पुस्तिका प्रकाशन समारंभ करण्यात आला. यावेळी वधु-वर पालकांसह समाजातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवृत्त न्यायाधीश किशोर देवसरकर तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.सुधीर देशमुख अधिष्ठता डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णुपूरी, व डॉ. सौ.अरुणा सुधीर देशमुख यांची उपस्थिती होती.त्यांच्या शुभहस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन व वधू-वर परिचय पुस्तिकांचे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजक बापूसाहेब देशमुख वाकीकर, अशोक देशमुख, पंडित देशमुख, आनंदीदास देशमुख, शिवाजी देशमुख, संतोष देशमुख, दिनकर वाडीकर, बंडूभाऊ देशमुख यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी देशमुख मराठा समाज वधु-वर ग्रुपने परिश्रम घेतले. यावेळी जिल्ह्यातील विविध तालुक्यातील मान्यवर व्यक्तीं, वधू-वर, पालक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### केंद्र संचालक डॉ.प्रमोद वाघमारे यांचा निरोप समारंभ

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१३ मार्च**



येथील दीनदयाल कनिष्ठ महाविद्यालय या परीक्षा केंद्रावर गेल्या महिन्याभरापासून सुरू असलेल्या बारावीच्या परीक्षेचा नुकताच समारोप झाला. या परीक्षा शासनाने दिलेल्या निर्देशानुसार कॉपीमुक्त वातावरणात अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न केल्याबद्दल दीनदयाल कनिष्ठ महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्राच्या वतीने केंद्र संचालक डॉ.प्रमोद वाघमारे यांना सन्मानपूर्वक निरोप देण्यात आला.



नांदेड- पत्रकारांवरील होणारे वारंवार हल्ले व खोटे गुन्हे दाखल करणे थांबवावे या मागणीचे निवेदन जिल्हा मराठी पत्रकार संघाने जिल्हा पोलीस अधीक्षक व निवासी उपजिल्हाधिकारी यांना देण्यात आले. यावेळी जिल्हाधक्ष संतोष पांडागळे, माजी जिल्हाध्यक्ष गोवर्धन बियाणी आदीसह अनेक पत्रकारांची उपस्थिती होती.

# महाबोधी बौद्ध विहाराचे व्यवस्थापन बौध्दांच्या ताब्यात द्या : बौद्ध महासभा



**तभा वृतसेवा**
**मुखेड, दि.१३ मार्च**

विश्वाला शांतीचा संदेश देणाऱ्या सिध्दार्थ गौतम बुध्दांना जेथे ज्ञानाची प्राप्ती झाली ते बिहार राज्यातील बौध्द गया येथील प्राचीण महाबोधी महाविहार हे जगभरातील बौध्दांचे सर्वोच्च पवित्र श्रध्दास्थान आहे. बौध्दांचे श्रध्दास्थान बौध्दांच्याच ताब्यात असले पाहिजे. महाबोधी महाविहाराचे संपुर्ण व्यवस्थापन बौध्दांच्या ताब्यात देणे हा नैसर्गिक न्याय ठरेल. त्यामुळे १९४९ चा महाबोधी महाविहार व्यवस्थापन कायदा दुरूस्त करून महाबोधी महाविहार व्यवस्थापन समितीत सर्व सदस्य बौध्द असांवेत असा कायदा करून महाबोधी महाविहार बौध्दांच्याच ताब्यात दयावे अशी संपूर्ण जगातील बौध्द अनुयायांची मागणी आहे.

या मागणीच्या अनुषंगाने महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन देशभरात मागील अनेक दिवसांपासून बौध्द गयेतील महाबोधी महाविहार येथे बौध्द भिक्षुचे आंदोलन चालू आहे. त्या आंदोलनास भारतीय बौद्ध महासभेचा संपुर्ण पाठिंबा आहे. प्रत्येक धर्माच्या लोकांचे प्रार्थनास्थळ हे त्या-त्या धर्माच्या लोकांच्या ताब्यात आहेत, परंतू महाबोधी महाविहार हे बौध्दांच्या ताब्यात नाही. महाबोधी महाविहार व्यवस्थापन कायद्यात तात्काळ बदल करण्यात यावा व संपुर्ण महाबोधी महाविहार हे बौध्दांच्या ताब्यात देण्यात यावे या मागणी कण्यात आली आहे.

यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे मुखेड तालुका अध्यक्ष गंगाधर सोंडारे, सरचिटणीस अविनाश कांबळे, कोषाध्यक्ष कुलदीप कोत्तापल्ले तसेच आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते माजी जि.प सदस्य पँथर दशरथ लोहबंदे , माजी पं.स सदस्य जे.बी कांबळे बिल्लाळीकर, अ‍ॅड.संजय भारदे, पवन कांबळे, आकाश कांबळे, आशिष भारदे, पी.एस. कांबळे ,वाय. एच.कांबळे, सचिन गायकवाड, नितीन गायकवाड, मनोज ढवळे, नितीन गायकवाड,अशोक गवळे, राजू सोनकांबळे,गंगाधर बनसोडे, चिमणाजी बाबळे, अंतेश्वर सोनकांबळे, धोंडीबा गायकवाड, आनंद सोनकांबळे ,राजेंद्र कांबळे, मोहन गवळे, धर्माजी वाघमारे, एम.बी.गायकवाड, एल.एन. सोनकांबळे, विठ्ठल शिरसाठे, एस. ई.सोनकांबळे यांच्यासह बौद्ध समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित उपस्थित होते.

# देशात जुनी पेन्शन योजना कधी लागू होणार?

## खासदार रवींद्र चव्हाण यांचा लोकसभेत सवाल

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१३ मार्च**

केंद्र व राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी अद्याप पूर्ण झालेली नाही. देशातील लाखो कर्मचाऱ्यांच्या मागणीचा व त्यांच्या भावनांचा विचार करून सरकार जुनी पेन्शन योजना (ओपीएस) देशात केव्हा लागू करणार आहे?, असा सवाल करून खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी या महत्त्वपूर्ण विषयाकडे लोकसभेत शासनाचचे लक्ष वेधले.

देशभरातील लाखो शासकीय कर्मचाऱ्यांची जुनी



पेन्शन योजना लागू करण्याची मागणी प्रलंबित आहे. ही बाब लक्षात घेऊन खासदार रवींद्र चव्हाण यांनी बुधवारी लोकसभेत हा मुद्दा उपस्थित केला. खासदार रवींद्र चव्हाण म्हणाले, निव्वळ आश्वासनाशिवाय या कर्मचाऱ्यांना काहीच मिळाले नाही.

जुनी पेन्शन योजना लागू करावी ही केंद्र आणि राज्य सरकारच्या लाखो कर्मचाऱ्यांची प्रमुख मागणी आहे. या प्रमुख मागणीकडे सरकारचे दुर्लक्ष होत आहे . विशेष म्हणजे

सरकारी कर्मचारी त्यांच्या संपूर्ण जीवनाचा महत्त्वाचा भाग सरकारचे धोरण लागू करण्यात आणि राष्ट्राच्या सेवेत समर्पित करतात. परंतु जेव्हा ते सेवेतून निवृत्त होतात, तेव्हा त्यांना एन पी एस/यूपीएस यासारख्या निरर्थक योजनांच्या माध्यमातून त्यांच्या पुढील जीवनात अंधकारात जावे लागते. त्यांना वयोवृद्ध अवस्थेत अनंत अडचणीसह जगण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. या सर्व बाबींचा विचार करता लाखो कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा विचार करून सरकार जुनी पेन्शन योजना (ओपीएस) देशात केव्हा लागू करणार आहे, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

# सणासुदीचे महत्व कमी झालेत ते टिकवता आले पाहिजे : पो. नि.चिंचोलकर

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.१३ मार्च**



सणाचे महत्त्व कमी झाले आहेत ते आपनाला पारंपारिक पद्धतीने ठिकवता आले पाहिजे आसे मत नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी व्यक्त केले. रमजान ईद व होळी या सणानिमित्त ग्रामिण पोलीस ठाण्यात शांतता कमिटीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत ते बोलत होते.

यावेळी सपोनि सचिन गडवे यांनी ही उपस्थितीताना मार्गदर्शन केले. यावेळी पो.उप.नि. भोसले यांच्यासह परिसरातील पोलीस पाटील, सामाजिक कार्यकर्ते, व्यवसायीक यांच्या सह सर्व समाजातील ज्येष्ठ नागरिकांची उपस्थिती होती. याप्रसंगी पी.एस. गवळे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की मानुसकी शिवाय मानसाला दुसरा धर्म नाही. सिडको हडको ची निर्मिती झाली तेंव्हा पासुन येथे जातीय तेढ निर्माण झाली नाही.येथील सर्वच जातीची माणसे एकोप्याने राहतात. यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ.नरेश रायवार, करूना जमदाडे ,रावसाहेब महाराज, शिवाजी कदम तुप्पा, एकनाथ वाघमारे, विलास गजभारे, भि.ना.गायकवाड, गिरीधर मैड, सम्राट आरढाव, पोलीस पाटील विलासराव पुयड, शिवाजी हंबर्डे, किशनराव सोनकांबळे यांच्यासह या बैठकीस सामाजिक, राजकीय कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

सदरील बैठक यशस्वी करण्यासाठी गोपनीय शाखेचे बालाजी जनतापल्ले, बालासाहेब टर्के गृह रक्षक दलाचे माधव व पोलीस आमदार यांनी परिश्रम घेतले.

# न्यायालयीन संघर्षात संचालक कैलास गोरठेकर यांना मिळाले स्थगिती आदेश

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि.१३ मार्च**



गोरठेकर विरुद्ध कवळे यांचा संचालक पदासाठी न्यायालयीन प्रश्नाचा निर्णय राजकीय प्रतिष्टेचा ठरला होता पण अखेर कैलास गोरठेकर यांनी स्थगिती आणून बाजी मारल्याने पुन्हा राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे .

संदीप कवळे यांनी नांदेड जिल्हा बँकेचे संचालक कैलास गोरठेकर विरुद्ध नांदेड न्यायालयात अपिल दाखल केले हो होते. नांदेड न्यायालयाने कैलास गोरठेकर यांचे पद रद्द ही केले होते. या पदास वरिष्ठ न्यायालयात गोरठेकर यांनी आवाहन देत पुर्न निर्णयाची याचीका दाखल केली. त्यावर वरिष्ठ न्यायालयाने त्यांना जैसे थे स्थगिती आदेश दिल्याने कार्यकर्त्यात जल्लोष साजरा होत आहे. नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक कैलास गोरठेकर यांच्या निवडणूक प्रक्रियेत अनुभव प्रमाणपत्र चुकीचे असल्याचे कारणावरून नांदेड न्यायालयाने त्यांचे पद रद्द करून प्रतिस्पर्धी संदिप कवळे यांना विजयी जाहीर केले होते. यास आव्हान देत वरिष्ठ न्यायालयात याचिका दाखल केली होती. बुधवारी झालेल्या सुनावनीनंतर कैलास गोरठेकर यांचे पद कायम ठेवून स्थगिती दिली आहे. स्थगिती आदेश मिळतात उमरीत कैलास गोरठेकर व कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला आहे.

**शेवटी सत्याचा विजय झाला**

जिल्हा बँकेच्या संचालक पदास राजकीय षडयंत्र रचून चुकीच्या पद्धतीने घात करण्याचा प्रयत्न केला. पण वरिष्ठ न्यायालयाने खरोखर न्याय दिला असून हा एका प्रकारे सत्याचा विजय असल्याची प्रतिक्रिया जिल्हा बँकेचे संचालक कैलास देशमुख गोरठेकर यांनी दिली आहे.



उमरी - उद्योगपती मारोतराव कवळे यांनी धर्माबाद - उमरी तालुक्यात शेतकरीऱ्यांच्या सिंचनाची सोय व्हावी म्हणून 'पाणी अडवा पाणी जिरावा' या संकल्पनानुसार व्ही .पी के उद्योग समुहाकडून बंधारे बांधण्याचा धुमधडका सुरू केला असून तळेगाव - कारेगाव हा ६ वा बंधारा आहे. यावेळी सीईओ संदिप कवळे, पुजा कवळे आदीसह व्ही. पी. के. समुह उपस्थित होते.

# क्रीडा संकुलास वीर बाबुराव शेडमाके यांचे नाव देऊन स्मारकासाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.१३ मार्च**

किनवट येथे राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या तालुका क्रीडा संकुलास थोर क्रांतिकारक बाबुराव शेडमाके यांचे नाव देण्यात यावे तसेच त्यांच्या स्मारकास जागा उपलब्ध करून द्यावी अशा आशयाचे लेखी निवेदन सकल आदिवासी युवा समाजाच्या वतीने आमदार भीमराव केराम यांना देण्यात आले आहे.

निवेदनात नमूद केले आहे की थोर क्रांतिकारक वीर बाबुराव पुल्लेसुर शेडमाके यांचे देशाच्या स्वातंत्र्यात मोलाचे योगदान राहिले आहे. त्यांच्या कार्याची प्रेरणा सदैव तेवत राहावी यासाठी त्यांच्या १९२ व्या जयंतीदिनानिमित्त किनवट येथे राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या तालुका क्रीडा संकुलास वीर बाबुराव शेडमाके हे नाव देऊन त्यांचा गौरव करावा अशी सकल आदिवासी समाजाची भावना आहे तसेच आदिवासी समाजाची प्राचीन ऐतिहासिक सामाजिक संस्कृतीचे संवर्धन करण्यासाठी व नवयुवकांना सतत सामाजिक प्रेरणा मिळण्याच्या दृष्टीने थोर क्रांतिकारक वीर बाबुराव शेडमाके यांच्या स्मारकासाठी प्रशस्त जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी सकल आदिवासी युवा समाज किनवट माहूर तालुक्याच्या वतीने करण्यात आली आहे. निवेदनावर सकल आदिवासी युवा समाजाचे संतोष मऱ्हसकोल्हे पवन मडावी अनिल कनाके आशिष उर्वते राम लोखंडे बालाजी मेश्राम शिवाजी सिडाम,कमलदास वेट्टी,बालाजी सिडाम श्रीकुमार मडावी, लक्ष्मण मडावी, संदीप कनाके,अरविंद पेंदोर अजय मेश्राम आदिच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# संविधानाच्या आठव्यासूचित गोंडीभाषेचा समावेश करून राज्यभाषेचा दर्जा द्यावा : आ. केराम

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.१३ मार्च**

भारतीय संविधानाच्या आठव्या अनुसूचीमध्ये गोंडी भाषा समाविष्ट करून गोंडी भाषेला राज्यभाषेचा दर्जा मिळवून देण्याच्यादृष्टीने केंद्र शासनाकडे शिफारस करावी यासाठी आ. संजय पुराम यांच्या नेतृत्वाखालील गोंडीभाषिक आमदारांच्या शिष्टमंडळाने ११ मार्च रोजी मुंबई मंत्रालयात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन निवेदन सादर केले आहे.

गोंडी समाजाची मुख्य असलेली गोंडीभाषा ही भाषिकदृष्ट्या जरी दुर्लक्षित असली तरी गोंडीभाषा अवगत असणारे व बोलणारे लोक



मध्य भारतासह ओरिसा, पश्चिम बंगाल,कर्नाटक व विदर्भात सुद्धा मोठ्या प्रमाणावर आहेत. प्राचीन काळात गोंडीभाषा बोलणारे गोंड राजे म्हणून राजे-महाराजे प्रसिद्ध आहेत. गोंडी भाषा बोलणारे जवळपास ३ कोटी लोक असून २ कोटी लोकांची ही मातृभाषा आहे. गोंडसमूहात मोडणाऱ्या आदिवासी लोकांची संख्या भारतात जवळपास ९ कोटी आहे तर देशात १३ राज्यांमध्ये ही गोंडीभाषा बोलली जाते. परंतु गोंडीभाषेचा एवढा मोठा व्याप असतानाही या भाषेकडे दुर्लक्ष होत आहे.मादाव संभूशेक यांच्या डमरू नादावरून गोंडी धर्मगुरू पांदीपारी कुपार लिंगो यांनी गोंडी भाषा तयार केल्याची आखायिका आहे.त्यामुळे गोंडी भाषा लुप्त होऊ नये या भाषेचे संवर्धन व्हावे म्हणून भारतीय संविधानाच्या अनुसूची आठ मध्ये गोंडीभाषा समाविष्ट करून तिला राज्यभाषेचा दर्जा मिळावा या मागणीसाठी गोंडीभाषिक आमदारांच्या शिष्टमंडळाने ११ मार्च रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंत्रालयात भेट घेऊन निवेदन सादर केले असून महाराष्ट्रासह भारत देशातील गोंडी आदिवासी समाजाची लोकसंख्या व त्यांची बोलीभाषा व मातृभाषा म्हणुन भारतीय संविधानाच्या अनुसूची आठ मध्ये गोंडीभाषेचा समावेश करून या भाषेला राज्यभाषा म्हणून दर्जा मिळावा यासाठी केंद्र शासनाकडे शिफारस करावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

या शिष्टमंडळात किनवट माहूर विधानसभेचे आ. भीमराव केराम, आ. धर्मराव बाबा आत्राम,आ. राजू तोडसाम,आ. रामदास मसराम व आ. मिलिंद नरोटे यांचा समावेश आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### महाकुंभ तिर्थ दर्शन सोहळा अनुलोम अनुगामी लोकराज्य महाअभियान अंतर्गत कार्यक्रम



**जिंतूर,/प्रतिनिधी :** म१४४ वर्षातुन येणारा महाकुंभ सोहळा गेल्या दिड महिन्यापासून श्री क्षेत्र प्रयागराज येथे महाकुभ सोहळा अयोजीत करण्यात आलेला होता या पुण्य पावन महाकुंभातील जल कलसात घेऊन अनुगामी लोकराज्य महाअभियान अंतर्गत अनुलोम या सेवा संस्थाने महाराष्ट्रातील २५० गावातील हेमाडपंथी पुरातन महादेव मंदिरे,तिर्थ स्थळी हा महाकुभातील पवित्र जल कलशाची दि.२६ बुधवार रोजी त्या ठिकाणी तेथील नागरिक अनिल देशपांडे, एकनाथ राऊत, प्रकाश पवार,भारत पवार, नाथा अंभोरे,गणेश पवार,सोमनाथ गायकवाड, बालाजी जाधव,गणेश सासनिक या सर्व सपत्नीक दांपत्याच्या व आदी मान्यवरांच्या हस्ते या महाकुंभ तिर्थ कलशाचे अभिषेक व पुजा,अर्चना करुन महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले . यावेळी अनुलोम चे अतुल गाडे,पवन पुरी,दिपक भाग्यवंत, पत्रकार एकनाथ आवचार, गणेश राऊत यांच्यासह आदी ची ऊपस्थीत होती.

### बालिका अत्याचार विरोधी मोर्चाने परभणी दणाणली हजारो महिलांसह नागरीक सहभागी : प्रशासनाद्वारे न्यायाची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी शहरातील १० वर्षीय अल्पवयीन बालीकेवर २३ फेब्रुवारी रोजी नराधमाने केलेल्या बलात्कार प्रकरणाच्या निषेधार्थ सोमवारी (दि.१०) येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर संतप्त हजारो महिलांसह नागरीकांनी मोठा निषेध मोर्चा काढला.

येथील लहुजी नगरातून या मोर्चास प्रारंभ झाला. मोठा मारोती मंदिर, शाही मस्जिद, महात्मा ज्योतिबा फुले पुतळा तेथून त्र शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसरात हा मोर्चा दाखल झाला. मोर्चातील संतप्त हजारो महिलांसह नागरीकांनी काळे झेंडे फडकवले. तर कपाळास काळ्या पट्या लावल्या. काही मोर्चेकऱ्यांनी हातात फलके झळकावून पोलिस प्रशासनाचा धिक्कार . तसेच नराधमास फाशीची शिक्षा द्या, आरोपींची नार्को टेस्ट करा, बालिका अत्याचाराचा निषेध असो, फास्ट्रॅक कोर्टात खटला चालवा यासह विविध आशयांचे, निषेधांच्या या फलकांनी शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले. मोर्चातील संतप्त नागरीकांनी प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. मोर्चेकऱ्यांचा प्रचंड रोष होता, तो या मार्गा दरम्यान घोषणांच्या माध्यमातून तीव्रतेने दिसून आला.

संतप्त मोर्चेकऱ्यांनी पुतळा परिसरातील आंदोलनस्थळ मैदानावर ठिय्या मांडला. या ठिकाणी विविध पक्ष, संघटना, संस्थांच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी १३ फेब्रुवारी रोजी गरिब मुलीवर घडलेल्या अमानुष अत्याचाराच्या प्रकरणाचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त . माध्यमांमधून या प्रकरणाबाबत सातत्याने संताप व्यक्त झाला . परंतु, प्रशासनाने लहुजी नगरातील या क्रुर घटने संदर्भात फारशा गांभीर्याने दखल घेतली नाही. यातील जे आरोपी आहेत, त्यांच्या विरोधात कठोर भूमिका घेतली नाही. या आरोपींची नार्को टेस्ट केली पाहिजे, त्यांच्या विरोधात भक्कम पुराव्या आधारे जलदगतीच्या न्यायालयात खटला चालविला पाहिजे व या गुन्हेगारांना फाशीची शिक्षा दिली पाहिजे, अशी मागणी मोर्चेकऱ्यांनी दिली. अन्य भागांबरोबर परभणीतसुध्दा अत्याचाराचे प्रकार वाढत असल्या बद्दल या मोर्चेकऱ्यांनी तीव्र शब्दात निषेध व्यक्त . पिडीत परिवारास शासनाने दहा लाख रुपये देवून त्यांचे पुनर्वसन करावे, अशीही मागणी केली. , एका शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करीत या संवेदनशिल विषयाकडे आपण गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी विनंती केली.

### जात वैधता प्रमाणपत्र अभावी आठ जणांचे ग्रामपंचायत सदस्यत्व झाले रद्द

**सोनपेठ,/प्रतिनिधी :** जात वैधता प्रमाणपत्र अभावी आठ जनांचे ग्रामपंचायत सदस्यत्व रद्द करण्यात आलेले आहे.

सोनपेठ तालुक्यातील गेल्या तीन वर्षांपूर्वी झालेल्या ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीमध्ये राखीव जागेवरून निवडून आलेल्या उमेदवारांनी दिलेल्या मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र दाखल न केल्यामुळे सोनपेठ तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींच्या आठ सदस्यांचे सदस्यत्व नुकतेच जिल्हाधिकारी रघुनाथ गावंडे यांनी ग्रामपंचायत अधिनियमान्वये अपात्र केले .

माहे जानेवारी २०२१ मध्ये सोनपेठ तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या. ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १०-१ अ नुसार राखीव प्रवर्गातून ग्रामपंचायत निवडणूक लढवणाऱ्या ज्या उमेदवाराने, नामनिर्देशन पत्रासोबत जातीचे वैधता प्रमाणपत्र दाखल केले नाहीत. अशा उमेदवारांना निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांचे आत जात वैधता प्रमाणपत्र दाखल करणे अनिवार्य . अन्यथा अशा सदस्यांची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द ठरते. माहे जानेवारी २०२१ मध्ये तालुक्यातील सार्वत्रिक निवडणूक झालेल्या ग्रामपंचायतीमधील आठ सदस्यांचे सदस्यत्व जिल्हाधिकारी रघुनाथ गावंडे यांनी दि .१० मार्च रोजी रद्द ठरवले . त्यामध्ये १) धुमाळ आश्विनी मुंजा (नरवाडी), २) सोगे हनुमान मुक्तीराम (शिरोरी), ३) वाघमारे इंदुबाई मुंजा (वाणीसंगम), ४) चव्हाण चंद्रकला मुंजाजी (वाणीसंगम), ५) वाघमारे अनंत सुंदरराव (वाणीसंगम),६) कदम चतुराबाई कारभारी (दुधगाव), ७) वाघमारे विमलबाई दाजीबा (दुधगांव) ८)डाके इंदुबाई पंडितराव (आवलगाव). यांचे ग्रामपंचायत सदस्यत्व रद्द करण्यात आले .

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# ४२५ शेतकऱ्यांच्या शेताला ३४ शास्त्रज्ञांच्या भेटी- कृषि विद्यापीठाचा 'माझा एक दिवस माझा बळीराजा सोबत' उपक्रम

**परभणी ,/प्रतिनिधीः-** माझा एक दिवस माझ्या बळीराजासोबत या उपक्रांतर्गत बुधवार १२ मार्च रोजी एकूण ११ चमूमधिल ३४ शास्त्रज्ञांनी मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात जवळपास ४२५ शेतकऱ्यांना भेट दिली व त्यांच्या शेतीविषयक समस्या जाणून घेवून त्यास समाधानकारक उत्तरे देवून विविध विषयावर मार्गदर्शन केले.

या उपक्रमात विस्तार शिक्षण संचालनालयाद्वारे मानवत (जिल्हा परभणी) येथे प्रगतिशील शेतकरी मोहन लाड यांच्या शेतावर प्रक्षेत्र भेट व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या भेटीला नामवंत कृषी तज्ज्ञ, शासकीय अधिकारी तसेच पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाला शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, विभाग प्रमुख डॉ. राजेश कदम (विस्तार शिक्षण), डॉ. पुरूषोत्तम नेहरकर (कीटकशास्त्र विभाग), डॉ. रावसाहेब भाग्यवंत (कृषी अभियांत्रिकी विभाग), मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी डॉ प्रशांत देशमुख, कीटक शास्त्रज्ञ डॉ. अनंत लाड यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच स्टेट बँक ऑफ इंडियाचे मॅनेजर चव्हाण, कृषी अधिकारी ठाकूर, औंधकर, शेतकरी मोहन लाड, बालाजी गोलाईत, प्रताप सोरेकर यांच्यासह अनेक प्रगतिशील शेतकरी उपस्थित . याठिकाणी रेशीम संगोपन, संत्रा फळबाग व्यवस्थापन, दुग्ध व्यवसाय यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. तज्ज्ञांनी आधुनिक तंत्रज्ञान, कीड व रोग व्यवस्थापन, तसेच उत्पादन वाढीच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजनांवर चर्चा केली. त्यानंतर बालाजी गोलाईत यांच्या कैलास पोल्ट्री फार्मला भेट देण्यात आली. पोल्ट्री व्यवस्थापन, खाद्य नियोजन आणि व्यवसायिक संधी याविषयी सखोल माहिती घेण्यात आली.




याबरोबरच माझा एक दिवस बळीराजा सोबत उपक्रमांतर्गत मिरखेल (ता. परभणी) येथे प्रगतिशील शेतकऱ्यांसोबत प्रत्यक्ष संवाद व मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास संशोधन संचालक डॉ. खिजर बेग आणि ज्वार संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. एल. एन. जावळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच मिरखेल व परिसरातील अनेक शेतकरी या चर्चासत्राला मोठ्या संख्येने उपस्थित . तसेच विद्यापीठाचे परभणी येथील सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, किटकशास्त्र विभाग, कृषि विस्तार शिक्षण विभाग, कृषि अभियांत्रिकी विभाग, त्र संभाजीनगर येथील राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प, तुळजापूर, त्र संभाजीनगर आणि खामगाव (ता. गेवराई) येथील कृषि विज्ञान केंद्रे, नांदेड येथील कापूस संशोधन केंद्र आणि केळी संशोधन केंद्र, परभणी येथील कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, सेंद्रीय शेती संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र, परभणी, अंबाजोगाई, लातूर आणि त्र संभाजीनगर येथील विभागीय कृषि विस्तार शिक्षण केंद्रे, येथील या कार्यालयातील शास्त्रज्ञानी त्यांच्या परिक्षेत्रातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्र संभाजीनगर येथील कृषि विभागाचे डॉ. तुकाराम मोटे, माजी सहयोगी अधिष्ठाता डॉ मोहन पाटील, सहयोगी संचालकडॉ सूर्यकांत पवार, प्रभारी अधिकारी डॉ. शिवाजी शिंदे, सहयोगी प्राध्यापक डॉ. वीणा भालेराव, सहयोगी कृषी विद्यावेत्ता डॉ. अरविंद पांडागळे, प्रभारी अधिकारी डॉ अनिल गोरे, विस्तार कृषि विद्यावेत्ता डॉ. वसंत प्र. सूर्यवंशी, प्रा. अरुण गुट्टे, डॉ.जी.डी.गडदे, शास्त्रज्ञ डॉ. बी.एम.कलालबंडी, डॉ. सी.व्ही.अंबाडकर, डॉ.डी.डी. पटाईत, डॉ. वर्षा मारवळीकर, डॉ. टी बी. सुरपम, डॉ. बी. बी. गायकवाड, डॉ. अनिता जिंतूरकर, श्री अशोक निर्वळ, श्री नागेश सावंत यांचा सहभाग .

या निमित्त बोलताना कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी शेतकऱ्यांना अधिक उत्पादनक्षम व आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम लाभदायक ठरेल असे नमूद केले.

तसेच यातून कृषी संशोधनाच्या नव्या संधी, आधुनिक शेती तंत्रज्ञान, उत्पादनवाढीसाठी आवश्यक असलेली आधुनिक पद्धती आणि कीड व रोग व्यवस्थापन यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर शेतकऱ्यासोबत सखोल चर्चा करण्यात यावी, असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमातून मिळालेल्या मार्गदर्शनाचा निश्चितच शेतकऱ्यांना फायदा होईल, हा उपक्रम शेतकरी हितासाठी प्रभावी ठरत असल्याचे असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.



## ग्राहक जागरण पंधरवाडा साजरा करा अखिल भारतीय ग्राहक पंचायतची मागणी

**नोहन धारासूरकर**
**गंगाखेड ,/प्रतिनिधी-** जागतिक ग्राहक दिनाचे औचित्य साधून यंदाही ग्राहक जागरण पंधरवाडा १५ मार्च ते ३० मार्च दरम्यान साजरा करण्यात यावा, त्याद्वारे शासनाच्या ग्राहक हिताच्या योजना, आवश्यक माहिती आणि जनजागृतीपर उपक्रम राबवण्यात यावेत, अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतने तहसीलदारांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली .

या उपक्रमांतर्गत शाळा, महाविद्यालये, वस्त्या, ग्रामीण भागातील खेडी येथे पथनाट्य, निबंध स्पर्धा, महिला मंडळांचे कार्यक्रम, शेतकरी मेळावे यांसारख्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून ग्राहक साक्षरता वाढवण्याचा उद्देश . विशेषतः नवा ग्राहक संरक्षण , अन्नसुरक्षा, दिशाभूल करणाऱ्या जाहिराती, सायबर गुन्हे आणि डिजिटल फसवणूक याविषयी माहिती देणे, तसेच खरेदी व्यवहारातील कायदे, वैद्यमापन शास्त्र, अन्न व औषध प्रशासन यांसंबंधी ग्राहकांचे मूलभूत अधिकार या विषयांवर प्रबोधन करण्यात यावे, असे निवेदनात नमूद करण्यात आले .

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष सोपानराव टोले, तालुकाध्यक्ष गोपाळ मंत्री, शहराध्यक्ष सुधाकर चव्हाण, सचिव सय्यद ताजुद्दीन, ॲड. उत्तम काळे (शहर सचिव), कोषाध्यक्ष महेमूद शेख, शहर संघटक प्रभू राठोड, जिल्हा सदस्य प्रतिभा वाघमारे, मंजुषा जामगे, सूर्यमाला मोतीपवळे, सुनिता घाडगे आदी पदाधिकारी उपस्थित .

## स्वाभिमानीद्वारे शक्तीपीठ अधिसूचनेची होळी

**परभणी,/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती तात्काळ करावी, शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा या मागण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने गुरुवारी (दि.१३) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर राज्य सरकारने तीन दिवसापूर्वी सादर केलेल्या अर्थसंकल्पाची व शक्तीपीठ महामार्गाच्या अधिसूचनेची होळी करून सरकारचा जाहीर निषेध करण्यात आला. यावेळी किशोर ढगे, रामप्रसाद गमे, प्रसाद गरुड, गजानन तुरे, कलीम भाई, पि. टी. निर्वल, जगन्नाथ जाधव, किशन शिंदे, कारभारी जोगदंड, विकास भोपळे, गजानन दुगाणे, सतीश दुगाणे, विठ्ठल चोखट, नामदेव काळे, दत्ता परांडे, रणजित चव्हाण यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित . यावेळी जिल्हा प्रशासनास एक निवेदन सादर करण्यात आले. त्याद्वारे, विधानसभेच्या निवडणुकीत शेतकऱ्यांनी भर भरून मत केले, सरकार बहुमतांनी निवडून आले. फडणवीस मुख्यमंत्री झाले. आणि शेतकरी मारक धोरण राबविण्यास सुरुवात केली. सोयाबीनला सहा हजार भाव तर सोडाच साधा हमी भाव सुद्धा मिळत नाही. एकीकडे संपुर्ण सोयाबीन नाफेडच्या मार्फत खरेदी करणार म्हणाले. खरेदी सुरू केली त्यात एक महिना खरेदी बंद राहिली, का तर बारदाना नसल्या कारणामुळे. आणि एक महिन्यापासुन खरेदी बंद केली . त्यामुळे सोयाबीनचे भाव कोसळले आणि शेतकऱ्याला त्यांचे सोयाबीन ३५००/- रू. दराने विकावे लागत आहे, असे या निवेदनातून म्हटले. कापसाचे, तुरीचे, हरभरा यांचे देखील असेच हाल होत . शेती पिकांचा उत्पादन खर्च भरून निघत नसल्याने शेती व्यवसाय तोट्याचा झाला . म्हणूनच मराठवाडा व विदर्भात सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या होत . कर्ज मुक्त करतो म्हणुन दिलेला शब्द पाळायला सरकार तयार नाही. या अर्थ संकल्पात याची तरतूद देखील करण्यात आली नाही. निवडणुकीत शक्तीपीठ रद्द करतो म्हणणारे आता हा मार्ग होणारच असे बोलत . अशी दुटप्पी भूमिका राज्यातील शेतकरी खपवून घेणार नाही. आज देशातील होळीचा सण . वाईटावर चांगल्याची मात या सणातून देशभर संदेश जात आहे म्हणूनच आज सरकारच्या चुकीच्या धोरणांचे होळीमध्ये दहन करत आहोत.

## रेती अभावी अनेकांचे घर बांधण्याचे स्वप्न अपूर्ण- घरकुल हप्ता मिळाला परंतु रेती कधी मिळणार? नागरीकांच्या मनातील सवाल..!

**बाबासाहेब गर्जे**
**सोनपेठ ,/प्रतिनिधी-** तालुक्याच्या उशाला गोदावरी नदी असल्यामुळे येथे वाळूची कधीही चणचण भासली नाही. प्रत्येक वर्षी महसूल प्रशासनाकडून तालुक्यात किमान दोन ते तीन ठिकाणी रेती घाट सोडला जायचा. व बांधकाम धारकांना किफायतशीर किमतीमध्ये रेती सहज उपलब्ध व्हायची. सोनपेठ तालुक्यातील शासकीय रेती घाटातून परभणी, लातूर, बीड या जिल्ह्यामध्ये अधिकृतपणे रेतीची वाहतूक व्हायची. अनेकांचे घर बांधण्याची लगबग उन्हाळाभर सुरू राहायची.त्यातून सिमेंट, लोखंड,विट, खडी,फरशी,स्टाईल आदी विक्रेत्या बरोबरच गौंडी, सुतार,मजूर आदींचा उदरनिर्वाह चालायचा परंतु आता त्यांचा व्यवसाय चालत नसल्याने हे व्यावसायीक अडचणीत सापडले . गेली दोन वर्षापासून तालुक्यात रेतीघाट सोडला जात नसल्यामुळे हजारो नागरिकांच्या घरकुल बरोबरच अनेकांचे घरे बांधण्याचे काम अधुरे राहिली . दरवर्षी पावसाळ्यामध्ये वाहून येणाऱ्या पावसाच्या पाण्याने गोदावरीत मोठ्या प्रमाणात वाळू साठा उपलब्ध होतो. त्यामुळे शासन येथील रेती घाट लिलाव पद्धतीने कंत्राटदारांना विक्री करून बांधकाम धारक नागरिकांना रेती उपलब्ध करून देत असे. त्यामुळे तालुक्यात माफक दरात प्रत्येकाला रेती सहज उपलब्ध व्हायची व त्या पैशातून शासनालाही कोट्यवधी रुपयांचा महसूल मिळायचा. परंतु गेली दोन वर्षापासून शासनाने रेतीच्या धोरणामध्ये बदल केला आणि नवीन धोरणानुसार सामान्य नागरिकांना रेती मिळणे दुरापास्त झाले. पुर्वी २००० रुपयाला ब्रास मिळणारी रेती दहा हजार रुपये ब्रास प्रमाणे मिळू लागली. परिणामी एवढी महागडी किमतीची रेती घेऊन घरकुल धारकां बरोबरच सामान्य नागरिकांना घर बांधणे कठीण झाले. त्यामुळे गेली दोन वर्षापासून शासनाने गोरगरिबांना दिलेल्या घरकुलांचे बांधकामं रखडले . तालुक्यातील हजारो नागरिकांच्या खात्यावर प्रधानमंत्री घरकुल योजनेअंतर्गत मिळालेल्या पहिल्या हप्त्याची रक्कम पडून आहे परंतु घर बांधकामासाठी वाळू उपलब्ध होत नसल्यामुळे बांधकाम धारकांतून नाराजीचा सूर निघत . धरण उशाला आणि कोरड घशाला या उक्तीप्रमाणे जवळ गोदावरीत रेती असूनही ती उपलब्ध होत नसल्यामुळे बांधकाम धारक अडचणीत सापडले . दगडापासून बनवलेल्या कृत्रिम रेतीचा वापर करण्यासाठी शासनाने बांधकाम धारकांना सांगितले असले तरी पूर्वीपासूनच वाळूमध्ये बांधकाम करत आलेले येथील नागरिक कृत्रिम रेतीमध्ये बांधकाम करण्यास धजावत नाहीत. सध्या यावर्षीचा मार्च महिना अर्ध्यावर पोहोचला तरी तालुक्यातील एकही रेती घट सुटण्या संदर्भात शासनाची कुठलीही भूमिका स्पष्ट झालेली नाही. त्यामुळे यावर्षी तरी आपले बांधकाम पूर्ण होईल का? या आशेवर बांधकाम धारक चिंतेत . शासनाला रेतची उपलब्धता करून द्यायची नव्हती तर घरकुलाचा हप्ता तरी खात्यावर कशासाठी वर्ग केला? असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात . यावेळी तालुक्यातील शासकीय बांधकामं, घरकुल बांधकामं, वैयक्तिक स्वतःच्या घराची बांधकामं, घराच्या दुरुस्त्या यासह रोजगार हमी योजनेच्या सिंचन विहिरीचे बांधकामं रखडलेल्या अवस्थेत . पावसाळा सुरू होण्यापूर्वी येत्या अडीच महिन्यामध्ये तरी शासनाने तात्काळ रेती घाटाचा लिलावा करून सामान्य माणसाला सहज व स्वस्तात रेती उपलब्ध करून द्यावी अशी मागणी नागरिकांतून केली जात . गेली दोन वर्षांपासून वाळू अभावी बांधकामं रखडले . त्यामुळे आमचा व्यवसायही आखडला . सध्या लोकांचा पत्र्याच्या शेडवर भर आहे.त्यामुळे किमान नौकर भाडे निघून थोडाफार धंदा चालतो.येथील बांधकाम धारक विको सँड मध्ये बांधकाम करण्यास फारसे धजावत नाहीत. यावर्षी तरी शासनाची वाळू सुरू होईल अशी आशा . रत्नाकर सोनवणे, प्रशांत हार्डवेअर सोनपेठ. बांधकाम धारक लोकं दररोजच भेटून म्हणतात की, यावर्षी आपलं बांधकाम सुरू करायचं आहे पण रेती सुरू झाली तर! परंतू रेती अभावी येथील बांधकामे थांबली असल्याने मिस्त्री,बिगारी यांच्यावर उपासमारीची वेळ आली . आम्हाला ईतर कामं येत नसल्यामुळे अडचण निर्माण झाली . अहेमद खान, मिस्त्री सोनपेठ. तेलंगाणातील तत्कालीन केसीआर सरकारने रेती बाबत राबवलेल्या सुटसुटीत धोरणामुळे राज्य शासनाला मोठ्या प्रमाणावर महसुल व नागरीकांना स्वस्त रेती उपलब्ध झाली होती. राज्यात गेल्या अनेक वर्षांपासून रेतीचे शासकीय टेंडर सुटले नाही . त्यामुळे अव्वाच्या सव्वा दराने सामान्य नागरीकांना रेती विकत घ्यावी लागते. शासनाने घरकुलांसाठी मोफत रेती देण्याचे दिलेले आश्वासन पुर्ण केले नाही. रेती साठी तेलंगाणाच्या धर्तीवर सोपे व सुटसुटीत धोरण राबवावे. सुधीर बिंदू, सामाजिक कार्यकर्ते


सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## बेटर हाफ

सोनाली ठेंगडी / ७७५५९३८८२२

# रोज बायकोच्या पाया पडणारा नवरा!

लग्न म्हणजे एकमेकांच्या सुख दुःखात एकत्र असणे. पण, आजकाल या गोष्टी खूप बदललेल्या पाहायला मिळत आहेत. आपला जोडीदार काय करतो यापेक्षा जर तो त्रासामध्ये आहे तर तो त्याचा प्रश्न आहे असा विचार करण्यात येतो. महिला कुठेही जात नाहीत, परंतु कधीकधी वाईट काळात त्या त्यांचा संयम गमावून बसतात. अशा परिस्थितीत प्रत्येक पतीची इच्छा असते की, त्याची पत्नी वाईट काळात साथ देईल. आयुष्यात पैसा सर्वकाही असताना साथ देणे खूप सोपी गोष्ट आहे. पण प्रेमाची खरी ओळख म्हणजे जेव्हा तुमच्याकडे काहीच नसते आणि तरीही तुमचा जोडीदार तुमच्यासोबत भविष्य पाहण्याची हिंमत करतो तेव्हा होते. जर तुमच्या आयुष्यात अशी व्यक्ती असेल तर त्या व्यक्तीला अंतर देऊ नका, हाच विचार घेऊन जगतात अभिनेता आणि राजकीय नेता रवि किशन!




भोजपुरी स्टार म्हणून ख्यात असणाऱ्या रवि किशन यांचे चाहते असंख्य आहेत. त्यांनी आपल्या चित्रपट कारकिर्दीची सुरुवात १९९२ मध्ये 'पितांबर' या चित्रपटापासून केली होती. त्यांनी हिंदीसह तमिळ, तेलुगू आणि कन्नड भाषेतही काम केले. दाक्षिणात्य सिनेमात ते खलनायक म्हणून जास्त प्रसिद्ध झाले. हिंदीत त्यांना सलमानसोबतच्या 'तेरे नाम'मुळे प्रसिद्धी मिळाली. आपल्या व्यावसायिक जीवनाविषयी ते जितके जागरूक आहेत तितकेच वैयक्तिक जीवनाविषयी संवेदनशील आहेत. ते आपल्या कुटुंबाविषयी फारच अभावाने काही बोलतात. मात्र, ते आपली पत्नी आणि मुलींवर निरातिशय प्रेम करतात. त्यांच्या प्रेमाला आदर आणि श्रद्धेची एक अजोड झालर आहे. ते आपली पत्नी आणि मुलींना देवीस्वरूप मानतात. आज ते यशाच्या ज्या शिखरावर आहेत त्याचे सर्वाधिक श्रेय ते पत्नी प्रीती यांना देतात.

आपण भारतात आदर्शवादी पत्नींचे किस्से बरेच ऐकले असतील. मात्र, आदर्शवादी पतींविषयी कदाचितच कोणी बोलत असेल. अशा आदर्शवादी पतींच्या यादीत रवि किशन यांचे नाव नक्कीच समाविष्ट करावे लागेल. कारण ते श्रद्धेने आपल्या मुलींची पूजा करतात आणि बायकोला लक्ष्मी स्वरूप मानून दररोज तिच्या पाया पडतात. मात्र, बायको झोपल्यानंतरच ते तिच्या पाया पडतात. कारण ती जागी असताना त्यांना असे करू देत नाही. स्त्री ही पूजनीयच असते, असे ठामपणे मानणारे रवि किशन आहेत.

**शाळेतूनच सुरू झाली प्रेमकहाणी**

असे फार अभावानेच पाहायला मिळते की 'बचपन का प्यार' अगदी तरुणपणापर्यंत टिकला आणि त्यांनी आयुष्यभरासाठी लगीनगाठ बांधली. रवि किशन आणि प्रीती यांची प्रेमकथा शाळेच्या दिवसापासूनच सुरू झाली होती. त्यावेळी ते अकरावीत होते. त्याचवेळी त्यांनी ठरवले होते की, हिलाच आपली जीवनसाथी बनवावे.

नंतर जेव्हा तरुणपणी लग्न केले त्यावेळी रवि किशन यांच्या संघर्षाचा काळ सुरू होता. बरेचदा अशीही वेळ आली जेव्हा त्यांना उपाशी झोपावे लागले. मात्र, या संघर्षाच्या काळात बायकोने त्यांची साथ सोडली नाही. मुलींच्या जन्मानंतर रवि किशन यांना चांगले काम मिळू लागले. माझ्या जीवनात जे काही चांगले झाले ते बायको आणि मुलींमुळेच आहे. म्हणूनच मी रोज माझ्या मुलींची पूजा करतो आणि बायकोच्याही पाया पडतो, असे ते सांगतात.

एरवी कोणाला हे ऐकून, व ाचून जरा अतिरेकच आहे, असेही वाटेल. पण शेवटी प्रत्येकाची भावना व्यक्त करण्याची पद्धत असते. रवि किशन यांची वागणूक कायम साधी आणि तितकीच बेधडक राहिली आहे. त्यांच्या वागण्या-बोलण्यातून त्यांची ही शैली लक्षात येते. भोजपुरी सिनेसृष्टीत अपार यश मिळवूनही या कलाकाराने साधेपणा सोडलेला नाही. आजही ते 'फॅमिली मॅन'च म्हणवणे पसंत करतात. त्यांना तीन मुली असून त्यांची नावे रीवा, तनिष्क आणि इशिता आहेत. त्यांच्या मुलाचे नाव नाव सक्षम आहे. त्यांची मुलगी रीवा हिने नुकतेच 'शुभ मंगल सावधान' चित्रपटातून सिनेसृष्टीत प्रवेश केला.

प्रत्येक जोडप्याप्रमाणे यांच्याही जीवनात तिसऱ्या व्यक्तीचे वादळ आले. नगमासोबत रवि किशन यांचे नाव अशा काही पद्धतीने जोडले गेले की आता या दोघांचे लग्न होणार, असेच वाटू लागले होते. मात्र, काळासोबत हे वादळ शांत झाले आणि रवि किशन पुन्हा आपल्या सुखी संसारात परतले. भोजपुरीतील अमिताभ बच्चन म्हणवल्या जाणाऱ्या रवि किशन यांनी राजकारणातही नशीब अजमावले आणि ते यशस्वी ठरले. प्रत्येक क्षेत्रातील त्यांच्या वाटचालीत पत्नी प्रीतीने आपल्या प्रेमाची घट्ट वीण सैल होऊ दिली नाही आणि म्हणूनच हा संसार टिकला. दोघे एकमेकांना म्हणत असावे....

*हमें सवारा है तेरे साथ ने*
*खूब निखारा है तेरे साथ ने*
*रिश्ता ऐसा ही अटूट बना रहे अपना*
*हर जनम मेरा हाथ रहे तेरे हाथ में...*

## रानभाज्यांच्या जगात

संगीता ठलाल/७८२१८१६४८५

# गुणकारी माट!



आपलं आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी रानमेवा, गावरान भाज्या, रानभाज्या, शेंगा, पालेभाज्या, फळं खावीत कारण त्यामधून पोषण मिळतं आणि आरोग्य चांगलं राहतं. निरोगी दीर्घायुष्यासाठी ते सहायक असतात?. अशा अनेक वनस्पती आणि रानभाज्या आहेत की, अलिकडेपर्यंत त्यांचा आपल्या आहारात समावेश होता. पण, बदलत्या जीवनशैलीसोबत आपण या प्राचीन आहारविज्ञानाची कास सोडली आणि स्वतःला आजाराचे घर करून घेतले. अशीच एक गुणकारी अस्सल गावरान पालेभाजी म्हणजे झाडीबोलीतील 'माट' या नावाने ओळखली जाणारी पालेभाजी! माटाची भाजी गडचिरोली जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी मिळते. ही भाजी सर्व ऋतूंमध्ये मिळते.

अस्सल गावरान माट भाजी जास्त करून शेतात टाकलेल्या शेणखतावर, घरी असलेल्या मोकळ्या जागेत उगवते. सोबतच या भाजीची पेरणीसुद्धा केली जाते. या भाजीवर रासायनिक कीटकनाशकांची फवारणी किंवा खत टाकले जात नाही. त्याची नैसर्गिक चव छान असते. या भाजीची पेरणी शेतात वाफे करून केली असेल तर नुसत्या दिलेल्या पाण्यावर ती वाढते. निसर्गाची देणगी असलेली व निसर्गाच्या सान्निध्यात वाढलेली ही भाजी गुणकारी समजली जाते. या भाजीचे बी बारीक व काळ्या रंगाचे असते. माटभाजीची पानं थोडी मोठी व गर्द हिरव्या रंगाची असतात. भाजीचे देठ बारीक व फिकट हिरव्या रंगाचे असते. माटभाजी जास्तीत जास्त दोन किंवा तीन वीत असते. जाणकारांच्या मते, माटभाजीच्या सेवनाने हातापायाला मुंग्या येणे बंद होते. पचनाच्या समस्यांमध्येही ही भाजी फायदेशीर ठरते. ही भाजी खाल्ल्याने केसगळती थांबते आणि केस मजबूत होतात. काही ठिकाणी आठवडी बाजारात ही भाजी विकायला मांडलेली दिसते. कमी किमतीत मिळणारी ही भाजी लोक आवर्जून विकत घेतात.

ही भाजी बनविण्याची पद्धत अगदी सोपी आहे. हाताने तोडलेली भाजी आधी स्वच्छ धुवून आणि बारीक चिरून घेतात. पातेल्यात थोडे तेल घेऊन ते तापल्यावर पाच-सहा कांदे बारीक चिरून आणि लसणाच्या ५-६ पाकळ्या ठेचून तेलात छान परतून घ्यायचं. त्यात सुकलेल्या लाल मिरच्या, थोडी हळद आणि मीठ टाकून ते एकत्र शिजवून घेतात. कांदा, लसूण बदामी रंगाचे झाले की, चिरलेली माट भाजी त्यात टाकून परतवून घ्यायचं. या भाजीला पाणी सुटत असल्यामुळे पातेल्यावर झाकण न ठेवता ही भाजी शिजवतात. आवडीनुसार बटाट्याच्या बारीक फोडी करून भाजीत टाकतात. माट भाजी शिजल्यावर तिचा इतका खमंग सुगंध येतो की, तोंडाला पाणी सुटते. भाकर किंवा फुलक्यांसोबत आवडीने खाल्ली जाते. या माट भाजीचे महत्त्व गावखेड्यातील लोक जाणतात. अशा आरोग्यदायी वनस्पतींचे जतन आणि आहारात समावेश करणे महत्त्वपूर्ण आहे.

## महिला दिन विशेष

# चुकून चालणारच नाही!



गौरी बेलन/९८८११० ४११२

*दिला जन्म तू, विश्व हे दाविलेस...*
*किती कष्ट माये, सुखे साहिलेस...*
*जिण्या लागी आकार, माझ्या दिलास...*
*तुझ्या वंदितो, माऊली पाऊलास....*

आदी काळापासून स्त्री ही पूजनीय आणि वंदनीय आहे. तिच्या प्रचंड सामर्थ्याचा ठाव प्रत्यक्ष भगवंताला ही लागू शकत नाही. नारी म्हणजे महालक्ष्मी! प्रत्यक्ष महिषासुरमर्दिनी! तिचं तेज तिन्ही लोकात विखुरलेलं आहे. स्त्रीशिवाय पृथ्वीवर कुठल्याच व्यक्तीचं अस्तित्व निर्माण होऊ शकत नाही. आई, स्त्री, नारी, प्रकृती, सृष्टी आणि जगदीश्वरी या सर्व शब्दांमध्ये दीर्घ 'ई' सामावला आहे. तेच ईश्वरीय तत्त्व मानले जाते. स्त्रिया आपल्या कुटुंब व्यवस्थेचा गाभा आहे हे स्त्रियांना जेवढं मनोमन माहिती आहे तेवढेच पुरुषांनासुद्धा! भौतिक प्रगतीच्या मार्गावरून चालताना कितीही आधुनिक काळ आला तरी तिला तिचं सत्त्व आणि सात्विकपणा सोडून चालणार नाही. कुटुंबाचा निकोपपणा जपायचा असेल तर स्त्रीचं सुसंस्कृत वागणं आणि सभ्यपणा हाच कुटुंब संस्थेचा कणखर कणा राहील.

**पिता रक्षती कौमार्ये, भर्ता रक्षति यौवनें**
**रक्षन्ति स्थविरे पुत्रोः न स्त्री स्वातंत्र्य मर्हती**

अर्थात बालवयात मुलीचं रक्षण वडिलांनी, तारुण्यात नवऱ्याने, म्हातारपणात पुत्राने करावे. स्त्रीचं रक्षण करावं कारण, ती अमूल्य आहे. एका स्त्रीच्या भरवशावर संपूर्ण कुटुंबाचं निकोप संवर्धन होणार असतं. चंदन वृक्षाचं रक्षण सभोवताल बाभळीची झाडं लावूनच केलं जातं. स्त्रियांचा उचित सन्मान करताना अनेक शास्त्रकारांनी विविध सुभाषित, श्लोक, अभंग, कविता आणि उदंड साहित्य रचना केली आहे. ईश्वराचे हे अमूल्य दान आम्ही स्त्रियांनीच जर जपलं नाही तर आमच्या स्त्रीत्वाला नव्हे संपूर्ण स्त्री जातीला तो एक कलंकच ठरेल. समाजाची घडी आणि कुटुंबाचा पाया मजबूत होण्याच्या दृष्टीने, समाज सुधारकांनी स्त्रियांना सुशिक्षित करण्याचा ध्यास घेतला होता याची आठवण आपल्याला वारंवार ठेवावी लागेल.

जीवनात एकाच वेळी स्त्रियांनी कृष्ण आणि अर्जुन या दोन्ही भूमिकांचा ध्यास धरला तर संसाराचा रथ सुरळीत धावू शकणार नाही. शिक्षणाचा ध्यास हा आत्मोन्नतीसाठी आणि कौटुंबिक प्रगतीसाठी अपेक्षित आहे. आज महिला दिनाच्या निमित्ताने, विविध क्षेत्रातील स्त्रियांचा सन्मान, त्यांची सुरक्षितता, सोबतच स्त्री वर्गाची जबाबदारी याविषयी विचार मंथनही होईल कारण, समाजातील सॉफ्ट पॉवर म्हणजे स्त्रीशक्ती!

ईश्वराने अधिक वैशिष्ट्यपूर्ण बनवल्यामुळेच स्त्रीकडे जास्त अपेक्षेने आणि आस्थेने बघितलं जातं. चूल आणि मूल या तत्त्वाखाली भरडली जाणारी स्त्री, आता संपूर्ण जगाची यात्रा करण्यात यशस्वी झाली आहे. पूर्वीच्या घटना आणि नियमांनी उद्विग्न झालेलं तिचं मन आता संपूर्ण कौशल्य सिद्ध करण्यासाठी तयार आहे. पण, हे सारं करताना आपला तोल कुठे जात तर नाही ना, हे समजणं आवश्यक आहे. संस्कृतीचे दुसरे रूप म्हणजे स्त्री! मग बदललेल्या चालीरीतींनुसार आधुनिकतेच्या नादात, स्त्रीवर्गाची सभ्यता ढासळलेली दिसते, हे दुर्दैवी आहे.

आधुनिक होणे म्हणजे विचारांचे परिवर्तन! वैचारिक प्रगल्भता! पाश्चात्त्यिकरणाच्या नादात स्त्रीवर्गाचं चिंताजनक रूप समाजात बघायला मिळत आहे. आधुनिक वेशभूषेच्या नावाखाली सर्रास देह प्रदर्शन हे कितपत योग्य आहे? स्नानगृहात घालावी लागणारी वस्त्र भरसभेत चालत नाही, हे काय स्त्रियांना वेगळं सांगावं लागेल? वस्त्र हे लज्जारक्षणार्थ आणि स्त्रीत्व जपण्यासाठी निर्माण झालेलं आहे. स्त्री देहाचं प्रदर्शन स्वतःहूनच करणे हा असंस्कृतपणा आहे. पतीपत्नीमधील शृंगार हा अत्यंत खाजगी असा भाग आहे. तो चारचौघांसमोर निर्लज्जपणे कसा काय साजरा होऊ शकतो? स्वयंपाकघर तर कुटुंबाचा आत्मा मग तरीसुद्धा बाहेरचे पदार्थ हावी का होऊ शकतात? व्यसनांच्या विळख्यात सापडणारी बेधुंद तरुणाई कुटुंबसंस्थेला कशी काय सांभाळू शकेल? विवाहाचे पावित्र्य आणि सुप्रजनन अबाधित कसे राहणार? शिष्टाचार कोण समजावणार? असे अनेक प्रश्न अंगावर शहारे आणतात.


एक स्त्री शिकली तर ती संपूर्ण कुटुंब साक्षर तथा सुसंस्कारीत करेल, हा विश्वास बाळगून स्त्रियांच्या शिक्षणासाठी कष्ट घेतलेले आहेत. त्यामुळे, स्त्रियांना स्वतःचं अस्तित्व, अस्मिता, शील विसरून कसं बरं चालेल? योग्यता आहेत म्हणूनच अपेक्षा आहेत. स्त्री ही उपजतच न्यायमूर्ती आहे. संपूर्ण कुटुंबाची धुरा तिच्या हाती असली की, पुरुष खंबीरपणे काम करू शकतो. नवरा, मुलंबाळं, सासूसासरे या सर्वांच्या आवडीनिवडी, गरजा त्यांच्या सर्वांगीण विकासाकरीता चाललेली तिची धावपळ, ओढाताण या सगळ्या गोष्टी ती अगदी आनंदाने पार पाडते. प्रत्येकाचं दुखणंखुपणं, सणसमारंभ, आर्थिक व्यवहार, प्रत्येकाची निकड या सर्व गोष्टी करताना तिच्या चेहऱ्यावर समाधानाचा तृप्त भाव व्यक्त होतो. संपूर्ण घराला तिचीच सवय लागावी, असं प्रत्येकाला वाटतं. म्हणूनच, अंगणातल्या दारासमोरची लहानशी रांगोळी रेखाटण्यापासून ते संपूर्ण भारताचं अर्थनियोजन करणारी अष्टभुजा स्त्री समाजात अग्रस्थानी आहे. कुटुंबात तिला कधी अहिल्याबाई होळकर तर कधी बहिणाबाई, कधी सावित्रीबाई तर कधी निर्मला सीतारामन होणं आवश्यकच आहे. समाजात स्त्रियांवर होणारे अत्याचार थांबवण्यासाठी मुलांना सुसंस्कार देण्याची नैतिक जबाबदारी तिचीच आहे. मुलांनी केलेल्या कृत्याची जबाबदारी नकळतपणे स्त्रीवर्गाकडेच येते. प्रगतीच्या नावाखाली स्वैर आणि अविचारी वृत्तीने जीवन जगण्याचा ध्यास समस्त स्त्रीवर्गाने घेऊ नये, हेच कळवळून सांगावेसे वाटते. पुण्यश्लोक आहिल्याबाई, छत्रपतींची जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई, स्वातंत्र्यवीरांची येसूवहिनी, अनाथांची माय सिंधुताई सपकाळ या सगळ्यांना जर खरी मानवंदना द्यायची असेल आणि आपलीही मुलं तेजपुंज व्हावीत अशी इच्छा असेल तर आयांनो, आपल्याला चुकून चालणारच नाही.

*घे भरारी जरी, लक्ष असू दे संसारी*
*जग जिंकण्यास निघाली तरी, संस्कार रुजव घरीदारी...*

## आठवणींच्या पारावर

मो. बा. देशपांडे/८३२९१९३५४२

# बघावे तिकडे पनीर...



सध्या पनीर भारीच सगळीकडे बोकाळला आहे. जिथे बघावे तिथे पनीर ठाण मांडून बसलेय. घरी पनीर, ऑफिस कॅन्टीनमध्ये पनीर, ट्रेनमध्ये पनीर, विमानात पनीर, बफेमध्ये पनीर, भाजीबाजारात पनीर, हॉटेलमध्ये तर पनीरमुळे खूपच सोय झाली आहे. प्रत्येक भाजीमध्ये पर्यायी पूरक पदार्थ म्हणून पनीरचे तुकडे, पनीरच्या किसाची पखरण करणे ही जणू फॅशन झालेली आहे. पनीर टिक्का, पनीर भुजिया, पनीर पराठा अशी विविध नावाने पनीर आपल्या जेवणाच्या थाळीत अवतीर्ण होतो. हॉटेलच्या मेन्यूकार्डमध्ये एक संपूर्ण पान, पनीरच्या पदार्थांसाठी राखीव असते. पनीर बघताच भूक खवळते, मन प्रमुदीत होते.

पनीर हा भाजीला पर्याय म्हणून भूमिका बजावताना दिसतो तसेच, कोणत्याही भाजीत सहज सामावून जातो हे त्याचे एक आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे. परिणामी पनीरची केशरी रंगाची भाजी तसेच, इतर पदार्थ खाणे याला मान्यवर प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे. पनीरशिवाय जीवन जगणे अशक्य झाले आहे. पनीर ही फ्रिजची शान आहे. पनीर समोर येताच, आनंदाने गिळंकृत करणे एवढेच लोकांना ठाऊक आहे. पण इतक्या मोठ्या प्रमाणात पनीर कसे तयार होते? मुळात तेवढी दुग्धनिर्मिती आहे का? याबाबत विचार करायला कुणालाच फुरसत नाही.

लहानपणी कधी दूध नासले तर मोठी मंडळी त्रागा व्यक्त करीत. पण, आम्ही बच्चे मंडळी आनंद व्यक्त करीत असू कारण, आम्हाला कलाकंद खायला मिळायचे. पनीर म्हणजे याच प्रक्रियेची सुधारित आवृत्ती आहे. हल्ली पनीर दुधापासून बनवतात की आणखी कशापासून? हा प्रश्न वादाचा आहे. तूर्तास त्या विषयाला बगल देऊ या पण, लुसलुशीत आणि पांढरा पनीरचा चौकोनी तुकडा आय मीन पनीर क्यूब सर्वांना मोह पाडतो, हे एक शाश्वत सत्य सर्व शंकांना पुरून उरते.

पनीरचे क्यूब किंवा विविध आकार तसेच, पनीरचा कीस हे सर्व खाद्यपदार्थांचे सौंदर्य वाढवतात. पोषणमूल्य वगैरे संशोधनाचा विषय! पनीर हा तसा बऱ्यापैकी टिकाऊ पदार्थ असल्याने त्याचा बाजारभाव कायम वधारलेलाच असतो. फॅक्टरीत पनीरच्या मोठमोठ्या लाद्या आणि त्याचे कटिंग होतानाचे व्हिडिओज बघून थक्क व्हायला होतं. पनीर, चीज, खवा हे सगळे भाऊबंद पण, पनीर बडा भाई ! पनीरची आयात निर्यात हा एक मोठा व्यापार असून, आपल्या थाळीपर्यंत आलेले पनीर नेमके कोणत्या देशातील, कशापासून, कुणाच्या दुधापासून निर्माण झाले त्याचा अंदाज लावणे कठीण असते.

**पूर्वीच्या महाराष्ट्रीयन पंगतीत पनीरला कुठे स्थान होते? किंबहुना पनीरची कुणाला फारशी ओळखसुद्धा नव्हती. नंतरच्या काळात पनीरचे प्रस्थ केवळ मोठ्या हॉटेलपर्यंतच मर्यादित होते पण आता हे लोण टपरी आणि हातठेल्यापर्यंत येऊन कधी पोहोचले ते कळलेच नाही. पूर्वी जेवणात एक फळभाजी आणि पातळ पालेभाजी असे दोन प्रकार होते. सार-कढी, कोशिंबीरी आणि लोणचंही प्रमाणात आपापल्या जागी स्थिरावलं होतं. या सगळ्यात आता पनीरची भाजी, स्नॅक्स हा प्रकार समाविष्ट झालाय. ही नकळत झालेली घुसखोरी आपण उदारपणे कशी मंजूर करून टाकली? हे एक आश्चर्यच आहे. पनीरची लोकप्रियता दिवसागणिक वर्धिष्णू आहे यात दुमत नसावे. आधुनिक काळात पनीरच्या मोठ्या मागणीला पुरवठा करताना आपसूकच नकली पनीरचा वापर वाढल्यास नवल ते काय ? भारतीय खाद्यसंस्कृतीत पनीरने मुख्य घटकाचे स्थान प्राप्त केले आहे, ते खरे की खोटे ? विशेष म्हणजे बालकांनाही पनीरचे आकर्षण का निर्माण झाले असावे?**

पूर्वीच्या महाराष्ट्रीयन पंगतीत पनीरला कुठे स्थान होते? किंबहुना पनीरची कुणाला फारशी ओळखसुद्धा नव्हती. नंतरच्या काळात पनीरचे प्रस्थ केवळ मोठ्या हॉटेलपर्यंतच मर्यादित होते पण आता हे लोण टपरी आणि हातठेल्यापर्यंत येऊन कधी पोहोचले ते कळलेच नाही. पूर्वी जेवणात एक फळभाजी आणि पातळ पालेभाजी असे दोन प्रकार होते. सार-कढी, कोशिंबीरी आणि लोणचंही प्रमाणात आपापल्या जागी स्थिरावलं होतं. या सगळ्यात आता पनीरची भाजी, स्नॅक्स हा प्रकार समाविष्ट झालाय. ही नकळत झालेली घुसखोरी आपण उदारपणे कशी मंजूर करून टाकली? हे एक आश्चर्यच आहे.

पनीरची लोकप्रियता दिवसागणिक वर्धिष्णू आहे यात दुमत नसावे. आधुनिक काळात पनीरच्या मोठ्या मागणीला पुरवठा करताना आपसूकच नकली पनीरचा वापर वाढल्यास नवल ते काय ? भारतीय खाद्यसंस्कृतीत पनीरने मुख्य घटकाचे स्थान प्राप्त केले आहे, ते खरे की खोटे ? विशेष म्हणजे बालकांनाही पनीरचे आकर्षण का निर्माण झाले असावे?

हा पनीर जनमानसात किती खोलवर रुतून बसलाय. पनीरचा इतिहास प्राचीन काळापासून सुरू होतो आणि तो मुख्यतः भारतीय उपखंड, मध्य आशिया आणि मध्य पूर्वेत विकसित झाला आहे. काही संशोधकांच्या मते, लोहयुगात भारतीय उपखंडात पनीर तयार करण्याची कला विकसित झाली. इराणी, अफगाणी आणि मध्य आशियाई संस्कृतीतही दूध जमवून बनवलेल्या दहीसदृश पदार्थांचा उल्लेख आढळतो.

मध्ययुगीन काळ आणि पनीरचा संबंध बघून आश्चर्य वाटेल. मुघल कालखंडात पनीर अधिक प्रसिद्ध झालं आणि त्याचा उपयोग विविध शाही पदार्थांमध्येही केला जाऊ लागला. मुघल आणि तुर्की आक्रमणानंतर भारतात पनीरसोबतच चीज प्रकारातील पदार्थ अधिक लोकप्रिय झाले. काही इतिहासकारांच्या मते, पर्शियन आणि पोर्तुगीज व्यापाऱ्यांनी भारतात दुधातील प्रथिने वेगळी करण्याची प्रक्रिया आणली. पोर्तुगीजांनीच भारतात लिंबाच्या रसाने दूध फाडून पनीर बनवण्याची पद्धत रुजविल्याचा अंदाज आहे.

वेगवेगळ्या काळात जीवनाला काहीतरी व्यापून उरलं होतं. तेव्हा तेव्हा त्या गोष्टींचं गरुड मनावर स्वार होतं आणि नंतरच्या काळात त्या आठवणींनी बरेचदा हसू येतं. जुन्या चित्रपटातील कपडे आणि फॅशन बघून आज गंमत वाटते. ट्रांझिस्टर नवीन निघाला तेव्हा लोक पाठीवर बांधून रस्त्याने फिरत. या कल्पनेने आज हसू येतं. तेव्हा लोक डालडा या कथित तुपासोबत पोळी लावून खात असत. नंतरच्या काळात पनीरचा वापर बघून पुढची पिढी आश्चर्य व्यक्त करेल कदाचित!

भारताच्या विविध प्रांतात पनीरचा वापर करून काही पारंपरिक तर काही नव्या पाककृती तयार केल्या जातात. बंगालमध्ये सर्वाधिक पनीर वापरून विविध पदार्थ विशेषतः मिठाई तयार करण्याची पद्धत आहे. आताशा पनीर भारतीय पदार्थांचा, जेवणाच्या ताटातील अविभाज्य भाग झालाय. काहींच्या जीवनावश्यक श्रेणीत जाऊन बसलाय. मनात विचार येतो खरंच 'पनीरलेस' आयुष्य जगणे शक्य आहे का?

तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com





(छाया-कृष्णा शिंदे,बीड)

**होळी सण जिल्ह्यात उत्साही वातावरणात साजरा झाला. ठिकठिकाणी पारंपरिक पूजन करून मानाची होळी पेटविण्यात आली. बीड शहरातील हनुमान मंदिर माळीवेस येथील होळी.**

# चॉकलेटचे अमिष दाखवून सहा वार्षिय चिमुकलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमास वीस वर्षाची सक्त मजुरी; ११ हजारांचा दंड




**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१३ मार्च**

तालुक्यातील सहा वर्षिय अल्पवयीन मुलीस शेजारीच राहणार्या नराधमाने चॉकलेटचे अमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केल्या प्रकरणी अतिरिक्त जिल्हा सत्रन्यायाधीश श्रीमती एस.जे.घरत यांनी वीस वर्षाची सक्त मजुरी व आकरा हजार रूपयांचा दंड ठोठावला आहे.

अंबाजोगाई तालुक्यातील अल्पवयीन मुलीस चॉकेलटचे अमिष दाखवून शेजारी राहणार्या विष्णु बाबुराव सादुळे याने घरात बोलवून दि.२३ मार्च २०२३ रोजी तिच्यावर अत्याचार केला. यानंतर ही अल्पवयीन मुलगी घरी जावून एकटीच बसली होती. कोणासही बोलत नव्हती. तिने पोट दुखत असल्याचे सांगितले. त्यामुळे पालकांनी तिला काय झाले तु बोलत का नाहीस, पोट कशाने दुखत आहे. असे विचारले असता तिने घडलेला प्रकार सविस्तर सांगितला.

घटनेच्या दुसर्या दिवशी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास अल्पवयीन पिढीता ही शाळेतून घरी आली. व तसाच उदास चेहर्याने घरात बसली होती. पालकांनी परत तिला काय प्रकार झाला आहे असे विचारले असता तिने दुपारी दोन ते तीन वाजता शेजारी मैत्रिणीच्या घरी खेळत असताना शेजारी राहणारा नराधम विष्णु बाबुराव सादुळे

हा तिथे आला. आणि तिला म्हणाला माझ्या सोबत चल तुला मी चॉकलेट देतो. म्हणून तिला त्याच्या जुन्या घरी घेवून गेला. घराचा दरवाजा लावून घेतला व तिच्यावर अत्याचार केला. हा झालेला प्रकार कोणालाही सांगु नकोस नाहीतर तुला जिवे मारून टाकीन अशी धमकी दिली. बर्दापुर पोलिसात ३७६, ५०६ भादंवी सह कलम ३.४ (२) ५ एम., ६ बाललैंकिंग अत्याचार अन्वये गुन्हा नोंद होवून पुढील तपास पोलिस अधिक्षक कार्यालयाच्या पिंक पथकाकडे वर्ग करण्यात आला. या प्रकरणाची संपूर्ण तपास पोलिस उपनिरिक्षक सुचिता शिंगाडे यांनी दोषारोपपत्र अंबाजोगाईतील अप्पर सत्र न्यायालय दाखल केले. या प्रकरणाची आज सुनावणी झाली. सदर प्रकरणामध्ये सरकार पक्षाच्या वतीने अ‍ॅड.शिवाजी मुंडे यांनी नऊ साक्षीदार तपासले. पिढीतेचा जवाब व इतर साक्षी पुरावा व सरकारी वकीलाचा युक्तीवाद न्यायालयाने ग्राह्य धरून नराधम आरोपीस कलम ६ बाललैंगिंक अत्याचार कायद्या प्रमाणे वीस वर्षाची सक्त मजूरी व दहा हजारांचा दंड तसेच ५०६ भादवी प्रमाणे एक वर्षाचा कारावास व एह हजारांचा दंड अशी शिक्षा अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्रीमती एस.जे.घरात यांनी ठोठावली.

**घटनेच्या निषेधार्थ अंबाजोगाईतील हजारो विद्यार्थीनींनी काढला होता मोर्चा**

सहा वर्षिय अल्पवयीन मुलीवर शेजारीच राहणार्या नराधमाने चॉकेलटचे अमिष दाखवून अत्याचार केल्यानंतर तालुक्यामध्ये खळबळ उडाली होती. सदरील घटना ही निंदनीय असून शहरातील सर्व शाळांच्या मुलींनी हजारोंच्या संख्येने डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते उपजिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता. या मोर्चादरम्यान विद्यार्थीनींनी नराधमास फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी केली होती. या मोर्चाची देखील न्यायालयाने गंभीर दखल घेतली. या शिक्षेमुळे यापुढे अशा नराधमाची हिम्मत होणार नाही. हेच या निकालावरून स्पष्ट होते.

# माविम जिल्हास्तरीय प्रदर्शन-विक्रीच्या नवतेजस्विनी महोत्सवाचा समारोप समारंभ संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ मार्च**

महिला व बाल विकास विभाग अंतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) च्या सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिन व जागतिक महिला दिनानिमित्ताने दि.१० ते १२ मार्च २०२५ दरम्यान छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण या ठिकाणी स्वयंसहाय्य महिला बचतगट उत्पादित वस्तू/मालाचे जिल्हास्तरीय प्रदर्शन व विक्री करिता नवतेजस्विनी महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जिल्ह्यातील विविध प्रकारचे ५२ स्टॉल राहणार चा सहभागी होते. नवतेजस्विनी महोत्सवामध्ये गावरान धान्य व कडधान्य, विविध प्रकारचे स्वादिष्ट मसाले, चकली, सोयाबीन चिवडा, लाकडी घाण्याचे तेल, रुचकर पापड, कुरडई , शेवय्या, लोणचे, व विविध पदार्थ, गावरान खवा, अंडी, कलिंगड , लिंबू शरबत, अगरबत्ती कापडी पिशवी व सुरभी बॅग, भाजीपाला, कापूस वेचणी कोट, रेडीमेड ब्लाउज, इमिटेशन ज्वेलरी, बांगडी, दही धपाटे, व्हेज खानावळ इत्यादी प्रकारच्या स्टॉल मधून सुमारे १४ लाख २५ हजारांची विक्री झाली. यामुळे बचतगटाना या प्रदर्शनातून फायदा झाला आहे. या नवतेजस्विनी महोत्सवाचा समारोप समारंभ दि.१२ मार्च २०२५ रोजी संपन्न झाला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी श्री सुभाष साळवे, आय.सी.आय.सी.आय बँक चे रिजनल ऑफिसर संतोष पाटील, जिल्हा



उद्योग केंद्राचे व्यवस्थापक विजय काकड, जिल्हा खादी ग्रामोद्योग चे व्यवस्थापक श्री फताटे, जिल्ह्यातील सर्व लोक संचलित साधन केंद्राचे पदाधिकारी उपस्थित होते.

या नवतेजस्विनी महोत्सवामध्ये सहभागी सर्व स्टॉलधारकांना प्रेरणा देण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) जिल्हा कार्यालयाच्या वतीने उपस्थित प्रमुख अतिथी व माविम जिल्हा समन्वय अधिकारी श्री एस.बी.चिंचोलीकर यांच्या हस्ते सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देवून सन्मान करण्यात आला. तसेच हे जिल्हास्तरीय प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी ज्यांनी योगदान दिले त्यांनाही सन्मानित करण्यात आले.

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) जिल्हा कार्यालयाच्या वतीने प्रथम एवढ्या मोठ्या प्रमाणात हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आणि ते यशस्वी झाले. तसेच महिलांनी बचतगटातून जो माल तयार केला तो प्रशसनीय आहे.यापुढे बचतगटांनी अन्न व धान्य प्रक्रिया उद्योगासाठी कृषी विभागाच्या पी.एम.एफ.एम.ई आणि सी.एम.ई.जी.पी. या अनुदानित योजनेसाठी प्रस्ताव सादर करावे,असे मार्गदर्शन व आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी श्री सुभाष साळवे आणि जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक विजय काकड यांनी केले आहे.

जिल्हास्तरीय प्रदर्शन व विक्री चे नवतेजस्विनी महोत्सव २०२५ यशस्वी करण्यासाठी माविम जिल्हा समन्वय अधिकारी श्री एस.बी.चिंचोलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली लेखाधिकारी गजानन ढोणे, जिल्हा प्रकल्प सल्लागार सागर इंदुरकर, एम.आय.एस.सल्लागार नरेश कुरापती, लोक संचलित साधन केंद्र व्यवस्थापक रामकुवर आंधळे, मिना कांबळे,सविता औटे, उषा राठोड, वैशाली नाईकनवरे, नंदिनी हिंगमिरे, उपजीविका सल्लागार श्री चेतन निसर्गंध, शार्दुल वाघमारे, लेखापाल धीरज करमाळकर, स्वप्नील वाघमारे, कोमल पवार, आकाश जोगी व सर्व सहयोगिनी यांनी यशस्वी प्रयत्न केले.

# अजितदादा पालकमंत्री असल्यामुळे पाच वर्षांत बीड जिल्ह्याचा बारामतीसारखा विकास होईल

## आ.संदीप क्षीरसागरांनी व्यक्त केली जिल्हावासीयांकडून अपेक्षा

## बीड मतदारसंघातील महत्वाचे प्रश्न अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडले

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई दि.१३ मार्च**

यावेळेस ना.अजितदादा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असल्यामुळे पाच वर्षांमध्ये बीड जिल्ह्याचा विकास बारामतीसारखा होईल. अशी अपेक्षा संपूर्ण जिल्ह्यावासीयांकडून आ.संदीप क्षीरसागरांनी व्यक्त केली. विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड मतदारसंघाच्या विकासासाठी अत्यावश्यक असलेले विविध प्रश्न सभागृहात मांडले.

मुंबई येथे महाराष्ट्र विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सध्या सुरू आहे. या अधिवेशनात आ.संदीप क्षीरसागर यांनी बुधवारी (दि.१२) रोजी बीड मतदारसंघाच्या विकासासाठी अत्यावश्यक असलेले विविध प्रश्न व कामे सभागृहात मांडली. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यावेळेस ना.अजित दादा पवार आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्याला ना.अजितदादांकडून अपेक्षा आहेत. ना.अजितदादांच्या पुढाकारातून येत्या पाच वर्षांत बीड जिल्ह्याचा विकास बारामतीसारखा होईल अशी लोकभावना जिल्हावासीयांची आहे. अशा शब्दांत आ.क्षीरसागरांनी ना.अजितदादांकडे जिल्ह्याच्या विकासाबाबत अपेक्षा व्यक्त केली. बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी हद्दपार करायची असेल तर, तरूणांना रोजगार देऊन गुन्हेगारी पासून परावृत्त करावे लागेल. त्यासाठी बीड येथे असलेल्या एमआयडीसीचा विकास होणे गरजेचे आहे. याबाबत आ.संदीप क्षीरसागरांचा ना.अजित पवारांकडे पाठपुरावा सुरू आहे. मागील काही दिवसांपूर्वीच बीड एमआयडीसीचा प्रस्ताव घेऊन आ.संदीप क्षीरसागर ना.अजितदादांना भेटले होते. त्यावर ना.अजितदादांनी विभागाला निर्देश दिले होते. त्यानंतर बीड येथे उपलब्ध असलेल्या २५० एकर जागेचा सर्वे काही दिवसांपूर्वीच झाला आहे. औद्योगिक वसाहतीसाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबी येथे उपलब्ध आहेत. तसेच मोठ्या उद्योजकांनाही भेटलो असून त्यांनीही याठिकाणी उद्योग उभारण्यासाठी तयारी दर्शवली आहे. त्यामुळे बीड एमआयडीसीच्या विकासासाठी निधी देऊन बळ द्यावे अशी मागणी आ.संदीप क्षीरसागरांनी केली. यासोबतच बीड शहरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी विशेष बाब म्हणून नगरपालिकेकडील वीजबिल भरण्यासाठी निधीची तरतूद करावी त्यामुळे या उन्हाळ्यात खूप मोठा दिलासा बीड शहरातील नागरिकांना मिळेल. टुकूर साठवण तलाव प्रकल्पात सन २००३ मध्येच कार्यारंभ आदेश मिळालेले आहेत परंतु याला असलेल्या स्थानिकांच्या विरोध असल्यामुळे हे काम होऊ शकले नाही. त्यावर मार्ग काढून एकाच ठिकाणी साठवण तलाव करण्याऐवजी चार विविध ठिकाणी




बंधारे केल्यास तलावाइतक्याच क्षमतेने पाणी साठवणूक होईल. आणि हे सर्व तलाव प्रकल्पाला लागणार्या रकमेच्या अर्ध्याच रकमेत होणारा प्रकल्प आहे. त्यामुळे या महत्त्वाच्या प्रकल्पाला निधी द्यावा. तसेच शिरूर कासार तालुक्यातील फुलसांगवी येथील २.८३ द.ल.घ.मी. क्षमतेचा साठवण तलाव आहे. परंतु पावसाळ्यातील बदलामुळे तलाव भरण्यासाठी अडचण निर्माण होते. त्यामुळे येथीलच सिंदफणा नदीवर मोठ्या क्षमतेचा बंधारा तयार केल्यास किंवा इतर पर्यायी उपयुक्त मार्गाचा अवलंब करून उपसा जलसिंचन किंवा कॅनॉलद्वारे पाणी तलावात सोडल्यास तलाव पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी कायमस्वरूपी मार्ग निघेल. परिणामी परिसरातील अनेक गावांच्या सिंचनाचा प्रश्न सुटेल. त्यामुळे या कामाकरिता निधी देण्यात यावा. त्यासोबतच बीड शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची उंची वाढविणे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळ्याची उभारणी करणे, स्व.अण्णासाहेब पाटील व स्व.विनायकराव मेटे यांचा पुतळा पंचायत समिती आवारात बसविणे आदी कामांना निधी देण्यात यावा अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी सभागृहात केली.

# निश्चय नैसर्गिक रंगाच्या होळीचा...! संकल्प वसुंधरेच्या रक्षणाचा...!

## पर्यावरण मंत्री पंकजा मुंडेंनी दिल्या मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना पर्यावरणस्नेही होळीच्या शुभेच्छा

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई दि.१३ मार्च**

होळी व धुलीवंदना निमित्त सर्वांनी पर्यावरणपूरक होळी साजरी करावी या उपक्रमाच्या अनुषंगाने आज पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पर्यावरणपूरक पाच रंगाचा समावेश असलेले पॅकेट देऊन पर्यावरणस्नेही होळी साजरी करण्याच्या शुभेच्छा दिल्या.



होळी व धुलीवंदन तसेच रंगपंचमी हा सण राज्यात मोठ्या प्रमाणात साजरा केले जाते. रंग खेळताना ते पर्यावरण व नैसर्गिक असावेत, यासाठी जनजागृती आवश्यक आहे. राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या वतीने पर्यावरण पूरक होळी, धुलिवंदन व रंगपंचमी साजरी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनीही पर्यावरण पूरक होळी, रंगपंचमी व धुलिवंदन साजरी करण्याचे आवाहन केले आहे. याचाच एक भाग म्हणून पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री श्रीमती मुंडे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सागर निवासस्थानी जाऊन तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांना विधानभवनात भेटून पर्यावरण पूरक रंगाचे पॅकेट देऊन शुभेच्छा दिल्या.